संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१५ मे २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)



**मधु लिमये** यांच्या
जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ झाला...
त्या निमित्ताने
**पन्नालाल सुराणा** यांचा लेख



**साने गुरुजी** यांनी केलेल्या
**पंढरपूर मंदिर प्रवेश लढ्याला**
**७५ वर्षे होत आहेत...**
त्या निमित्ताने **चैत्रा रेडकर** यांचा लेख



जॉब व करिअर रेडी होण्यासाठी!
कॉलेज सोबत करा करिअरची तयारी
MKCL
MS-CIT Learning Mode
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
घरुन ऑनलाइन कंप्यूटरवर शिका
स्मार्टफोनवरून शिका
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
MKCL MS-ACIT
Information Technology for Teachers
MKCL Smart Teacher
KLiC
For 21st Century Teachers
प्रवेशासाठी www.mkcl.org/join या लिंकला भेट द्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा
आजच प्रवेश घ्या
संपर्क : 8411960005

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१५ मे २०२१
वर्ष ७३ / अंक - ३८
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक / अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव / रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./ चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Cover photo by Pankaj Anand
(Conde Nast Traveller)

# अनुक्रम

४ संपादकीय
**भाजपच्या विस्तारवादाचे भय?**

७ **भारतीय लोकशाही : निवडणूक आयोगाची कीर्ती आणि बेअब्रू**
- रामचंद्र गुहा

१० **विस्कटलेल्या समाजवादी चळवळीतील तेजस्वी तारा**
- पन्नालाल सुराणा

१५ **साने गुरुजींचा पंढरपूर मंदिरप्रवेश आणि हिंदू धर्मसुधारणा**
- चैत्रा रेडकर

२४ **आंतरराष्ट्रीय कामगार स्मृतिदिन साजरा केला पाहिजे!**
- जगदीश पटेल

२९ **संविधानातील सातव्या अनुसूचीचा पुनर्विचार व्हावा**
- संतोष दास्ताने

३३ **कथा : चेहरा आणि आरसा**
- माधव कौशिक

३७ **कोरोनातही शेवटचा दिन गोड झाला...**
- संजय स्वाती भावे

३९ **प्रतिसाद**
- रमेश आगाशे, अरुण वि.कुकडे, सुभाष आठले,
- किशोर मधुकर काकडे, विजय आपटे, चंद्रकांत गवांदे,
- संजय लडगे, विलासराव भांदिर्गे.

संपादकीय

# भाजपच्या विस्तारवादाचे भय?

मागील महिनाभर संपूर्ण देशाचे लक्ष पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू, आसाम आणि पाँडेचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकींकडे लागले होते. गेल्या आठवड्यात निकाल लागले आणि देशाने सुटकेचा श्वास घेतला. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला दोन-तृतीयांश बहुमत मिळाले आणि ममता बॅनर्जी सलग तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्या. तमिळनाडूमध्ये द्रमुकला पूर्ण बहुमत मिळाले आणि एम.करुणानिधी यांचे पुत्र स्टॅलिन पहिल्यांदाच मुख्यमंत्री झाले. केरळमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्टप्रणित डावी लोकशाही आघाडी पूर्ण बहुमत मिळवून पुन्हा सत्तेवर आली आणि पिनराई विजयन दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. आसाममध्ये भारतीय जनता पक्षाला पुन्हा सत्ता मिळाली आणि सर्वानंद सोनोवाल दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. पाँडेचेरी या केंद्रशासित प्रदेशात ऑल इंडिया एन.आर.काँग्रेसचे एन.रंगसामी भाजपसोबत केलेल्या युतीमुळे काही कालखंडानंतर सत्तेवर आले आणि तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले. एकूणात पाहिले तर अशा प्रकारच्या संमिश्र यशामुळे म्हणजे विविध पक्षांना मिळालेल्या सत्तेमुळे देशातील लोकशाहीवादी व्यक्तींनी व शक्तींनी समाधान व्यक्त केले.

सर्वाधिक लक्ष्यवेधी ठरली ती पश्चिम बंगालची निवडणूक. कारण मागील दहा वर्षे तृणमूल काँग्रेस, आधीची चौतीस वर्षे कम्युनिस्ट आणि त्याआधीची तीस वर्षे काँग्रेस यांची सत्ता राहिलेल्या या राज्यात भारतीय जनता पक्ष सत्तेवर येण्याची मोठीच शक्यता निर्माण झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी आपली पूर्ण ताकद पश्चिम बंगाल जिंकण्यासाठी लावली होती, ते साहजिक होते. कारण डाव्यांचे गड असलेले पश्चिम बंगाल व केरळ या राज्यांत सत्ता मिळवण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येणे हा उजव्या भाजपसाठी सर्वाधिक आनंदाचा भाग ठरणार आहे. शिवाय, दोन वर्षांपूर्वी झालेल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगालमध्ये भाजपला ४२ पैकी १८ जागा जिंकता आल्या आहेत. २०१६ पर्यंत त्या राज्यात भाजपची पक्षसंघटनाच नव्हती, त्या पार्श्वभूमीवर नंतरच्या तीन वर्षांत त्यांनी मिळवलेले यश लक्षणीय होते. शिवाय, आता पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस नामशेष झालेला आहे, डावे पक्ष असून नसल्यासारखे वागत आहेत. त्यामुळे साम-दाम-दंड-भेद या नीतीलाही लाजवेल अशा पद्धतीने काम भाजपने केले तर ममता बॅनर्जी यांचे आव्हान मोडून काढता येईल असा विचार मोदी-शहा या जोडीने केला असेल तर तो साहजिकच म्हणावा लागेल. आणि म्हणूनच त्यांनी देशावरील कोरोना संकटाची पर्वा न करता मोठ्या प्रचारसभा घेतल्या व रॅलीज काढल्या; केंद्रातील अनेक मंत्री व विविध राज्यांतील

भाजप नेते पश्चिम बंगालमध्ये धाडले होते; ममता बॅनर्जी यांच्यावर हल्ला घडवून आणण्यापासून त्यांचे घनिष्ठ सहकारी फोडून भाजपमध्ये सामील घेण्यापर्यंतची कारस्थाने केली; हे सर्व कमी पडेल म्हणून केंद्रिय निवडणूक आयोगाला हाताशी धरून तब्बल आठ टप्प्यांत आणि महिनाभर चालेल अशी निवडणूक प्रक्रिया पश्चिम बंगालमध्ये राबवली होती. इतके सर्व भाजपने करूनही जनतेने ममता यांच्या पक्षाला दोन-तृतीयांश जागा दिल्या, यासाठी जनतेचे कौतुक करायचे की ममतांचे, असा प्रश्न पडून लोकशाहीबद्दलचा आदर दुणावतो हे खरे! पण त्याच राज्यात काँग्रेस व दोन्ही कम्युनिस्ट यांना एकही जागा मिळालेली नाही आणि भाजपला तब्बल ७८ जागा मिळाल्या आहेत, हे लक्षात घेतले तर भविष्यसूचक घंटानाद ऐकू येईल. तो घंटानाद हेच सांगेल की, आणखी पाच वर्षांनी अगदीच काही अनपेक्षित घडले नाही तर तेथील सत्तेवर भाजप येईल. कारण तब्बल पंधरा वर्षे सत्ता राबवल्यानंतर ममतांच्या घोडदौडीला मर्यादा पडलेल्या असणार, काँग्रेस व कम्युनिस्ट यांनी अशा पराभवातून काहीही धडे घेतलेले नसणार; आणि भाजप व संघपरिवाराने मात्र कालच्या निवडणुकीचे निकाल लागले त्याच दिवशी, २०२६ मध्ये येणारी विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी तयारीला प्रारंभ केलेला असणार!

पश्चिम बंगालमध्ये भाजप सत्तेच्या इतक्या जवळ गेला आहे की, अन्य लोकांनी 'भाजप तिथे पराभूत झाला' असा कितीही जल्लोष केला तरी, भाजपच्या दृष्टीने तो मोठा विजयच आहे. त्यामुळे आत्मविश्वास दुणावलेला भाजप आता केरळमध्ये सत्तेच्या नजिक जाण्यासाठी आगामी पाच वर्षांत मोठीच ताकद लावणार हे उघड आहे. असे सांगितले जाते की, केरळमध्ये संघ स्वयंसेवक सर्वदूर पोहोचले आहेत. त्यामुळे त्यांनी नांगरणी केलेल्या भूमीवर पुढील मशागत करण्याचे काम भाजप कार्यकर्ते करतील आणि आणखी पाच नव्हे तर दहा किंवा पंधरा वर्षांनी तिथे भाजप सत्तेवर येईल, हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी लढत राहतील! म्हणजे केरळमध्ये डावी आघाडी व काँग्रेस आघाडी यांच्यातून वाट काढून नव्हे, तर दोन्हींपैकी एका आघाडीला नामशेष करण्यासाठी अधिक प्रयत्न करून तो जनाधार स्वत:कडे वळवण्यासाठी रणनीती राबवतील. याचा अर्थ केरळमध्ये त्या दोन्हींपैकी कोणत्या आघाडीला तो फटका बसणार, हे येत्या काही वर्षांत बघायला मिळणार.

पश्चिम बंगाल व केरळ यांच्यापाठोपाठ भाजपसाठी अधिक मोठे व अधिक कठीण स्वप्न असेल ते तमिळनाडू राज्य जिंकण्याचे. सी.राजगोपालाचारी यांच्यानंतर तमिळनाडूमध्ये काँग्रेस पक्ष अगदीच क्षीण रूपात आहे. तिथे राज्याची सत्ता द्रमुक व अद्रमुक यांच्यात फिरते आहे, ती मागील पाच दशकांपासून. त्या दोन्ही प्रादेशिक पक्षांचे संस्थापक नेते व पहिल्या फळीचे नेते आता काळाच्या पडद्याआड गेले आहेत आणि दुसऱ्या-तिसऱ्या पिढ्यांच्या हाती त्या-त्या पक्षांची सूत्रे आली आहेत. त्यामुळे तिथे भाजपला आपली पक्ष संघटना वाढवण्यासाठी आता पूर्वीपेक्षा तुलनेने अधिक वाव राहणार आहे. तसेही अद्रमुकशी युती करून भाजपने मागील पाच वर्षांत पायाभरणी केली आहे, पुढील पाच वर्षांनी अद्रमुकची सत्ता आली तर त्यात भाजप सहभागी होऊ शकतो. हिंदू धर्माला किंवा वैदिक धर्माला आणि एकूणच रूढ अर्थाने मानली जाते त्या भारतीय संस्कृतीला व हिंदी भाषेला कडवा विरोध ज्या राज्यातून होत आला आहे, तिथे सत्ता मिळाली तर तो भाजपसाठी सर्वोच्च आनंदाचा क्षण असेल.

वरील तीन राज्यांव्यतिरिक्त तेलंगणा, आंध्र प्रदेश, ओडिशा, पंजाब, काश्मीर असेही काही प्रदेश आहेत, तिथे भाजपला पूर्ण सत्ता मिळवायची आहे, पण तिथे भाजप बऱ्यापैकी पोहोचलेला आहे. मागील पाच वर्षांत त्रिपुरा व आसाम ही दोन राज्ये त्यांनी काबीज केलेली आहेतच. ही सर्व पार्श्वभूमी एकत्रित लक्षात घेतली तर भाजप मागील तीन दशके दमदार व सातत्यपूर्ण वाटचाल करीत असून आगामी दोन दशकांत पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू या तीन राज्यांसह संपूर्ण देशभर पसरलेला असेल. म्हणजे १९४७ मध्ये काँग्रेसचे जे स्थान या देशात होते ते स्थान २०४७ मध्ये भाजपने घेतलेले असेल.

भविष्याचे हे चित्र काँग्रेसला व कम्युनिस्टांना भयसूचक वाटत नसेल कदाचित, पण लोकशाहीवादी व्यक्तींना व शक्तींना निश्चितच वाटते आहे. कारण डावा प्रवाह आणि मध्यवर्ती प्रवाह सशक्त राहणे ही या देशातील लोकशाही जिवंत राहण्याची, सेक्युलॅरिझम विकसित होण्याची, सर्व प्रकारच्या विषमता कमी होण्याची आणि देश आधुनिकतेच्या मार्गावर चालत राहण्याची पूर्वअट आहे!

00

रामचंद्र गुहा

# भारतीय लोकशाही : निवडणूक आयोगाची कीर्ती आणि बेअब्रू

मागच्या काही काळात मुख्य निवडणूक आयुक्त काही वेळा मंत्र्याच्या वा पंतप्रधानांच्या दबावापुढे झुकलेही असतील, पण २०१४ पासून मात्र या लाचारीने कळसच गाठला. पश्चिम बंगालमधील निवडणुकांआधीही निवडणूक आयोगाचे हे हिडीस रूप दिसले आहे. मागच्या सार्वत्रिक निवडणुकांदरम्यान निवडणूक आयोगाने समाजविघातक घटकांना एक प्रकारे पाठीशी घालत, सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना सांप्रदायिक विष पसरवण्यापासून, विखार, द्वेष पसरवण्यापासून रोखले नाही. किंबहुना तीर्थयात्री म्हणून केदारनाथला जाऊन धर्माच्या नावावर मते मागण्याच्या पंतप्रधान मोदींच्या कृत्यावरही निवडणूक आयोगाने चाप लावला नाही, तर त्याला परवानगीच दिली. मोठा घोटाळा असलेल्या 'इलेक्टोरल बाँड्स' (राजकीय पक्षांना रोखे स्वरूपात दिल्या जाणाऱ्या देणग्या) बाबतही सोयीस्कर मौन बाळगले, हे सत्ताधारी पक्ष आणि निवडणूक आयोगाच्या युतीचंच लक्षण आहे.

निवडणूक निकालाच्या दिवशी टीव्हीवरचे त्याबाबतचे प्रक्षेपण पाहणे ज्येष्ठ नागरिकांसाठी खरेच थरकाप उडवणारे असते. कानठळ्या बसवणारा कर्कश आवाज, स्क्रीनवर सतत बदलत जाणारी चित्रे, आकडे, यांसह निकाल टीव्हीवर पाहणे फारच त्रासदायक. मागील काही वर्षांपासून मी निवडणुकांचा निकाल, त्याबाबतच्या घडामोडी जाणून घेण्यासाठी ट्विटरच पाहतो. जोवर ट्वीटरवर कुणी 'लाईव्ह' येऊन स्वत: ट्वीट करत नाही, तोवर शांतता असते, मेंदूच्या शिरा ताणल्या जात नाहीत.

रविवारी दि.२ मे रोजी जेव्हा चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील निवडणुकांची मतमोजणी सुरू होती, तेव्हा मी ट्विटरवरूनच सर्व घडामोडीं-बातम्यांवर लक्ष ठेवून होतो. रविवारी सकाळी ट्विटर उघडून पाहिले, तिथल्या एका ट्वीटनं माझं लक्ष वेधून घेतलं. पण ते ट्वीट कुणाला किती मताधिक्य, पक्ष, उमेदवार याबाबत नव्हतं. तर ते होतं या निवडणुकांची तथाकथित तटस्थ, नि:ष्पक्ष निगराणी करणाऱ्या यंत्रणेच्या संदर्भात. मी पाहिलेलं ते ट्वीट म्हणजे सिदीन वडूकट या लेखकाचं एक आर्टवर्क होतं. त्याची ट्वीट्स टोकदार, खोचक, उपहासात्मक तरीही विखार, द्वेषाचा लवलेश नसलेली असतात. त्यानं एक बातमी ट्वीट केली होती. 'ब्रेकिंग न्यूज' या मथळ्याखाली ती बातमी दिलेली होती. मद्रास उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगावर ओढलेल्या ताशेऱ्यांविरोधात निवडणूक आयोग सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याची ती बातमी होती. त्या बातमीखाली त्याने त्याची तिरकस कमेंट लिहिली होती, 'आता सर्वोच्च न्यायालयाने हा खटला १५ वर्षांत ३५ टप्प्यांत ऐकावा.'

या कमेंटचा संदर्भ अर्थात निवडणूक आयोगाच्या विक्षिप्त निर्णयांशी आहे. पश्चिम बंगालमध्ये निवडणुका आठ टप्प्यांत घ्याव्यात, असा निर्णय निवडणूक आयोगाने दिला होता. त्यामुळे तिथल्या निवडणुका २७ मार्चला सुरू होऊन

२९ एप्रिलपर्यंत चालल्या. याउलट तमिळनाडूमधल्या विधानसभा निवडणुकांसाठी मात्र एकाच टप्प्यात सगळं मतदान पार पाडलं, हे फारच विचित्र आहे. तिथे एकाच दिवशी ३१ मार्चला सर्व मतदारसंघांसाठी मतदान घेण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला.

गुगलवर शोधल्यास, क्षेत्रफळानुसार पश्चिम बंगाल तर तमिळनाडूपेक्षा लहान असल्याचं आढळतं. बंगालचं क्षेत्रफळ ७९,००० चौरस किलोमीटर तर तमिळनाडूचं १,३०,००० चौरस किलोमीटर आहे, मात्र बंगालची लोकसंख्या १० कोटी तर तमिळनाडूची ७.९ कोटी इतकी आहे. शिवाय बंगालला राजकीय अस्थिरता, हिंसाचाराचा इतिहासही आहे. तमिळनाडूपेक्षा बंगालमध्ये प्रतिस्पर्धी पक्षांमध्ये भरपूर हिंसाचार होतो. हिंसाचाराच्या मुद्यामुळे बंगालच्या निवडणुका जास्तीत जास्त दोन किंवा तीन टप्प्यांत व्हायला हव्या होत्या, मात्र आठ टप्प्यांत मतदान हे समजण्यापलीकडचे आहे.

पश्चिम बंगालसाठी निवडणूक आयोगाने असा तापदायक निर्णय का घेतला, हे कळायला काहीच मार्ग नाही. त्यात मोदी सरकारने माहिती अधिकाराचा कोथळाच काढल्याने आपल्याला हे कधीही कळू शकणार नाही, शिवाय असा निर्णय का घेतला गेला, याच्या काही लेखी नोंदी ठेवलेल्या नसणारच. मात्र हा निर्णय भाजपचे स्टार प्रचारक नरेंद्र मोदी यांना बंगालचे जास्तीत जास्त दौरे करता यावेत, सभा, रॅलीज करता याव्यात, यासाठी घेतला असावा, हे आपण निश्चितपणे सांगू शकतो. दोन वा तीन टप्प्यांत मतदान झाले असते तर मोदींना भरमसाठ सभा, रॅली करणे शक्य झालेच नसते.

बंगालमध्ये सत्तेत येण्यासाठी भाजप जंग जंग पछाडत होती, हे तर सर्वज्ञात आहेच. २०१४ पासून नरेंद्र मोदींनी बंगालच्या अगणित वाऱ्या केल्या. प्रत्येक जिल्ह्याला भेट, रॅलीपाठोपाठ रॅली असा त्यांचा भरगच्च कार्यक्रम सुरूच होता. या भेटींमध्ये त्यांनी ‘भद्रलोक’ आणि ‘छोटोलोक’ या दोन्ही समूहांतील लोकांची अस्वस्थता हेरून त्यांना भावनिक साद घातली. टागोरांचेही त्यांनी कौतुक केले, आता टागोरांच्या जन्मस्थळाचे नाव त्यांनी चुकीचे घेतले, हा भाग अलाहिदा. त्यांनी ईश्वरचंद्र विद्यासागर यांचेही कौतुक केले (त्यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांनीच विद्यासागर यांच्या पुतळ्याची तोडफोड केली होती, असा आरोप आहे हाही लक्षात घेण्याजोगा एक विरोधाभास). दलितांसोबत भोजन करताना त्यांनी स्वत:चे फोटो काढून घेतले आणि बिरसा मुंडाच्या पुतळ्यासमोर अभिवादन करण्यासाठी झुकलेसुद्धा, नंतर तो पुतळा बिरसा मुंडाऐवजी दुसऱ्याच कुणाचा तरी होता, हेही कळले. पण ते असो.

२०१९ मध्ये देशाच्या गृहमंत्रिपदी विराजमान झाल्यानंतर अमित शहांनी मोठ्या चलाखीने केंद्र सरकारची धोरणे बंगालमधील त्यांच्या विजयाला पूरक कशी ठरतील, ते पाहिले. बेपर्वाईने नागरिकत्व सुधारणा कायदा राबवून त्याद्वारे हिंदू निर्वासितांना आश्रय देण्याचे उघडउघड कबूल करून शहांनी बंगालमधल्या निवडणूक संग्रामाची पायाभरणी केली. एके काळी पूर्व पाकिस्तान असलेल्या म्हणजेच आताच्या बांगला देशातून भारतात आलेल्या हिंदूंची पाठराखण करण्याचा मनसुभा त्यांनी बेदरकारपणे दाखवला. दरम्यान त्यांचे बॉस असलेल्या नरेंद्र मोदींनी बंगालच्या असंख्य वाऱ्या केल्या. त्यातील एकही दौरा त्यांच्या पंतप्रधान म्हणून असलेल्या कामाशी अथवा जबाबदारीशी निगडित नव्हता. शहांप्रमाणेच मोदीही बंगालची विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी आसुसलेले होते. मोदींनी आपल्या बांगला देश दौऱ्यातही बंगाल निवडणुकांचा प्रचार करण्याची संधी सोडली नाही, तेही राजशिष्टाचारांचा भंग करून. त्यांनी वाढवलेली दाढी ही द्रविडियन प्रबोधनकार पेरियार किंवा मल्याळी सुधारक श्री.नारायण गुरू यांचे अनुकरण करण्यासाठी वाढवलेली नसून केवळ टागोरांचे अनुकरण करण्यासाठी वाढवलेली आहे, असा आपला समज होऊ शकतो, मात्र त्या वेळी केरळ आणि तमिळनाडूच्या निवडणुकाही प्रस्तावित होत्या, हे ध्यान्यात घेतले पाहिजे.

निवडणूक आयोगाने ठरवल्याप्रमाणे बंगालमध्ये आठ टप्प्यांत मतदान घेण्याचा निर्णय भाजपच्या मर्जीने घेतला गेला होता की नाही, हे आपल्याला खात्रीशीरपणे कधीही कळू शकणार नाही. १६ मार्चला जेव्हा निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाले होते, तेव्हा इंडियन एक्सप्रेसमध्ये एक महत्त्वाचं निरीक्षण नोंदवले गेले होते. ‘आठ टप्प्यांतल्या आणि बराच काळ चालणाऱ्या मतदान–प्रक्रियेबाबतच्या या निर्णयाचा तृणमूल काँग्रेसला फटका बसेल.’ असं ते निरीक्षण. खुद्द तृणमूल काँग्रेसचे राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी स्पष्टपणे म्हणले की, ‘निवडणूक आयोगाचा इतका पक्षपाती व्यवहार मी याआधी कधीच पाहिला नाही.’ निवडणूक आयोग भाजपचाच







पाठीराखा असून, 'नियम वाकवून धर्माचा आधार घेत निवडणूक वेळापत्रक आखून, भाजपचा हरतऱ्हेने कसा फायदा होईल, याची तजवीजच आयोगाने केली' असेही प्रशांत किशोर म्हणाले. (https://indianexpress.com/article/explained/west-bengal-elections-2021-tmc-bjp-congress-cpm-election-commission-7207375/)

(https://www.newsclick.in/election-commission-bjps-extension-strategist-prashant-kishor).

प्रशांत किशोर यांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर उपस्थित केलेल्या प्रश्नांना, आक्षेपांना उत्तर येणे अद्याप बाकी आहे. जागतिक महामारीच्या काळात, इतका प्रदीर्घ काळ चालणारा निवडणूक प्रचार, मोठमोठ्या रॅलींना परवानगी देणे खरेच व्यर्थ आहे. महामारीचा आलेख वरच जात होता, तरीही नंतरचे टप्पे एकत्र करून मतदान घेतले गेले नाही, हे अक्षम्य आणि गुन्हेगारी पातळीवरचे दुर्लक्ष्य आहे. कोरोनाबाधितांची आणि मृतांची संख्या वाढत असताना, निवडणूक आयोगानं जणू विषाणूच्या हातात हात घालूनच काम केले. पश्चिम बंगालमध्ये तर हे ढळढळीतपणे दिसून आले.

मागील रविवारी निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यापासून संबंधितांनी आणि पक्षांनी, त्यातून कोणते धडे घ्यावेत, हे सांगण्यासाठी लेखणी भरपूर झिजवली गेली. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या विजयाने ममता बॅनर्जींच्या पंतप्रधान बनण्याच्या आकांक्षेला खतपाणी मिळेल का? केरळमधील डाव्या आघाडीचा विजय हा तेथील उत्तम प्रशासनव्यवस्थेचे फलित आहे का? बंगालमध्ये पराभव झाला असला, तरी ज्या प्रमाणात भाजपने पैसा आणि ताकद खर्च केली आहे, त्या जोरावर भाजप आसाममध्ये पुन्हा तेवढ्याच शक्तिनिशी सरकार स्थापून ते चालवू शकेल का? केरळ आणि आसाममध्ये काँग्रेसने धरलेला तग आणि पश्चिम बंगालमध्ये त्यांची झालेली पुरती वाताहत, गांधी घराण्याला आता तरी एखादे सामर्थ्यशाली नेतृत्व/नेता उभे करण्यास प्रवृत्त करेल?

या प्रश्नांची चर्चा तर झालेली आहे. या लेखातून मला एक वेगळा किंबहुना अधिक महत्त्वाचा प्रश्न विचारायचा आहे. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता आजच्या इतकी याआधी कधी रसातळाला गेली होती का? निवडणूक आयोगाचे मुख्य अधिकारी म्हणून काम करण्यासाठी काही उत्तम माणसे आपल्या देशाला लाभली होती, याचे अनेक दाखले मी 'इंडिया आफ्टर गांधी' या माझ्या पुस्तकात दिले आहेत. पहिल्या आणि दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुका पार पाडणारे सुकुमार सेन यांनी निवडणुका मुक्त आणि निष्पक्ष

वातावरणात पार पाडल्या जाव्यात, यासाठी प्रयत्न केले. प्रतिस्पर्धी उमेदवार आणि पक्ष यापैकी कोणालाही झुकते माप न देता निष्पक्ष काम केले. 'शंकर्स विकली' या नियतकालिकाने १९५७ च्या अंकात त्यांच्याबद्दल लिहिले आहे, 'स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या पहिल्या दशकातच आपण आशिया खंडाला, भारतात पार पडलेल्या उत्कृष्ट निवडणुकांच्या रूपात एका आदर्श निवडणूक प्रणालीची एक मोठी देणच दिलेली आहे, हे शक्य झाले ते केवळ सुकुमार सेन यांच्या प्रयत्नांमुळे.'

सुकुमार सेन आणि आता बंगालच्या निवडणुकांवर देखरेख ठेवणाऱ्या सुनील अरोरा यादरम्यान आपल्याकडे २१ मुख्य निवडणूक आयुक्त होऊन गेले आहेत. यातील काही अतिशय तडफदार, काही साधारण तर काही उत्कृष्ट दर्जाचे आहेत. टी.स्वामीनाथन अशाच उत्कृष्ट आयुक्तांपैकी एक. १९७७ मध्ये आणीबाणीदरम्यान घेतलेल्या निवडणुका त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या. तर भ्रष्टाचार, बूथ बळकावणे यांसारख्या प्रकारांना आळा घालत पारदर्शीपणे निवडणुका पार पाडण्यात टी.एन. शेषण यांचे योगदान महत्त्वाचे आहे. एन.गोपालकृष्णन, जे.एम.लिंगडोह आणि एस.वाय.कुरेशी ही या गटात मोडणारी अगदी अलीकडची काही नावे.

संविधान, निवडणूक आयोगाला– राजकीय हस्तक्षेप करण्यापासून प्रतिबंध करते. असे असले तरी राजकीय दबावाला बळी न पडता आपली स्वायत्तता टिकवणे, हे बरेचसे निवडणूक आयोगाचा प्रमुख असलेल्या व्यक्तीच्या हातात असते. सेन, स्वामीनाथन, शेषन, गोपालकृष्णन, लिंगडोह, कुरेशी यांनी आयोगाला पूर्णपणे स्वतंत्र ठेवत त्यांच्या कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले. रंजक गोष्ट म्हणजे त्यांच्यापैकी कुणीही निवृत्तीनंतर सरकारकडून मोठ्या पदांवर वा सुखासीन जागांवर नियुक्ती स्वीकारली नाही. एम.एस.गिल यांचा व्यवहार मात्र परस्परविरोधी होता. मुख्य निवडणूक आयुक्तपदाचा राजीनामा दिल्यानंतर लगेचच त्यांनी राज्यसभेची खुर्ची स्वीकारली आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील सरकारमध्ये ते मंत्रीही बनले.

मागच्या काही काळात मुख्य निवडणूक आयुक्त काही वेळा मंत्र्याच्या वा पंतप्रधानांच्या दबावापुढे झुकलेही असतील, पण २०१४ पासून मात्र या लाचारीने कळसच गाठला. पश्चिम बंगालमधील निवडणुकांआधीही निवडणूक आयोगाचे हे हिडीस रूप दिसले आहे. मागच्या सार्वत्रिक



सुनील अरोरा

निवडणुकांदरम्यान निवडणूक आयोगाने समाजविघातक घटकांना एक प्रकारे पाठीशी घालत, सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांना सांप्रदायिक विष पसरवण्यापासून, विखार, द्वेष पसरवण्यापासून रोखले नाही. किंबहुना तीर्थयात्री म्हणून केदारनाथला जाऊन धर्माच्या नावावर मते मागण्याच्या पंतप्रधान मोदींच्या कृत्यावरही निवडणूक आयोगाने चाप लावला नाही, तर त्याला परवानगीच दिली. मोठा घोटाळा असलेल्या 'इलेक्टोरल बाँड्स' (राजकीय पक्षांना रोखे स्वरूपात दिल्या जाणाऱ्या देणग्या) बाबतही सोयीस्कर मौन बाळगले, हे सत्ताधारी पक्ष आणि निवडणूक आयोगाच्या युतीचंच लक्षण आहे.

आता पुढील सार्वत्रिक निवडणुका व्हायला अजून तीन वर्षांचा अवधी आहे. आपण वर चर्चा केल्याप्रमाणे ममता बॅनर्जींची महत्त्वाकांक्षा, काँग्रेसची आत्मटीका आणि पुन्हा नवी सुरुवात किंवा नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान बनतील का? या प्रश्नांवर चर्चा होतच राहील. मात्र पक्ष आणि राजकारण्यांच्या पलीकडे 'भारतीय लोकशाही' या संस्थेचे भवितव्य प्रामुख्याने, निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर तसेच स्वायत्तता आणि क्षमता यासाठी प्रसिद्ध असलेल्या आयोगाच्या मूलभूत व्यवहारावर अवलंबून आहे.

(अनुवाद : प्रियांका तुपे)

पन्नालाल सुराणा

# विस्कटलेल्या समाजवादी चळवळीतील तेजस्वी तारा

‘चले जाव’ चळवळ, ‘गोवा मुक्ती संग्राम’ आणि १९७५ ची ‘राष्ट्रीय आणीबाणी’ या तीनही समर-प्रसंगी तुरुंगवास भोगलेले मधु लिमये (१९२२-९५) समाजवादी पक्षाचे आघाडीचे नेते होते. उत्कृष्ट संसदपटू अशी त्यांची ख्याती होती, त्यांनी बिहारमधील मुंगेर व बांका या लोकसभा मतदार संघांचे प्रतिनिधीत्व प्रत्येकी दोन वेळा केले आणि त्या दोन्ही मतदार संघांतून एकेकदा पराभवही त्यांच्या वाट्याला आला. आजचे व कालचे अनेक नेते व बुद्धिवंत त्यांना आपले मेंटॉर मानत असत. त्यांनी समाजवाद, संविधान, लोकशाही आणि अन्य अनेक राष्ट्रीय प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही भाषांमधून विपुल लेखन केले. त्यातून आकाराला आलेली लहान-मोठी अशी चार डझनांहून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कालच्या १ मेपासून त्यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे, त्यानिमित्ताने हा लेख प्रसिद्ध करीत आहोत. त्यांची स्मृती जागवणारे आणखी काही लेख पुढील वर्षभरात प्रसिद्ध होतील. ...**संपादक**

भारतीय समाजवादी चळवळीतील एक झुंजार नेते, विचारवंत व लेखक या नात्याने मधु लिमयेंच्या कार्यकर्तृत्वाचा खोल ठसा भारतीय इतिहासाच्या अनेक पानांवर उमटलेला आहे. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ १ मे रोजी झाला आहे. त्यानिमित्ताने महत्त्वाच्या राष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर त्यांचे स्मरण करणे उचित ठरेल.

**खानदेशात साने गुरुजींच्या सोबत**

१९३४ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीच्या ज्येष्ठ नेत्यांच्या सहवासात मधुजी १९३६ ला ऐतिहासिक फैजपूर काँग्रेसच्या निमित्ताने आले. पुण्यात एस.एम.जोशी व ना.ग.गोरे यांनी या चुणचुणीत व अभ्यासू युवकाला पार्टीच्या बांधणीसाठी खान्देशात जायला सांगितले. तेव्हा जळगाव जिल्ह्यातील अमळनेर या तालुक्याच्या ठिकाणी एका हायस्कूलमध्ये साने गुरुजी शिक्षक म्हणून काम करत होते. लहान मुलांना गोष्टी सांगणे, कविता रचणे, वसतिगृहाचे काम पाहत असता विद्यार्थ्यांसाठी हस्तलिखित भित्तिदैनिक चालवणे, असे काम गुरुजी करीत होते. शाळेच्या व्यवस्थापकांपैकी एक असलेले प्रतापशेठ यांच्या कापड गिरणीतील कामगारांना चांगले वेतन मिळावे, कामाचे तास ठरावीक असावेत, आदी मागण्यांवर कामगार संघटना त्याच काळात काम करू लागली होती. त्यामध्ये गुरुजीही लक्ष घालत होते. गावातल्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्याही काही प्रश्नांवर सुरू झालेल्या संपात गुरुजींनी उडी घेतली होती. नंतर १९३१ मध्ये सत्याग्रह केल्याबद्दल झालेली शिक्षा भोगायला ते त्रिचनापल्लीच्या तुरुंगात होते. तेथून परत आल्यावर गुरुजींनी नोकरी न करता काँग्रेसच्या व शेतकरी कामगारांच्या चळवळीला वाहून घ्यायचे ठरवले. त्यासाठी त्यांना समजदार व कामसू कार्यकर्त्याची गरज आहे, हे ओळखून एस.एम.नी मधुजींना तिकडे पाठवले. पुढे १९३६

मध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन पहिल्यांदाच ग्रामीण भागात घ्यायचे ठरले होते.

राष्ट्र सेवा दलाचे पथक उभारण्यात त्यांना मधुजींची मोठी मदत झाली. पुढे शेतकऱ्यांचे मोर्चे व कामगारांच्या संघटना यांना जोर चढला होता. १९३९ मध्ये युरोपात जर्मनीविरुद्ध इंग्लंडने सुरू केलेल्या युद्धात हिटलरला विरोध करायचा असला तरी भारताला स्वातंत्र्य देण्याची मागणी ब्रिटनचे राज्यकर्ते मान्य करत नसल्याने त्यांच्या विरुद्ध चळवळ चालवण्याचे काँग्रेसच्या नेत्यांनी ठरवले होते. त्या ओघात अमळनेर, खान्देश भाग व पुढे मुंबईत गुरुजींच्या कामाचा पसारा वाढला. मधुजीही त्यांच्यासोबत मुंबईत पोहोचले व तेथून पुढे तेच त्यांचे मुख्य कार्यक्षेत्र झाले. १९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात गुरुजींसकट काही कार्यकर्ते भूमिगत झाले होते. तो मोठा साहसवादी व जोखीमभरल्या हालचालींचा काळ होता. मधुजींनाही तुरुंगवास घडला. पुढे १९४७ मध्ये वाटाघाटीच्या मार्गाने भारताला स्वांतत्र्य मिळाले. १९१७ मध्ये रशियात क्रांती होऊन अस्तित्वात आलेल्या सोव्हिएत युनियनच्या प्रयोगाबद्दल जगभरच्या चळवळ्या तरुणांचे रक्त सळसळत होते. मात्र कामगारवर्गाच्या हुकूमशाहीच्या नावाखाली तेथील सर्वंकष सत्ता अनेक ध्येयवादी नेते, कार्यकर्त्यांना सुळावर (मतभेद आहेत म्हणून) चढवू लागली. समाजवादाला व्यक्तिस्वातंत्र्याची बूज राखणाऱ्या लोकशाहीची जोड देणे श्रेयस्कर मानलेल्या कॉ.सो.पा.ने सोव्हिएत युनियनच्या वर्चस्वातून बाजूला होऊन लोकशाही समाजवादाची वेगळी आंतरराष्ट्रीय संघटना चालवण्याचे ठरवले.

**आंतरराष्ट्रीय समाजवाद**

१९४८ मध्ये म्यानमार (त्या वेळच्या ब्रह्मदेशात) ऑंग सॉन या समाजवादी नेत्याचे मंत्रिमंडळ अधिकारारूढ होते. आशियातील समाजवाद्यांची व्यापक एकजूट उभारण्याच्या हेतूने पहिली आशियायी समाजवादी संमेलन यांगीन (त्या वेळचा रंगून) येथे भरले होते. सीएसपीच्या शिष्टमंडळात मधु लिमये या तरुणाचा अंतर्भाव करण्यात आला होता. पुढे हेलसिंकी येथे होणाऱ्या सोशॅलिस्ट इंटरनॅशनलमध्ये भारताचा प्रतिनिधी म्हणून सहभागी व्हायची संधी मधुजींना मिळाली. त्यांच्या प्रवासखर्चाची सोय गुरुजींनी केली होती. मधुजींची तेथील वार्तापत्रे 'साधना' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अशा प्रकारची कामे करायची



संधी अगदी तरुण वयात त्यांना संधी मिळाली आणि त्यांनी त्याचे सोने केले. मार्क्सवाद, लोकशाही, समाजवाद, हुकूमशाही, लष्करशाही या विविध व्यवस्था व त्यांच्या मुळाशी वैचारिक दृष्टिकोन यांचा सखोल व तौलनिक अभ्यास केल्याने त्यांची स्वत:ची पक्की व सुसंगत वैचारिक बैठक तयार झाली होती. भावी आयुष्यात एका बाजूला जनसामान्यांच्या प्रश्नांवर आंदोलने चालवणे आणि दुसऱ्या बाजूला लोकशाही समाजवादाची मूळ मांडणी कशी समाजहितकारी आहे; याबद्दलचे लिखाण त्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमधून केले. कार्यकर्त्यांच्या भावी पिढ्यांना हे साहित्य खूपच उपयुक्त ठरत आहे.

**गोवा सत्याग्रह**

१९४८ मध्ये सी.एस.पी. काँग्रेसच्या बाहेर पडली. त्या वेळी मुंबई, कोईमतूर, चेन्नई, बंगलोर, अहमदाबाद, कानपूर आदी ठिकाणी कापडगिरण्या कामगारांच्या संघटना समाजवादी चालवत होते. बिहार व प.बंगालमध्ये कोळशाच्या खाणी व लोखंड-पोलादाचे कारखाने, यातील

कामगार यांच्याही संघटनांत समाजवादी काम करत होते. त्या क्षेत्रात कम्युनिस्टांच्याही संघटना होत्या. त्यामुळे स्पर्धा व संघर्ष चालत असत. काँग्रेस व कम्युनिस्ट या दोहोंना समान अंतरावर ठेवून समाजवाद्यांनी आपल्या संघटना चालवाव्यात, हा लोहियांचा दृष्टिकोन मधुजी व अन्य कार्यकर्त्यांनी प्रमाण मानला होता.

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील गोवा या छोट्याशा प्रदेशावर साडेचारशे वर्षांपासून पोर्तुगीजांचे राज्य होते व ते जास्त दडपशाही करत. तेव्हा हवाबदल व विश्रांतीसाठी लोहिया गोव्याला एका मित्रांकडे काही दिवस राहिले. त्या वेळी लोकांना आपले मत मांडण्याचे कसलेही स्वातंत्र्य वापरता येत नाही, असे अनेकांच्या बोलण्यातून आल्यामुळे लोहियांनी मडगाव येथे जाहीर सभा घेतली. त्यामुळे पोलिसांनी त्यांना तुरुंगात ठेवले. तिकडे दिल्लीत ब्रिटिश सत्ताधाऱ्यांबरोबर महत्त्वाच्या चर्चा चालू होत्या. लोहिया तिथे असावेत असे गांधींना वाटले. भारत सरकारने ब्रिटनच्या सरकारकडून पोर्तुगीजांवर दडपण आणल्याने लोहियांची सुटका झाली. त्या आधीही मुंबई व गोवेकरांची चळवळ सुरू झाली होती. गोव्यातच जाऊन सत्याग्रह करण्याचे ना.ग.गोरे, शिरुभाऊ लिमये, सुधाताई जोशी आदींनी ठरवले. मधुजीही त्या तुकडीत सामील झाले. त्या सगळ्यांना दहा-दहा वर्षांच्या शिक्षा झाल्या. पण दीड वर्षात सुटका झाली.

**संयुक्त महाराष्ट्र आंदोलन**

१९५५ च्या नोव्हेंबरमध्ये न्यायमूर्ती फजल अली आयोगाने, मुंबई शहर वेगळे ठेवून बाकीच्या मराठी भाषक तीन प्रदेशांचे एकत्रीकरण करावे, अशी शिफारस केल्याचे कळल्याबरोबर मुंबईत भडका उडाला. भांडवलदारांच्या दडपणामुळे तसे सुचवले गेले, असे वाटून मुंबईसह 'संयुक्त महाराष्ट्र' या मागणीसाठी प्रचंड आंदोलन सुरू झाले. कम्युनिस्टांबरोबर एकत्र काम करायचे नाही, या भूमिकेमुळे मधु लिमये (तोपर्यंत त्यांनी प्र.सो.पा.तून बाहेर पडून सोशॅलिस्ट पार्टी सुरू केली होती.) संयुक्त महाराष्ट्र समितीत सामील झाले नव्हते. एका विषयाबाबत मधुजींनी कमिटीसमोर त्यावर चर्चा न करता एक वादग्रस्त जाहीर पत्रक प्रसिद्ध केले होते. त्यासाठी प्र.सो.पा.च्या शहर समितीचे सचिव प्रा.मधु दंडवते यांनी मधुजींना कारणे दाखवा नोटीस पाठवली. त्या वेळी प्र.सो.पा.च्या राष्ट्रीय समितीचे सभासद असलेले डॉ.लोहिया यांनी मधुजींच्या बाजूने वादात उडी घेतली. कुठलीही जनआंदोलने न करणारा प्र.सो.पा. या पक्षाला पक्षाघात झाला आहे, अशी कडवट टीका करून लोहियांनी वेगळ्या सोशलिस्ट पार्टीची स्थापना केली. पक्षाचे कार्यालय हैदराबाद येथे ठेवण्यात आले. मधुजी मधूनमधून तेथे राहू लागले. मुंबई व पुणे शहरांत काही समाजवादी नव्या पक्षात गेले, पण बहुसंख्य कार्यकर्ते प्र.सो.पा.तच राहिले. स.मं. आंदोलनात सहभागी झाल्याने १९५७ च्या विधानसभा निवडणुकीत प्र.सो.पा.चे सभासद चांगल्या संख्येने निवडून आले. मुंबई महापालिका निवडणुकीतही तसे झाले. मात्र सोशॅलिस्ट पार्टीचे जॉर्ज फर्नांडिस व सोहनसिंह कोहली निवडून आले.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वामुळे इतर अनेक विरोधी पक्षांबरोबर प्र.सो.पा.तलेही काही जण काँग्रेसमध्ये गेले. उत्तर प्रदेश व बिहारमध्ये तशी पडझड झाली नाही. लोकसभा व विधानसभांत सोशॅलिस्टांची संख्या फारच कमी झाली होती.

१९६२ च्या ऑक्टोबरात सगळ्या देशाला हादरवून सोडणारी घटना घडली. चीनच्या लष्कराने आसाम व अरुणाचल प्रदेशात वीस कि.मी.पर्यंत मुसंडी मारून भारतीय सैन्याला मागे रेटले. संरक्षणमंत्रिपदी असलेले व्ही.के.कृष्णमेनन यांनी लष्कराला आवश्यक साधनसामग्री पुरवण्याबाबत हलगर्जीपणा केला, असा टीकेचा भडिमार झाला. १९४७ ते १९६२ या काळात नेहरूंची लोकप्रियता उंचावलेली होती तिला धक्का बसला. देशात महागाई वाढली होती. कृष्णमेनन यांच्या जागी यशवंतराव चव्हाणांची नेमणूक झाली. त्यांनी संरक्षण सिद्धतेबाबत विशेष लक्ष घालून लष्कराचे बळ वाढवले होते. त्या वेळी झालेल्या लोकसभेच्या तीन पोटनिवडणुकांत आचार्य कृपलानी, डॉ. लोहिया व मिनू मसानी निवडून आले होते. ते सगळे नेहरूंच्या धोरणांवर कठोर टीका करत होते. १९६४ मध्ये मुंगेरच्या पोटनिवडणुकीत मधु लिमये निवडून गेल्याने त्यात भर पडली. थोड्याच दिवसांत नेहरूंचे निधन झाले. लालबहादूर शास्त्री यांची पंतप्रधानपदी निवड झाली. थोड्याच दिवसांत पाकिस्तानने कच्छमध्ये आक्रमण केले. सैन्याने त्यांचा मुकाबला केला. परत १९६५ च्या सप्टेंबरात पाकिस्तानने पठाणकोट विमानतळावर हल्ला केल्याने युद्ध पेटले. अमेरिकेचे पॅटन टँक पाकिस्तानच्या सैन्यात दाखल झाले होते. मात्र भारतीय जवानांनी प्रयत्नांची शर्थ केली.

आपल्या हमीद हवालदारने पायी पळत जाऊन एकामागून एक चार पॅटन रणगाड्यांचा हातबाँबने चुराडा केला. कच्छच्या वेळी 'कच्छ में दलदल है तो लाहोर का रास्ता साफ है।' असे लोहिया म्हणाले होते. मधुजींनी त्याचा पुनरुच्चार केला आणि आपल्या सैन्याने इच्छोगील कालव्यापर्यंत धडक मारली. लोकसभेत हे वारंवार म्हटले गेले की आता पाकिस्तानची गय न करता त्याला चांगला धडा शिकवा. काश्मीरचा प्रश्न सोडून द्यायला त्याला भाग पाडावे असे मधुजी वगैरेंनी म्हटले. रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंद येथे पाकिस्तानचे अध्यक्ष आयुबखान व भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्यात वाटाघाटी झाल्या. काश्मीरच्या प्रश्नाला बगल देण्यात आली. त्याच रात्री शास्त्रीजींचे निधन झाले. काँग्रेस पक्षात ओढाताण वाढली होती तरी ज्येष्ठ मंडळींनी इंदिरा गांधींची निवड केली. त्यांना त्या पातळीवरचा अनुभव कमी होता म्हणून, मधुजींनी 'गूँगी गुडिया' अशी त्यांची संभावना केली होती. पुढे काही वर्षांनी मात्र त्यांना ते शब्द मागे घ्यावे लागले.

**काँग्रेस हटाव**

देशात असंतोष वाढलेला होता. मात्र काँग्रेसविरुद्ध चार-पाच पक्ष आपापले उमेदवार उभे करत होते. त्यांच्यात झालेल्या मतविभागणीमुळे काँग्रेसला सगळीकडे विजय मिळत होता. लोकांमध्ये नाराजी असूनही निवडणुकीचे निकाल तसे लागत असल्याने 'आपण मत देऊन तरी काय उपयोग?' अशी भावना वाढत होती. तसे झाले तर लोकांचा लोकशाहीवरचा विश्वास उडेल, म्हणून लोहियांनी धोरण सुचवले की काँग्रेसविरोधी निवडणुका सगळ्याच पक्षांनी एकजुटीने लढवाव्यात. काही वर्षांपूर्वी लोहियांनीच मत मांडले होते की, कम्युनिस्ट, कॉम्युनॅलिस्ट व काँग्रेस यांना सारखेच लांब ठेवावे. आता ते असे कसे बोलू लागले? या पक्षांच्या विचारसरणीत मुलभूत मतभेद आहेत. त्यांना कसे नजरेआड करता येईल? मधुजींचीही अशीच प्रतिक्रिया होती. पार्टीच्या कलकत्ता अधिवेशनात त्यांच्या भाषणांमुळे लोहियांचा ठराव फेटाळला गेला होता. कलकत्त्यांच्या अधिवेशनानंतर लोहिया मुंबईत मधुजींच्या घरी गेले. ''लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास उडून जाऊ नये, म्हणून मी काँग्रेस हटावचा पुरस्कार करतो आहे. तू समजून घे'', अशी बरीच चर्चा झाल्यावर मधुजींनी लोहियांना पाठिंबा दिला.

विविध विचारसरणी असलेल्या पक्षांचे कडबोळे सरकार कसे काय चालवू शकेल, असा प्रश्न अनेक जण विचारत होते. त्याला उत्तर देताना लोहिया म्हणाले की, आपली दूरगामी धोरणे बाजूला ठेवून जनतेचे तातडीचे प्रश्न सोडविण्यासाठी पक्षाने पाच-सहा कलमांवर एकजूट करून किमान समान कार्यक्रम ठरवावा. 'सत्तेत आलो तर पहिल्या सहा महिन्यांतच त्यापैकी किमान दोन कलमांची अंमलबजावणी करावी. ते न जमल्यास मंत्रिमंडळाचा राजीनामा द्यावा.' हे धोरण कागदावर आकर्षक वाटते. पण एकदा सत्ताकारणात माणसे गुरफटली की, अशी तत्त्वनिष्ठ भूमिका घ्यायला फार थोडे लोक तयार होतील, असे अनेकांनी म्हटले. निवडणुका जवळ आल्या तरी बिगरकाँग्रेसी पक्षांत एकमत व समझोते होऊ शकले नाहीत. लोकसभेत काँग्रेसला काठावरचे बहुमत मिळाले. भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) यांनी बाहेरून दिलेल्या पाठिंब्याच्या आधारे इंदिराजी कारभार चालवत होत्या. नऊ राज्यांत काँग्रेसचा पराभव झाला. बिगरकाँग्रेसी पक्षांनी संयुक्त विधायक दल (संविद) बनवून मंत्रिमंडळे स्थापन केली. उत्तर प्रदेशात चरणसिंग यांच्या प्रयत्नांमुळे तिथल्या संविद सरकारने अलाभकारी भूखंडावरील शेतसारा रद्द करण्याचा कार्यक्रम राबवला. ते सरकार बऱ्यापैकी चालले.

पक्षापक्षांचे हे खेळ चालत राहिले, त्यांच्यावर मधुजींनी नैतिक दडपण ठेवावे, अशी अनेकांची अपेक्षा होती. (लोहियांनी त्यांना आपले उत्तराधिकारी मानले होते.) पण राजकारण्यांच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षाचा जोर खूपच वाढला होता.

**गरिबी हटाव**

काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते इंदिराजींना सुधारू देत नव्हते. लोकांचा प्रत्यक्ष पाठिंबा मिळवण्यासाठी इंदिराजींनी 'गरिबी हटाव'चा कार्यक्रम घोषित केला. संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, चौदा व्यापारी बॅंकांचे राष्ट्रीयीकरण करणे, असे कार्यक्रम त्यांनी जाहीर केल्याबरोबर लोकांमध्ये उत्साह संचारला. त्यामुळे सं.सो.पा.त तीव्र मतभेद झाले. संविद काळात आपण उजव्या पक्षांबरोबर गेलो ही आपली मोठी चूक झाली, असे अनेक कार्यकर्ते म्हणू लागले. १९७६ च्या डिसेंबरच्या मध्यात सं.सो.पा.चे राष्ट्रीय अधिवेशन पुण्यात झाले. उजव्यांनाही सोबत घ्यायला हरकत नाही, असे सं.सो.पा.चे एक नेते राजनारायण मांडत होते. पण त्यांच्या समर्थकांना फार वाव द्यायचा नाही, अशा प्रकारची व्यूहरचना श्री. भाई वैद्य व आम्ही केली होती. यापुढे

शक्यतो अन्य पक्षांबरोबर समझोते करायचे नाहीत. केले तर फक्त डाव्या पक्षाबराबर करायचे, असा ठराव अधिवेशनात मोठ्या बहुमताने संमत झाला. ते अधिवेशन संपतानाच दिल्लीत घोषणा झाली की, इंदिरा गांधींनी लोकसभेचे विसर्जन केले व जानेवारीत लवकरच मध्यावधी निवडणुका होणार हे स्पष्ट झाले.

तिकडे दिल्लीत निवडणुकीसाठी विविध पक्षांच्या हालचाली सुरू झाल्या. संघटना काँग्रेस, जनसंघ, स्वंतत्र आदी पक्षांनी 'इंदिरा हटाव' या घोषणेच्या आधारे आघाडी करायचे ठरवले आणि सोशॅलिस्ट पार्टीही त्यात सहभागी झाली, अशी बातमी आली. आम्ही सगळे हवालदिल झालो. मधुजींना फोन केला तर ते म्हणाले, ''होय बाबा, तसा निर्णय झाला खरा.'' पुढे निवडणुकीत सं.सो.पा.चे पानिपत झाले. जॉर्ज फर्नांडिस वगैरे दिग्गज नेतेही पडले. पक्षाची पार वाताहत झाली.

**नवनिर्माण आंदोलन**

१९७१ च्या निवडणुकीत इंदिराजींना भरघोस बहुमत मिळाले. काही महिन्यांतच पश्चिम बंगाल सरकारने पूर्व पाकिस्तानवर केलेल्या अत्याचारांमुळे बांगलादेशचे आंदोलन बळ धरू लागले. पाकिस्तानबरोबरच्या लढाईत भारताला भूषणावह विजय मिळाला. बांगलादेशची निर्मिती झाली. त्या प्रकरणी इंदिराजींनी केलेल्या कामगिरीची प्रशंसा अनेक नेत्यांबरोबर मधुजींनीही केली. १९७२ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांतही काँग्रेसला मोठे यश मिळाले, पण बांगलादेशातून आलेले ९० लाख निर्वासित व युद्धामुळे वाढलेली महागाई यांमुळे सामान्य माणसे त्रस्त झाली होती. अहमदाबादेत वसतिगृहाच्या मेसचे बिल अचानक वाढले व त्याचे कारण तेल गिरणीवाल्यांनी काश्मीर निवडणुकीसाठी काँग्रेसला मोठ्या देणग्या देऊन तेलाचे भाव वाढवले; हे लोकांना कळल्यावर विद्यार्थ्यांच्या नवनिर्माण आंदोलनाचा भडका उडाला. पक्षीय राजकारणापासून अलिप्त झालेल्या जयप्रकाश नारायण यांनीही नवनिर्माण आंदोलनात उडी घेतली. फर्नांडिसांनी १९७४ च्या मेमध्ये रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप केला. वातावरण चांगलेच तापू लागले. १२ जून १९७४ ला इंदिराजींची लोकसभेवरील निवड रद्द करणारा निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला. पंतप्रधानकीचा राजीनामा द्या, असे दडपण इंदिराजींवर वाढले. शेवटी २५ जूनच्या रात्री अंतर्गत आणीबाणी जाहीर करण्याचा आदेश राष्ट्रपतींनी काढला. रातोरात देशभर विरोधी पक्ष कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्यात आले. वर्तमानपत्रांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली. देशभर दडपशाहीचा वरवंटा फिरला. त्याविरुद्ध लोकसंघर्ष समिती या नावाने सुरू झालेल्या आंदोलनात समाजवादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सामील झाले. यामध्ये पावणेदोन वर्षे गेली.

१९ जाने. १९७७ ला लोकसभेची मध्यावधी निवडणूक घेण्याचे इंदिराजींनी जाहीर केले. झालेल्या दडपशाहीमुळे लोक विरोधी पक्षांना निर्भयपणे मतदान करतील, याबद्दल नेत्यांना भरवसा वाटला नाही. जे.पीं.च्या आग्रहाखातर संघटना काँग्रेस, जनसंघ, समाजवादी व भारतीय लोकदल या चार पक्षांनी एकत्र येऊन जनता पक्ष बनवला. सोशॅलिस्ट पार्टीचे विसर्जन करू नये, असे आम्ही काही जण म्हणत होतो. पण मधुजी म्हणाले, ''आपले अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते आंदोलनामुळे थकले आहेत. परत मोठा संघर्ष करायला ते तयार होतील असे दिसत नाही.'' एसेम, नानासाहेब आदी बहुतेक नेत्यांनी तसेच म्हटले, त्यामुळे सोशॅलिस्ट पार्टीचे विसर्जन झाले.

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाला लोकांचा भरघोस पाठिंबा मिळाला, पण पुरोगामी कार्यक्रमाचा आग्रह धरणे व त्यासाठी ध्येयनिष्ठ, कार्यक्षम कार्यकर्त्यांची मजबूत संघटना याकडे ज्येष्ठ नेत्यांनी पाठ फिरवली. लोकसभेच्या निवडणुकीत जनता पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले तरी समाजवादी धोरणे व चारित्र्य यांबद्दल कटिबद्ध राहून चळवळ चालवण्याचे बहुतेकांच्या मनातून बाजूला पडले. तीन नेत्यांच्या महत्त्वाकांक्षाच्या रस्सीखेचीत जनता पक्ष, तत्त्वनिष्ठ राजकारण व जनशक्ती संघटना बांधण्यासाठीची चिवट ध्येयनिष्ठा यांचा मधु लिमयेंसकट सर्वच नेत्यांनी त्याग केल्याने भारतातील समाजवादी चळवळीला खडतर दिवस आले. तरीही स्वाभिमानी, समतानिष्ठ व सर्जनशील ध्येयवाद हाच जनसामान्यांना आज ना उद्या तारणार आहे. कितीही चढउतार आले तरी लोकशाही समाजवादी विचारसरणी प्रभावशाली झाल्याशिवाय राहणार नाही, असे माझ्यासारख्याला वाटते.

**पन्नालाल सुराणा**
आपले घर, नळदुर्ग, जि.उस्मानाबाद
Mob. 9423734089

चैत्रा रेडकर

# साने गुरुजींचा पंढरपूर मंदिरप्रवेश आणि हिंदू धर्मसुधारणा

साने गुरुजींनी जानेवारी १९४७ ते मे १९४७ या कालावधीमध्ये हा सत्याग्रह केला. या सत्याग्रहाची मुळं १९३२ च्या पुणे करारापर्यंत जातात. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपण स्वतःचं उर्वरित आयुष्य खर्च करू, असं जाहीर वचन गांधींनी या वेळी आंबेडकरांना दिलं होतं, त्याचा संदर्भ या सत्याग्रहामागे होता. स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला गांधीवाद्यांना आवाहन केलं होतं. अस्पृश्यता दूर करण्यासाठी आपण प्रत्यक्षात कोणते प्रयत्न केले याचा लेखाजोखा मांडावा, असं आवाहन विनोबा भावे यांनी या बाबतीत गांधीवाद्यांचे प्रयत्न असमाधानकारक पातळीवरच असल्याचं लक्षात आल्यावर साने गुरुजी व्यथित झाले. स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर अस्पृश्यता व जातीय भेदभाव यांबद्दलची आपली मनोवृत्ती बदलण्याची आत्यंतिक निकड आहे, याची लोकांना आठवण करून देणं गरजेचं असल्याचं गुरुजींना तीव्रतेने वाटलं.

पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांनी पंढरपुरातील विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांनाही प्रवेश मिळावा यासाठी स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला सत्याग्रह केला होता. अलीकडच्या काळात या सत्याग्रहाकडे दुर्लक्ष झाल्याचं दिसतं. जातिआधारित भेदभाव व अस्पृश्यता संपुष्टात आणण्याची जबाबदारी सवर्ण हिंदूंवर आहे, याची जाणीव करून देणारी ही एक महत्त्वाची प्रतीकात्मक कृती होती. यापूर्वी वासाहतिक काळात वायकोम (१९२४-२५), पर्वती (१९२९), काळाराम (१९३०), गुरुवायूर (१९३२) व इतरही काही मंदिर-प्रवेशासाठीचे सत्याग्रह झाले. पण पंढरपूरमधील सत्याग्रह या सर्वांहून वेगळा ठरला, कारण विठ्ठल मंदिराची दारं अस्पृश्यांसाठी स्वेच्छेने खुली करण्यात या सत्याग्रहाला यश मिळालं. पण केवळ याच एका कारणामुळे हा सत्याग्रह दखलपात्र ठरतो असं नव्हे. इतर किमान दोन कारणंही तितकीच महत्त्वाची आहेत.

पहिलं कारण म्हणजे या सत्याग्रहाचं नेतृत्व करणारे साने गुरुजी हिंदू धर्मातील सुधारणेची निकड मांडत होते, पण हिंदू धर्माचं राजकीयीकरण करण्याच्या प्रकल्पापासून त्यांची भूमिका वेगळी होती- हिंदुत्वाचा प्रवाह आणि जातिव्यवस्थेच्या उच्चाटनासाठी हिंदू धर्माला नाकारणं, या दोन्ही राजकीय भूमिकांपासून त्यांनी अंतर राखलं होतं. एका बाजूला, त्यांचा हा सत्याग्रह हिंदू धर्माला सनातन्यांच्या कचाट्यातून मुक्त करू पाहत होता, तर दुसऱ्या बाजूला प्रबुद्ध किंवा अ-प्रबुद्ध 'राजकीय' हितसंबंधांपासूनही हिंदू धर्म वेगळा ठेवण्याचा प्रयत्न करत होता. 'उदार हिंदू धर्मा'चे राजकीय गर्भितार्थ समजून घेण्यासाठी या भूमिकेचं गंभीर विश्लेषण करणं आवश्यक आहे, उदार हिंदू विचारांची समतेच्या लढ्यांसंदर्भातील निष्पत्ती कोणती असेल, हिंदू धर्माची व्यापक चौकट नाकारली नाही, तरीही जातिव्यवस्था नाकारणं किंवा तिचं उच्चाटन करणं शक्य होईल का, उदार हिंदू विचार हिंदुत्वापासून कोणत्या संदर्भात

वेगळा ठरेल; यांसारख्या काही प्रश्नांची या निमित्ताने चर्चा करणे अपरिहार्य बनते.

दुसरे म्हणजे या सत्याग्रहाच्या अनुषंगाने धार्मिक सुधारणांच्या संदर्भात सत्याग्रहाचा वापर कसा असावा, व्यूहरचना कशी असावी व उद्दिष्टं कोणती असावीत याबद्दल गांधीवाद्यांमध्ये चर्चा झाली, त्यामुळेदेखील हा सत्याग्रह लक्षणीय ठरतो. संघटित हिंदू धर्मामधील सुधारणांच्या व्यूहरचना कोणत्या असतील, याबद्दलच्या गांधीवादी आकलनाच्या काही दिशा या चर्चेमधून सूचित होतात. प्रस्तुत निबंधामध्ये या दोन्ही आयामांचं विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.[१]

साने गुरुजींनी जानेवारी १९४७ ते मे १९४७ या कालावधीमध्ये हा सत्याग्रह केला. या सत्याग्रहाची मुळं १९३२ च्या पुणे करारापर्यंत जातात. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपण स्वतःचं उर्वरित आयुष्य खर्च करू, असं जाहीर वचन गांधींनी या वेळी आंबेडकरांना दिलं होतं, त्याचा संदर्भ या सत्याग्रहामागे होता. स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला गांधीवाद्यांना आवाहन केलं होतं. अस्पृश्यता दूर करण्यासाठी आपण प्रत्यक्षात कोणते प्रयत्न केले याचा लेखाजोखा मांडावा, असं आवाहन विनोबा भावे यांनी या बाबतीत गांधीवाद्यांचे प्रयत्न असमाधानकारक पातळीवरच असल्याचं लक्षात आल्यावर साने गुरुजी व्यथित झाले.[२] स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर अस्पृश्यता व जातीय भेदभाव यांबद्दलची आपली मनोवृत्ती बदलण्याची आत्यंतिक निकड आहे, याची लोकांना आठवण करून देणं गरजेचं असल्याचं गुरुजींना तीव्रतेने वाटलं. अस्पृश्यता रद्द करणारे कायदे मंजूर होण्यापूर्वी आणि मंदिर-प्रवेशाबाबतच्या भेदभावजन्य प्रथांना कायदेशीर प्रतिबंध केला जाण्यापूर्वी ही प्रक्रिया सुरू करण्याची निकड साने गुरुजींना वाटली. सवर्ण हिंदूंनी अशा प्रकारच्या भेदभावजन्य प्रथा कायद्याच्या बडग्यामुळे नव्हे तर स्वेच्छेने सोडून द्याव्यात, असं त्यांना वाटत होतं. १९४६ सालच्या अखेरीला वृत्तपत्रांना दिलेल्या निवेदनात साने गुरुजी लिहितात : महात्माजी यांनी १९३२ मध्ये हरिजनांसाठी उपवास केला, त्या वेळेस देशभर एक प्रचंड लाट आली. काही मंदिरे उघडली, कोठे विहिरी मोकळ्या झाल्या. अखिल भारतीय हरिजन सेवक संघ स्थापन झाला. ठायी ठायी हरिजन छात्रालये सुरू झाली. त्या गोष्टीला आता १४ वर्षे झाली. थोड्या महिन्यांपूर्वी पूज्य विनोबाजी भावे यांनी किती मंदिरे उघडली? किती विहिरी मोकळ्या झाल्या? हरिजनांना किती जवळ केले? याचा हिशेब द्या, असे सांगितले. मी त्यांना त्या वेळेस लिहिले, हिशेब काय देणार? आम्ही सांगतो याचा कितीसा पहिणाम होणार? आमच्यासारख्यांनी बलिदाने केली पाहिजेत. मी सात-आठ महिन्यांत जो प्रचार (हंगामी सरकारसाठीचा निवडणूक प्रचार) केला त्यात अस्पृश्यतेविषयीच सांगत असे. मुंबई सरकार आता कायदाही करत आहे. परंतु मनोबुद्धीतच जी क्रांती झाली पाहिजे, ती अद्याप झाली नाही. पंढरपूर मंदिर मोकळे व्हावे; पांडुरंगाच्या पायी हरिजनांना डोके ठेवता यावे, यासाठी आज मी एकादशीपासून उपवास करत आहे. पंढरपूरच्या पांडुरंगाच्या मंदिराच्या व्यवस्थापकांना माझी विनंती आहे की, त्यांनी देवाजवळ सर्व लेकरांस येऊ द्यावे. तशी त्यांनी घोषणा करावी. तोपर्यंत मी उपवास करत राहीन.[३]

या सत्याग्रहासाठी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराची निवड करण्यात आली, हीसुद्धा लक्षणीय बाब होती. विठ्ठल हा समन्वयवादी भक्ती-परंपरेचा देव आहे आणि महाराष्ट्रातील ग्रामीण लोकाचाराशी त्याचे आंतरिक संबंध आहेत. महाराष्ट्रभरातून आणि कर्नाटकमधील काही भागांमधून आलेले वारकरी आषाढात पंढरपूरची वारी करतात. विठ्ठलाची आराधना परमेश्वर म्हणून नव्हे, तर ‘सखा पांडुरंग’ व ‘विठू माउली’ अशा रूपांमध्ये केली जाते.[४] वारकरी पंथातील लोक विविध जातीय पार्श्वभूमींचे आहेत, त्यात मोठ्या संख्येने स्त्रिया आणि अगदी मुस्लीम धर्मातील लोकही आहेत.[५] पारंपरिक पद्धतीनुसार वारकरी एकमेकांना भेटले की वय किंवा इतर सामाजिक भेदांच्या अलाहिदा एकमेकांच्या पाया पडतात आणि मग एकमेकांना आलिंगन देतात. या परंपरेचा गाभा समन्वयवादी व समतावादी असल्याचं मानलं जात असलं, तरी १९४७ च्या सत्याग्रहापूर्वी केवळ सवर्ण भक्तांना आणि शूद्र वर्णातील व कारागीर जातींमधील व्यक्तींनाच मंदिरात प्रवेशाची मुभा होती. अस्पृश्यांना स्पष्टपणे प्रवेश नाकारण्यात येत असे. अस्पृश्यांच्याही दिंड्या दर वर्षी वारीसोबत पंढरपुरात पोचत असत, पण त्यांना मंदिरात प्रवेश दिला जात नसे. रोहिदास दिंडी, चोखामेळा दिंडी व अजामेळा दिंडी या अनुक्रमे चर्मकार, महार व मातंग समाजाच्या दिंड्यांना पहिल्या तेवीस सवर्ण दिंड्यांपासून वेगळं काढलं जात असे. त्यांच्या दरम्यान एक घोडा चालत असे.[६] या तीन जातींना वारीतही अस्पृश्यतेची वागणूक दिली जात असे. त्यांच्या दिंड्यांना

पंढरपुराबाहेर इंद्रायणी नदीच्या काठावरच थांबवले जाई. इतर दिंड्या मात्र विठ्ठलाच्या भेटीसाठी शहरात प्रवेश करत.

हा भेदाभेद नष्ट व्हावा म्हणून महाराष्ट्रभरात चार महिने प्रचारदौरा काढून साने गुरुजींनी जागोजागी भाषणं केली, या भाषणांचे सार नवयुगमध्ये ४ मे १९४७ रोजी त्यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्राला अखेरची हाक' या लेखात सापडते. यातून त्यांनी वारकरी पंथातील समतेची मर्यादा उघड केली. डॉ. आंबेडकरांनी या मर्यादांवर कायमच बोट ठेवलं होतं. ''वारकऱ्यांना कल्पनेच्या पातळीवर समतेचा आभास अनुभवता येतो, पण एकदा ती/तो गावात प्रवेश करता झाला की आभास नष्ट होतात. गावाची व्यवस्था जातीयवादी तर्कपद्धतीनुसार चालते,'' हे साने गुरुजींनी त्यांच्या भाषणांमधून व लेखनातून वारंवार मांडले. समता केवळ पोथिनिष्ठ असू नये, तर ती अनुभूतीच्या पातळीवर यायला हवी, हा त्यांचा आग्रह होता. विठ्ठल ही समचरण देवता असल्यामुळे वारकरी परंपरेचा खरा संदेश समतेचा आहे, याची आठवण साने गुरुजींनी विठ्ठलभक्तांना देऊ पाहत होते. आपला सत्याग्रह वारकरी परंपरेतील 'सत्य' व समता या अस्सल प्रेरणा जागी करण्यासाठी असल्याचं त्यांनी भाषणांमधून वारंवार सांगितलं. या सत्याग्रहाद्वारे विठ्ठलभक्तांप्रमाणेच मंदिरातील बडवे आणि विश्वस्त यांचंही मनपरिवर्तन घडवण्याचा साने गुरुजींचा प्रयत्न होता.

गुरुजींच्या या प्रयत्नाला महाराष्ट्राच्या विविध भागांमधून बऱ्यापैकी सकारात्मक प्रतिसाद मिळाला. हरिजन सेवक संघाच्या दस्तऐवजांनुसार, या सत्याग्रहादरम्यान २०० मंदिरं अस्पृश्यांसाठी खुली करण्यात आली. साने गुरुजींच्या दौऱ्याला प्रतिसाद म्हणून काही विहिरीदेखील खुल्या करण्यात आल्या. पंढरपूरमधील मंदिर खुलं व्हावं यासाठी हरिजन सेवक संघाने घेतलेल्या स्वाक्षरी मोहिमेवर १० लाख लोकांनी सह्या केल्या.[७]

महाराष्ट्रातील विभिन्न सामाजिक-राजकीय, त्याचप्रमाणे धार्मिक गटांकडून मात्र या सत्याग्रहाला संमिश्र प्रतिसाद

साने गुरुजी व एस.एम.जोशी, पंढरपूर दौऱ्यावर असताना




Date of Publication : 10-5-2021

मिळाला. वारकरी मठांकडून मिळालेले प्रतिसाद परस्परभिन्न होत. देहूकर मठ व अमळनेरकर मठ यांनी मंदिरप्रवेशाला विरोध केला, तर सातारकर मठ व तनपुरे मठ यांनी या मंदिरप्रवेशाला सक्रिय पाठिंबा दिला. पंढरपूरमधील भगवंतशास्त्री धारूरकर यांच्या नेतृत्वाखालील एका गटाने विटाळापासून बचाव करण्यासाठी विठ्ठलमूर्तीमधील प्राण काढून घेणारी पूजा केली. त्यानंतर हा प्राण घागरीत घालून धारूरकरांच्या घरात बंदिस्त ठेवण्यात आला.[८] वाईतील नारायणशास्त्री मराठे यांनी मंदिरप्रवेशाला पाटिंबा दिला आणि धारूरकरशास्त्रींनी केलेल्या पूजेच्या पावित्र्याविषयी प्रश्न उपस्थित केले. वारकरी, मठ आणि शास्त्री-परंपरा या हिंदू धर्माच्या अनुयायांकडून मंदिरप्रवेशाच्या मुद्द्यावर परस्परांहून भिन्न प्रतिसाद आले. यातून एका अर्थी हिंदू धर्माविषयीच्या मतांची परस्परभिन्नताही दिसून येत होती.[९]

साने गुरुजींच्या सत्याग्रहाला दलित चळवळीच्या व ब्राह्मणेतर चळवळीच्या नेत्यांचाही संमिश्र प्रतिसाद मिळाला. मंदिरप्रवेशासाठी सुरू असलेल्या सत्याग्रहाबद्दल 'नवयुग' साप्ताहिकाने डॉ. आंबेडकरांना मत विचारले, तेव्हा ''अशा तऱ्हेच्या संघर्षात काही अर्थ नाही, अशी आता माझी पूर्ण खात्री झाली आहे,'' असं ते म्हणाले.[१०] ब्राह्मणेतर चळवळीचं मुखपत्र असलेल्या 'दीनमित्र'चे संपादक मुकुंदराव पाटील यांनी हा सत्याग्रह अनावश्यक असल्याचं मत मांडलं, याउलट साताऱ्यातील पत्रीसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील व रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील या ब्राह्मणेतर चळवळीतील नेत्यांनी साने गुरुजींच्या सत्याग्रहाला पाठिंबा दिला.[११] ब्राह्मणी समाजव्यवस्थेतील उतरंडीची वर्णव्यवस्था व हिंदू धर्माचं तत्त्वज्ञान यांच्यातील संबंधांबाबत डॉ. आंबेडकरांनी सैद्धान्तिक मांडणी केली होती. पंढरपूरमधील सत्याग्रहात तथ्य नसल्याचं त्यांचं मत या मांडणीतूनच उगम पावलं होतं. या सैद्धान्तिक मांडणीच्या संदर्भात साने गुरुजींचा सत्याग्रह निश्चितपणे विवाद्य ठरतो. वायकोम (१९२४-२५), पर्वती (१९२९), गुरुवायूर (१९३१) व इतर काही मंदिरप्रवेशाची आंदोलनं यापूर्वी झाली होती. काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या पार्श्वभूमीवर १९३५ साली डॉ.आंबेडकरांनी घोषणा केली की, 'माझा जन्म हिंदू म्हणून झाला असला, तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही.' याचाच अर्थ हिंदू धर्माच्या मंदिरात प्रवेश हा जातिनिर्मूलनाच्या चळवळीसाठी महत्त्वाचा मुद्दा उरला नव्हता. महात्मा फुल्यांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत विकसित होत गेलेल्या जातिप्रश्नाच्या आकलनाच्या संदर्भात मंदिरप्रवेशाला फारशी प्रस्तुतता उरलेली नसतानाही साने गुरुजींनी मंदिर प्रवेशाचा मुद्दा हाती का घेतला हे पाहणे गरजेचे आहे.

आणखी एका अत्यंत महत्त्वाच्या कारणासाठी या संघर्षामागील तर्क स्पष्ट होणे गरजेचे आहे. वि.दा. सावरकरांसारख्या हिंदू राष्ट्रवाद्यांनीही अस्पृश्यतेचा प्रश्न हाती घेतला होता.[१२] हिंदू अस्मिता एकसंध करण्याच्या मार्गात जातिव्यवस्थेचा अडसर होत असल्याचं ते मानत. अस्पृश्यांना कोणत्याही बंधनाविना प्रवेश देणारी मंदिरं बांधावीत, असं आवाहन सावरकरांनी त्यांच्या अनुयायांना केलं. त्यांची ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी १९३१ मध्ये रत्नागिरी येथे पतित पावन मंदिराची उभारणी झाली. ही कल्पना देशभरात घेऊन जाण्यासाठी हिंदू राष्ट्रवादी उत्सुक होते. असिंधू-सिंधूपर्यंत पसरलेल्या हिंदू बांधवांच्या संघटनासाठी जातीचा अडथळा दूर करायला हवा, ही हिंदू राष्ट्रवाद्यांची भूमिकाच साने गुरुजींच्या मंदिरप्रवेशाच्या चळवळीतून दृढ होत होती का, या संदर्भातही साने गुरुजींच्या दृष्टिकोनाची छाननी करायला हवी. आंबेडकर व त्यांच्या चळवळीला तथ्यहीन वाटणारा मंदिरप्रवेशाचा प्रश्न हाती घेणं साने गुरुजींना का आवश्यक वाटलं? ते हिंदू संघटनाचं ध्येय समोर ठेवून होते का आणि त्यांच्या सत्याग्रहाचा हिंदू संघटनासंदर्भातील गर्भितार्थ कोणता होता?

डॉ. आंबेडकर व त्यांच्या अनुयायांना मंदिरं नको आहेत, तर राजकीय हक्क हवे आहेत; अशा वेळी आपण मंदिरप्रवेशाचा मुद्दा उपस्थित करून लोकांची दिशाभूल का करत आहात, असा स्पष्ट प्रश्न एका मुलाखतीत साने गुरुजींना विचारण्यात आला. यावर गुरुजी म्हणाले, ''मी कोणाचीही दिशाभूल करत नाही. मला हिंदू धर्म अधिक उदार व्हावा असे वाटते. स्पृश्यांची दृष्टी मोठी व्हावी, अस्पृश्यांचा उद्धार व्हावा म्हणून हा प्रयत्न आहे. हरिजनांना राजकीय हक्क मिळू नयेत असे म्हणणारा मी नाही. मी राजकीय माणूस नाही. मी माझ्या क्षेत्रात माझ्या परीने कार्य करतो आहे. हरिजनांनी स्वतःला उर्वरित समाजापासून विभक्त राहून हरिजनांना राजकीय हक्क कसे मिळतील? मुंबई प्रांतातील सर्व विजयी उमेदवार आंबेडकरांच्या राजकीय

पक्षाचे असते, तरी ते फक्त स्वतःच्या बळावर सरकार स्थापन करू शकले असते का? इतरांपासून स्वतःला विभक्त करून आम्हांला राजकीय हक्क उपभोगता येणार नाहीत'', असे निवेदन डॉ.आंबेडकरांनीच काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध केले होते...[१४] आगामी काळात स्वतंत्र भारतामध्ये अस्पृश्यांना जमिनीचे पुनर्वाटप केले जाईल, त्यांना शिक्षणात समान संधी दिल्या जातील, यातून त्यांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती सुधारेल, अशी आशाही साने गुरुजींनी या मुलाखतीत व्यक्त केली. पण हे होईपर्यंत बाकीच्या लोकांनी त्यांची अस्पृश्यतेबद्दलची मनोबुद्धी व मानसिकता बदलण्यापासून का थांबावे, ते स्वतःहून सर्व भेदभावांच्या रूढी का थांबवू शकत नाहीत, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले.[१५] आपला लढा लोकांची जाणीव बदलण्यासाठीचा आहे, त्यासाठी भौतिक वास्तवात क्रांती होण्याची वाट पाहण्याची गरज नाही, अशी साने गुरुजींची धारणा होती. भौतिक परिस्थिती बदलली, तरीही मानसिकता बदलण्यासाठी स्वतंत्रपणे प्रयत्न करावेच लागतील, असं त्यांचं म्हणणं होतं. लोकांनी हिंदू राज्य स्थापन करण्याच्या राजकीय कार्यक्रमासाठी लोकांना एकत्र आणण्यापेक्षा त्यांना हिंदू धर्माच्या खऱ्या प्रेरणेनुसार आचरण करायला सांगावं आणि पर्यायाने अधिक माणुसकीचं जीवन जगायला वाव मिळावा, म्हणून आपण हा प्रयत्न करत असल्याचं साने गुरुजींनी ठामपणे मांडलं. या दोन भूमिकांमधील सूक्ष्म- पण मूलभूत स्वरूपाचा भेद दिसतो. वि.दा. सावरकर यांच्यासारखे हिंदू राष्ट्रवादी आणि हिंदू महासभेचे मुंजे व भोपटकर यांनी या सत्याग्रहाला पाठिंबा जाहीर केलेला असतानाही साने गुरुजींनी त्यांना आपला मंच वापरू दिला नाही. चार महिने चाललेल्या दौऱ्यामध्ये व दहा दिवसांच्या उपोषणकाळातही साने गुरुजींनी हिंदू राष्ट्रवाद्यांपासून स्पष्टपणे अंतर राखलं.

अस्पृश्यतेबद्दलचा गांधीवादी दृष्टिकोन आपण स्वीकारलेला असल्याचं साने गुरुजी या आंदोलनादरम्यान ठामपणे सांगत होते. परंतु, इतर गांधीवादी मंडळींना आणि खुद्द गांधींनासुद्धा पंढरपूरच्या सत्याग्रहाची प्रस्तुतता व अर्थपूर्णता यांबद्दल पुरेशी खात्री वाटत नव्हती. हे आंदोलन सुरू करण्यामागील साने गुरुजींच्या हेतूंबद्दल काही गांधीवादी साशंक असण्याला विशिष्ट ऐतिहासिक कारणं होती. शिवाय, साने गुरुजींचा दृष्टिकोन अस्सल सत्याग्रही व्यवहाराच्या नियमांशी बांधिलकी राखणारा आहे का, याबद्दल काही जण साशंक होते. यातील ऐतिहासिक कारणांची मुळं १९३० च्या दशकापर्यंत मागे जातात. त्या वेळी साने गुरुजी पूर्व आणि पश्चिम खान्देशात काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते म्हणून राहत होते. या प्रदेशातील कापड कारखान्यांमधील मजुरांना आणि शेतकऱ्यांनाही संघटित करण्यात त्यांनी कळीची भूमिका निभावली होती. विशेष म्हणजे या टप्प्यावर काँग्रेससोबत संयुक्त आघाडी करण्यासाठी उत्सुक असलेल्या कम्युनिस्टांनी साने गुरुजींना साथ दिली होती. कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे व कॉम्रेड वसंतराव भागवत यांचा साने गुरुजींशी निकटचा संपर्क होता. साने गुरुजींनी १९३६ मध्ये त्यांच्या मदतीने 'काँग्रेस' हे नियतकालिक सुरू केले होते. 'काँग्रेस मायबाप, जाळील सर्व ताप,' असं या नियतकालिकाचं घोषवाक्य होतं. 'काँग्रेस' पत्रातील संपादकीय लेखांमधून साने गुरुजी मुंबई प्रांतातील काँग्रेस सरकारच्या धोरणांची चिकित्सा करत. काही वेळा ही धोरणं गांधीविचारांशी विसंगत आणि काँग्रेसच्या मूळ प्रेरणेशी प्रतारणा करणारी असल्याची टीकाही ते करत असत. यामुळे ज्येष्ठ गांधीवादी व काँग्रेसमधील नेते साने गुरुजींच्या राजकीय आकलनाविषयी व प्रगल्भतेविषयी साशंक झाले होते. शंकरराव देव यांच्या मते, साने गुरुजींच्या कृती काँग्रेसला कमकुवत करणाऱ्या होत्या आणि या प्रदेशात समाजवादी-साम्यवादी विचारांना बळकटी आणण्यासाठी त्यांचा उपयोग होत होता.[१६] १९३९ नंतर कम्युनिस्टांनी दुसऱ्या महायुद्धाला पाठिंबा द्यायचा निर्णय घेतला आणि काँग्रेससोबतची आघाडी तोडली. त्यांनी सोव्हिएत संघाशी दोस्ती असलेल्या ब्रिटिशांना पाठिंबा दिला. ब्रिटिशांना पाठिंबा दिल्यामुळे कम्युनिस्टांचं स्वातंत्र्य अबाधित राहिलं, मात्र काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना 'चले जाव' आंदोलनातील सहभागामुळे तुरुंगवास भोगावा लागला. कम्युनिस्ट साने गुरुजींचा वापर करत असल्याची देव यांची शंका कालांतराने खरी ठरली. आपण सद्हेतूने केलेल्या मदतीचा वापर करून कम्युनिस्टांनी खान्देशात कामगार संघटनांमध्ये शिरकाव केल्याचं लक्षात आल्यावर साने गुरुजी व्यथित झाले, पण तोवर बराच उशीर झाला होता. त्यांनी कम्युनिस्टांपासून फारकत घेतली, पण काँग्रेसचा विश्वासही त्यांनी गमावला होता, त्यामुळे ते परिघावर ढकलले गेले.

या पार्श्वभूमीवर, पाच वर्षांनी साने गुरुजींनी मंदिरप्रवेशाचा प्रश्न हाती घेतला. देव आणि काँग्रेसचे इतर

नेते साने गुरुजींच्या हेतूविषयी स्वाभाविकपणे साशंक झाले होते. काँग्रेसने मुंबई विधिमंडळात मंदिरप्रवेशाचा अधिनियम मांडला आणि महिन्याभराच्या आत तो अमलात येणार होता.[१७] त्यामुळे साने गुरुजींचे नवीन साथीदार झालेले समाजवादी त्यांचा वापर करून काँग्रेसचं श्रेय हिरावून घेऊ पाहत आहेत, अशी काँग्रेसच्या नेत्यांची धारणा झाली. साने गुरुजी उत्कट, अतिहळवे, भावनिकदृष्ट्या अस्थिर व्यक्ती आहेत, अशी प्रतिमा निर्माण झाली होती; शिवाय, १९३६ मध्ये युनायटेड फ्रंट स्थापनेत त्यांनी सक्रिय भूमिका बजावली होती. या पार्श्वभूमीवर देव आणि काँग्रेसच्या इतर नेत्यांनी गुरुजींचं उपोषण थांबवण्यासाठी गांधीजींकडे साकडं घातलं. मुंबई प्रदेश काँग्रेस समितीने साने गुरुजींना उपोषण थांबवण्याचं आवाहन केलं. गुरुजींनी केवळ जागरूकतेची मोहीम सुरू ठेवावी, असं समितीच्या निवेदनात सुचवलं होतं. या सत्याग्रहामध्ये हरिजन सेवक संघ सहभागी झाला असला, तरी साने गुरुजींनी तत्काळ उपोषण थांबवावं, अशी तार महात्मा गांधींनी केली.

साने गुरुजींच्या आंदोलनाबद्दल गांधीवाद्यांकडून व्यक्त होणाऱ्या साशंकतांच्या दुसऱ्या प्रवाहाचे प्रतिनिधी म्हणून विनोबा भावे यांच्या दृष्टिकोनाचा विचार करता येईल. चार महिने सुरू असलेल्या जागरूकता मोहिमेला विनोबांनी पाठिंबा दिला होता, मात्र साने गुरुजींच्या उपोषणाला त्यांचा पाठिंबा नव्हता. सत्याग्रही आचरणासंदर्भात विनोबांनी काही कळीचे मुद्दे उपस्थित केले. मंदिराच्या विश्वस्तांनी मंदिर अस्पृश्यांसाठी खुलं करावं याकरिता त्यांच्यावर नैतिक दडपण आणणारे आमरण उपोषण करू नये, असं सांगणारं पत्र विनोबांनी साने गुरुजींना लिहिलं होतं. धार्मिक सुधारणांच्या बाबींमध्ये सत्याग्रहाचा वापर कसा करावा, याबद्दलच्या गांधीवादी भूमिकेचं सार म्हणून विनोबांच्या या पत्राकडे पाहता येईल. साने गुरुजींना २५ एप्रिल १९४७ रोजी लिहिलेल्या पत्रात विनोबा लिहितात, ‘‘सहा महिन्यांपूर्वी तुम्ही उपवासाचा संकल्प केलात; त्याहून आज फार वेगळी परिस्थिती आहे. जनमत मंदिरप्रवेशाला अनुकूल झाले आहे. त्याचे श्रेय पुष्कळसे तुम्हांलाच आहे. त्यामुळे मंदिरप्रवेश बिल शक्य झाले. लोकमतानुसारी कायदा अहिंसेत येतो. असा कायदा हे केवळ लोकमताचे प्रकाशन असते. म्हणून कायद्याने मंदिर उघडण्यात गोडी नाही, असे अशा कायद्याबद्दल म्हणता येत नाही. कायदा झाला तरी तो अमलात येतो की नाही, हा सवाल अशा कायद्याबाबत उठू शकत नाही. मग हा उपवास कोणासाठी? बडव्यांसाठी? बडव्यांचे आणि आमचे काही विचारांचे नातेगोते असते तर गोष्ट वेगळी. मग काय दोन-चार महिन्यांनी होणारी गोष्ट आत्ताच व्हावी म्हणून? अशी घाई सुधारकाला आणि सत्याग्रहीला न जमणारी आहे. मग काय देवळाचे निमित्त करून एकूण सर्वच हरिजन प्रश्नांबाबत लोकांची तयारी व्हावी म्हणून तर ते एखादे ‘निमित्त’ साधू पाहणे बरोबर नाही. सत्याग्रहाला ‘स्पेसिफिक’ अशीच बाब पाहिजे. सामान्य समाजशुद्धीसाठी अलगपणे उपवास करता येतो; पण तो आमरण असू शकत नाही. मुदतीचाच असतो.’’[१७]

गांधींनी तार पाठवली, विनोबांनी पत्र पाठवलं, तरीही साने गुरुजींनी उपोषणाचा निर्णय बदलला नाही. गांधींच्या पत्राला उत्तर देताना साने गुरुजींनी लिहिलं, ‘‘तुम्हांला जी मंडळी सांगायला आली, त्यांच्याजवळ मी चार तास हृदयातील अनंत दुःखे सांगितली. अनंत प्रश्न सांगितले. त्यातील ‘लोक नावे ठेवतात’ हा एकच मुद्दा या मुत्सद्दी लोकांनी तुम्हांसमोर ठेवला आणि तेवढ्यावर एकांगी निर्णय देऊनही आपण मोकळे होता. हा न्यायही नाही, समताही नाही, असे मी नम्रपणे म्हणण्याचे धारिष्ट्य करतो. कायदा केव्हा होईल तेव्हा होवो. माझे डोळे त्याकडे कधीच नव्हते. मी बडवे मंडळींसमोर उभा आहे. या उपवासकाळात एखाद्या वटहुकुमाने मंदिर उघडले, तर तांत्रिकदृष्ट्या प्रतिज्ञापूर्ती होईल; परंतु मला आनंद नाही. आत्मक्लेशाने ब्रिटिशांचीही हृदये आम्ही वळवू पाहतो. मग बडवे मंडळींची मी का पाहू नये? मी हे दुःखाने लिहीत आहे, तुम्ही जाणालच; परंतु काही क्षण असे असतात की, सारे जग विरुद्ध झाले, तर आपण अचल राहावे ही तुमचीच शिकवण आहे. जोपर्यंत दुसऱ्याचे युक्तिवाद वा निर्णय मला, माझ्या मनोदेवतेला पटत नाही, तोपर्यंत माझ्याशी मी सत्यनिष्ठ राहिलेच पाहिजे. दुसऱ्यांनी मला चुकीचे म्हटले तरी चालेल. थोर मोठे मला चूक म्हणाले, तर दुःख होईल; परंतु माझ्या मनाने मला चूक म्हणणे हे सर्वांत वाईट...’’[१८] गांधी व विनोबा यांनी उपोषणावर आक्षेप घेतलेले असूनही, साने गुरुजींनी त्यांचा आंतरिक आवाज ऐकून १ मे १९४७ रोजी आमरण उपोषण सुरू केलं. हे उपोषण १० दिवस सुरू राहिलं.

लोकांचा दबाव, साने गुरुजींचा आत्मक्लेश, ग. वि.

मावळंकर यांनी केलेल्या कुशल वाटाघाटी, यांमुळे १० मे रोजीच्या मध्यरात्री पंढरपूर मंदिराच्या बहुसंख्य विश्वस्तांनी मंदिरप्रवेशाच्या बाजूने मत दिलं. ११ मे १९४७ रोजी अस्पृश्यांनी विठ्ठलमंदिरात प्रवेश केला आणि साने गुरुजींनी उपोषण सोडलं. तेव्हापासून पंढरपूरचं मंदिर सर्व जाती-जमातींसाठी खुलं आहे. वारीमध्ये चालणाऱ्या दिंड्यांच्या मध्ये घोड्याला दौडवून वेगळ्या ठेवल्या जाणाऱ्या अस्पृश्य दिंड्या आता मुख्य मिरवणुकीचा सलग भाग म्हणून आता वारी करतात.[१९]

सामाजिक-राजकीय सुधारणांसाठी सत्याग्रहाचा वापर कसा करावा, याबद्दलच्या वादचर्चेसाठी एक नमुनेदार दाखला म्हणून पंढरपूरमधील मंदिरप्रवेश सत्याग्रहाचा विचार करता येतो. अस्सल गांधीवादी तत्त्वाप्रमाणे साने गुरुजींनी सत्याग्रह करण्याच्या पुरेसं आधी मंदिराच्या विश्वस्तांना सूचना केली होती आणि त्यांच्या सदसद्विवेकाला आवाहनही केलं होतं. विठ्ठलभक्तांकडूनही आणि या बदलाच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या इतर घटकांकडून त्यांनी पाठिंबा मिळवला होता. मंदिरप्रवेशाला विरोध करणाऱ्या सनातन्यांसह जवळपास सर्वांशी त्यांनी सार्वजनिक पातळीवर वादचर्चा केली होती. एका सार्वजनिक सभेमध्ये मंदिरप्रवेशाचे विरोधक विश्वास डावरे [२०] यांना साने गुरुजी व सेनापती बापट यांनी मंचावर येऊन आपली मतं मांडण्यास सांगितलं होतं, आणि नंतर साने गुरुजींनी डावरे यांचा युक्तिवाद एकेक मुद्दा घेऊन खोडून टाकला, याबद्दलचे वृत्तान्त तत्कालीन वृत्तपत्रांमध्ये उपलब्ध आहेत. साने गुरुजींनी विश्वस्तांना आमरण उपोषणाची सूचनाही प्रत्यक्ष उपोषण सुरू करण्याच्या पुरेशी आगाऊ दिली होती. सत्याग्रहाचे नियम कसोशीने पाळल्यामुळे तात्कालिक उद्दिष्ट गाठण्यात या सत्याग्रहाला यश मिळालं, असे म्हणता येऊ शकते.

२

पंढरपुरातील मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह म्हणजे हिंदू धर्म अधिक समावेशक व प्रस्तुत करण्याचा प्रयत्न आहे, अशी साने गुरुजींची भूमिका होती. या सत्याग्रहाद्वारे, विशेषतः महाराष्ट्रभरातील चार महिन्यांच्या प्रचारदौऱ्याद्वारे साने गुरुजींनी 'जातीयवादी भेदभाव नष्ट करण्याची गरज केवळ जातिव्यवस्थेच्या पीडितांनाच नसून जातिव्यवस्थेच्या लाभधारकांनाही आहे,' हे बिंबवण्याचा प्रयत्न केला. जातिव्यवस्थेच्या लाभधारकांनी, म्हणजे उच्च-जातीयांनी दलितांच्या उद्धारासाठी नव्हेत, तर स्वतःच्या नैतिक वाढीसाठी व मानवता साध्य करण्यासाठी भेदभावाच्या प्रथा सोडून द्यायला हव्यात; ही भूमिका निःसंशयपणे विवाद्य आहे, मात्र ही भूमिका जातीय भेदभावविरोधी संघर्षामधील सवर्णांच्या भूमिकेपुरती मर्यादित ठेवता येणार नाही. पुरुषसत्ता, भांडवलशाही यांसारख्या विविध श्रेणीबद्ध सामाजिक व्यवस्थांमधील लाभधारकांची समतेच्या संघर्षातली भूमिका काय असेल, या संदर्भातले प्रश्नही या वादाच्या अनुषंगाने व्यापक पातळीवर विचारात घ्यावे लागतील. शोषण-व्यवस्थेच्या लाभधारकांना संबंधित व्यवस्था अन्याय्य असल्याचं लक्षात आल्यावर ती नाकारण्यासाठी त्यांनी कोणत्या व्यूहरचना आत्मसात कराव्यात, दडपशाही नाकारण्यासाठी त्या व्यक्तीला कोणते अवकाश वापरता येतील; या दृष्टिकोनातून विचार केला, तर पंढरपूरमधील सत्याग्रह केवळ सामिलीकरणाचा प्रयत्न म्हणून नाकारता येणार नाही. विशेषतः साने गुरुजींच्या संदर्भात हे लक्षात घ्यायला हवं की, जातीय शोषण संपवण्यासाठी मंदिरप्रवेश हा एकमेव किंवा पुरेसा उपाय आहे, असं त्यांनी कधीच मानलं नाही. भूमिहीन मजुरांना, विशेषतः अनुसूचित जातींमधील मजुरांना शेतजमिनींचं पुनर्वाटप करायला हवं, ही भूमिका त्यांनी वारंवार मांडली.[२१] अस्पृश्यांच्या राजकीय सबलीकरणाला त्यांचा पाठिंबा होता, हे आधी नमूद केलं आहेच. गांधीविचारांचं ठोस अधिष्ठान असलेल्या साने गुरुजींच्या व्यूहरचनेमध्ये जातीय शोषणाला आव्हान देण्याचा व हे शोषण नाकारण्याचा प्रयत्न दिसतो, पण तसं करत असताना त्यांनी हिंदू धर्माला नकार देण्याऐवजी या धर्मातील सुधारणेचा पर्याय स्वीकारलेला आहे. शिवाय, राजकीय व आर्थिक उपायांना दिलेला हा पर्याय नसून या उपायांच्या जोडीने धर्मातील सुधारणा करायला हव्यात, अशी साने गुरुजींची भूमिका दिसते. साने गुरुजींनी एका ठिकाणी लिहिलं आहे की, डॉ. आंबेडकर व श्री. राजभोज यांच्या मते हिंदुधर्मीय बुद्धधर्मी झाले म्हणजे जातीयता जाईल. एक तर बुद्धांना दशावतारात घालून त्यांची 'अहिंसा परमो धर्म' वगैरे शिकवण घेऊन आम्ही बौद्ध धर्म आत्मसात केलाच होता; परंतु हिंदू धर्माऐवजी बौद्ध धर्म नाव घेतल्याने का क्रांती होणार आहे? ख्रिश्चन धर्मात गेलेल्यात हा ब्राह्मण-ख्रिश्चन, हा महार-ख्रिश्चन असे भेद आम्ही ठेवलेच आहेत. बौद्ध धर्म नाव घेतलं तरी ही खोड का जाणार आहे? धर्माची नावे

बदला, पक्षांची नावे बदला, जातीचे बिल्ले लावूनच आपण सर्वत्र असेच मिरवणार.(...)[२२] यामागील मनोवृत्ती बदलणं आवश्यक आहे, असं साने गुरुजी म्हणत होते. 'मनातली घाण जावो म्हणजे बाहेरची जाईल' – यातून दोन मूलभूत मुद्दे पुढे येतात. एक, आर्थिक नियतिवादापासून अंतर राखण्याचा पर्याय जाणीवपूर्वक निवडल्यास त्याची वासलात 'ब्राह्मणी सुधारणावाद' म्हणून लावता येईल का? दोन, जातिव्यवस्थेचं उच्चाटन करण्यासाठी हिंदू धर्म नाकारणं अत्यावश्यक आहे का? हिंदू धर्मात सुधारणा शक्यच नाही का?

हिंदू धर्माच्या संदर्भात धार्मिक सुधारणांची मांडणी कशी करता येईल, या प्रश्नाला विविध प्रकारचे प्रतिसाद येतील – हिंदू धर्म सुधारण्याची गरजच नाकारणाऱ्यांपासून ते हिंदू धर्म सुधारण्याची शक्यता नाकारणाऱ्यांपर्यंत अनेक प्रकारचे हे प्रतिसाद असतील. हिंदू धर्माचे कट्टर समर्थक हिंदू जीवनदृष्टी, रूढी, प्रथा, समाजरचना या प्रत्येक पैलूचा तात्त्विक आधार मांडू पाहतील आणि हिंदू धर्म सुधारण्याची गरजच नाकारतील. दुसऱ्या बाजूला, हिंदू धर्म म्हणजे मनुस्मृतीद्वारे संहितीकरण झालेला ब्राह्मणी धर्म, ही मांडणी स्वीकारली तर हिंदू धर्म सुधारण्याची शक्यताच मोडीत निघते. त्यामुळे हिंदू धर्मातील अंगभूत श्रेणीबद्धता नाकारण्यासाठी हा धर्मच नाकारण्याची आवश्यकता असल्याची मांडणीही आपल्याला परिचित आहे. या दोन भूमिकांच्या मध्ये कुठेतरी साने गुरुजींसारख्या व्यक्तींची भूमिका येते. त्यांनी हिंदू धर्माचा अधिक मानवी आशय पुढे आणण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाबाबतीतही चिकित्सक प्रश्न उपस्थित करता येतातच. मंदिरकेंद्री उपासना, पौरोहित्य, वारी, विधी, या गोष्टी सुधारित हिंदू धर्माचा आवश्यक भाग राहतील की त्यांची अर्थपूर्णता संपुष्टात येईल? सुधारित हिंदू व पारंपरिक हिंदू हे दोघेही सारख्याच रूढी पाळणार असतील, तर त्या दोघांमध्ये भेद कसा करायचा? या सुधारित हिंदू धर्माला पुरोहितवर्गापासून फारकत घेता येईल की ब्राह्मणेतर व स्त्रिया यांना पौरोहित्याचा अधिकार दिल्याने हिंदू धर्म अधिक समावेशक होईल. पूजा करताना कोणते मंत्र उच्चारले जातील; त्यात श्रेणीबद्ध वर्णव्यवस्थेचं समर्थन करणाऱ्या पुरुषसूक्ताचा व तत्सम इतर स्त्रोतांचा समावेश असेल का? विशेषतः प्रार्थनेच्या अधिकारासंदर्भातील लिंगभावात्मक भेदभावाचा प्रश्न सुधारित हिंदू धर्मात कशा रीतीने हाताळला जाईल? कार्तिकेय, अयप्पा, शनी यांसारख्या देवांच्या मंदिरात पारंपरिकरीत्या स्त्रियांच्या प्रवेशाला बंदी आहे, मग सुधारित हिंदू धर्मामध्ये ही मंदिरंही स्त्रियांसाठी खुली होतील का? ऋतुस्त्रावादरम्यान किंवा त्या वयात आलेल्या स्त्रियांना मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी सुधारित हिंदू धर्म आग्रह धरेल का? हे मूलभूत प्रश्न साने गुरुजींनी व त्यांच्यासारखी भूमिका असलेल्या इतरांनी लक्षात घेतल्याचं दिसत नाही. यातून आपल्याला आणखी एक मूलभूत प्रश्न नोंदवावा लागतो. साने गुरुजींसारख्या मंडळींच्या दृष्टीने सुधारणांचा अर्थ काय होता? गुरुवायूर, वायकोम किंवा पंढरपूर असले मंदिरप्रवेशाचे अयशस्वी किंवा यशस्वी प्रयत्न काय साध्य करू पाहत होते? त्यांचं साध्य व्यापक स्वरूपाचं असेल, तर ते तात्कालिक उद्दिष्टांची सांगड व्यापक प्रश्नांशी कशी घालत होते आणि उपरोक्त प्रश्नांना कसं सामोरं जात होते?

मंदिरप्रवेशाच्या विविध घटनांमध्ये गांधींनी घेतलेल्या 'वादग्रस्त' भूमिका समजून घेतल्या तर त्यातून या प्रश्नांकडे पाहण्याची एक दृष्टी मिळते. हिंदू धर्माला एक संघटित धर्म म्हणून सुधारण्याबाबतची गांधीवादी भूमिका काय होती, याबद्दलही त्यातून काही उलगडा होतो. मंदिरप्रवेशाच्या प्रश्नावर गांधींनी द्विधावृत्ती दाखवली, कचखाऊ धोरण स्वीकारलं असं वाटत असलं, तरी त्याचा उगम संघटित हिंदू धर्माविषयीच्या त्यांच्या दृष्टिकोनात सापडतो. ब्राह्मणांच्या धुरीणत्वाखालील संघटित धर्म हे गांधीदृष्टीतील हिंदू धर्माचं रूप नव्हे.[२४] गांधींनी धर्माचा अर्थ सांगताना कधीही पुरोहितांना किंवा ब्राह्मणांना वैध अथवा अंतिम अधिसत्ता मानलं नाही. गांधींनी धर्माचा अर्थ सांगण्याचा स्वतःचा अधिकार कधीही सोडला नाही. त्यांच्या आश्रमांमधील नित्यक्रमामध्ये प्रार्थनेचा समावेश असला, तरीही त्यांनी कोणत्याही आश्रमात कधीच मंदिर बांधलं नाही. मंदिरप्रवेशासाठी मंदिराच्या अधिकारीवर्गाचं हृदयपरिवर्तन घडवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी कायद्याची मदत घ्यावी, हे गांधींचं आवाहन या पार्श्वभूमीवर समजून घेता येतं. विश्वस्तांचं हृदयपरिवर्तन घडवण्यासाठी साने गुरुजींनी केलेलं उपोषण (तसेच वायकोम व गुरुवायूर इथली मंदिरप्रवेशाच्या आंदोलनाने)मंदिरप्रवेशाचा निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार पुरोहितवर्गाकडे सोपणारं होतं. मंदिरप्रवेशाचा कायदा करून राज्यसंस्थेच्या 'इहवादी' हस्तक्षेपाद्वारेसुद्धा हाच परिणाम साधणं शक्य असल्यामुळे या बाबतीत उपोषण करणं अनावश्यक आहे, असं गांधींचं

मत असल्याचं दिसतं. विनोबांनी साने गुरुजींना पाठवलेलं पत्र (वरती उद्धृत केलं आहे) बारकाईनं वाचलं, तर त्यांनी उपोषणाबद्दल नापसंती का व्यक्त केली याची अधिक समजूत पटायला मदत होते. 'बडव्यांच्या विचारांशी आपलं काही नातंगोतं आहे का,' असा प्रश्न विनोबा उपस्थित करतात. हिंदू धर्मात सुधारणा करायची असेल, तर ब्राह्मण्य नाकारणं आवश्यक आहे, याची आठवण हा प्रश्न करून देतो. त्यामुळे धार्मिक सुधारणेसाठीच्या नकार द्यायला हवा, आणि आपल्यावर धर्मविरोधी किंवा हिंदूविरोधी असल्याचा शिक्का बसणार असेल तरीही ती किंमत मोजून धर्माचा अर्थ सांगण्याचा आपला अधिकार ठामपणे प्रतिपादित करायला हवा. अशा धार्मिक सुधारणांना होणारा विरोध धर्मावर 'खरी' श्रद्धा ठेवणाऱ्यांकडून होतो की, धर्म ही राजकीय अस्मितेची बाब मानणाऱ्यांकडून होतो, हेही तपासायला हवे.

(अनुवाद : अवधूत डोंगरे)

**डॉ. चैत्रा रेडकर,** पुणे
Mob. 9892507400
सहायक प्राध्यापक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे
इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च, पुणे

**टिपा व संदर्भ**

१. सिमल्यातील प्रगत अध्ययन संस्थेने २८–३० मे २०१७ या दिवसांमध्ये 'चंपारण्य सत्याग्रहाची शंभर वर्षं' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचं आयोजन केलं होतं. तिथे या निबंधाचा पहिला मसुदा सादर करण्यात आला. मूळच्या इंग्रजी निबंधात काही माफक संपादन करून प्रस्तुत मराठी भाषांतर केलं आहे.

२. मंगळवेढेकर राजा. (१९७४) साने गुरुजींची जीवनगाथा. पुणे : साधना, ३४०.

३. पाहा– ढेरे रा. चिं. (१९८४) श्री विठ्ठल : एक महासमन्वय. पुणे : पद्मगंधा प्रकाशन. शिवाय, Zelliot, E Berntsen, M. Ed. (1988) : The Experience of Hinduism : Essays on Religion in Maharashtra. Albany : State University of New York Press.

४. दर वर्षी आषाढवारीला पंढपुरात पायी जाणाऱ्या दिंड्यांमध्ये मुस्लिमांचा सहभाग असणारी कबीर दिंडीदेखील असते.

५. मंजुळ वा. ल. (२०१७) श्री क्षेत्र पंढरपुरातील मठांचा इतिहास, पुणे : उत्कर्ष प्रकाशन, १३०.

६. मंगळवेढेकर : १९७५, इतरत्र. ३४४.

७. या घडामोडींचे तपशीलवार वृत्तान्त 'गोफण' या स्थानिक मराठी वृत्तपत्रात प्रकाशित झाले होते. गोफणचे संबंधित अंक एकत्रित करून 'मंदिरप्रवेशाचे महाभारत' या नावाने प्रकाशित (१९८४) करण्यात आले आहेत.

८. ढेरे : १९८४, इतरत्र.

९. नवयुग, ४ मे १९४७. (प्रस्तुत संग्रहात समाविष्ट)

१०. उपरोक्त.

११. पाहा– फडके य. दि. (१९८४) शोध सावरकरांचा. पुणे : श्रीविद्या प्रकाशन. तसेच सुमंत, यशवंत (१९८८) प्रस्तावना– महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार. पुणे : प्रतिमा प्रकाशन.

१२. नवयुग, ४ मे १९४७. (प्रस्तुत संग्रहात समाविष्ट)

१३. उपरोक्त.

१४. खान्देशातील स्थानिक नेत्यांशी झालेल्या देव यांच्या पत्रव्यवहाराचं दस्तऐवजीकरण जिल्हा काँग्रेस समितीच्या अहवालांमध्ये झालेलं आहे (शंकरराव देव पेपर्स), हे अहवाल नेहरू मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररीमध्ये पाहायला मिळतात. या पत्रव्यवहारांमधून हा रोष दिसून येतो. या संदर्भातील तपशीलवार चर्चेसाठी पाहा– रेडकर चैत्रा (२०२०) साने गुरुजी : व्यक्ती आणि विचार, साधना, पुणे.

१५. या संदर्भातील देवांचं किंवा काँग्रेसचं निवेदन उपलब्ध नाही, पण गांधी आणि विनोबा यांनी या काळात साने गुरुजींना लिहिलेल्या पत्रांवरून असं सूचित होतं की, साने गुरुजींचा सत्याग्रह अनावश्यक घाईचा आहे, अशी काँग्रेसमधील नेत्यांची धारणा होती.

१६. विनोबा भावे (संपा. कालिंदी) (२००७) स्नेह–सन्निधी– विनोबांनी १९५० पर्यंत लिहिलेल्या पत्रांचा संग्रह, परंधाम प्रकाशन, पवनार.

१७. मंजुळ : २०१७, इतरत्र, १३०.

१९. नंतर साने गुरुजींनी आमरण उपोषण सुरू केल्यानंतर डावरे यांनी साने गुरुजींविरोधात आत्महत्येचा प्रयत्न केल्याची तक्रार दाखल केली.

१९. साने, पांडुरंग सदाशिव (१९४७–५०/१९९९). स्वप्न आणि सत्य. हरिभाऊ लिमये, पुणे. शिवाय, पाहा– रेडकर, चैत्रा (२०१४), इतरत्र, ८४–९०, १४३.

२०. साने : १९४७–५०/१९९७, उपरोक्त, २३.

२१. Omvedt, Gail (1994) Dalits and the Democratic Revolution : Dr. Babasaheb Ambedkar and the Dalit Movement in Colonial India, New Delhi : Sage, 266-7.

२२. पाहा– Parekh, Bhikhu. (1989) Colonialism,Tradition and Reform : An Analysis of Gandhi's Political Discourse. Sage, New Delhi.

जगदीश पटेल

# आंतरराष्ट्रीय कामगार स्मृतिदिन साजरा केला पाहिजे!

आपल्या देशातील कामगार संघटना या आंतरराष्ट्रीय मजूर चळवळीच्या एक भाग म्हणून सहभागी आहेत. तरीही आपल्याकडे फार तर १ मेचा कार्यक्रम आयोजित केला जातो, पण केन्द्रीय कामगार संघटना २८ एप्रिल साजरा करताना दिसत नाहीत, वा तसे ऐकिवातही नाही. देशातील काही राज्यांत व्यावसायिक ठिकाणी होणारे आजार व सुरक्षिततेच्या मुद्यावर काम करणारे कमी समूह आहेत, हे खरं; जसे सिलिकॉसिस वा ॲस्बेस्टॉसच्या कारणांमुळे होणाऱ्या व्याधींबाबत कामगारांना न्याय मिळण्यासाठी चळवळ चालवतात. परंतु त्यापैकीही फार थोडे समूह हा दिवस साजरा करण्यासाठी पुढे येतात, ही शोकांतिका आहे. एवढीच गंभीर समस्या आपण फार दुर्लक्षित ठेवली आहे. बिल्डिंग ॲन्ड वूडवर्कर्स इंटरनॅशनलच्या सदस्य असलेल्या संस्था याला अपवाद आहेत.

सन १९८५ च्या २८ एप्रिल रोजी कॅनेडियन पब्लिक सर्व्हिस युनियनने काम करताना झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या कामगारांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम आखला. जगभरात कामगारांचे आरोग्य व सुरक्षिततेसाठी काम करणाऱ्या संघटनांनी हा विचार पुढे नेला. या चळवळीला हळूहळू वेग मिळाला. आता शंभरपेक्षा अधिक देशांत दर वर्षी ह्या दिवशी आंतरराष्ट्रीय कामगार स्मृतिदिन म्हणून मानला जातो. 'युरोपियन वर्क हझार्ड कॉन्फरन्स'मध्ये मी १९९२ मध्ये हजर राहिलो, तेव्हा मला हे समजले. त्यानंतरच्या वर्षापासून आम्ही गुजरातेत हा दिवस दर वर्षी साजरा करतो. बडोदा, खंबात येथील आमच्या कार्यस्थळी हे करतो. बांधकाम मजूर संघटनाही दर वर्षी अहमदाबाद व सुरतमध्ये हा दिवस स्मृतिदिन म्हणून साजरा करतात. आय.एल.ओ.द्वारे २००३ मध्ये हा दिवस 'वर्ल्ड डे फॉर सेफ्टी ॲण्ड हेल्थ ॲट वर्क' म्हणून साजरा करण्याचे जाहीर झाल्यावर उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर हा दिवस साजरा करतात, तर कामगार संघटना अजूनही तो इंटरनॅशनल वर्कर्स मेमोरियल डे (कामगार स्मृतिदिन) म्हणूनच साजरा करायचं पसंत करतात. कुठे, कसा व कशा पद्धतीने साजरा केला जातो आणि कशी तयारी चालू असते, ते जाणून घेण्यासाठी ही लिंक पाहावी : https://28april.org/

ब्रिटिश सेफ्टी काऊन्सिलच्या अहवालानुसार, भारतात दर वर्षी ४८ हजार कामगार कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अपघातात मृत्युमुखी पडतात. ब्रिटनमध्ये कामाच्या ठिकाणी अपघातात जे मृत्यू होतात, त्यापेक्षा हे प्रमाण वीसपट जास्त आहे. जागतिक आरोग्य संस्थेच्या अहवालानुसार, जगात दहा कोटी कामगार कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अपघातात जखमी होतात, त्यापैकी एक लाख मृत्यू पावतात. भारतात १७ लाख कामगारांना इजा पोहोचते, जी जगात होणाऱ्या अपघातांपैकी १७ टक्के आहे.

पण जीवघेण्या अपघातांत ४५००० जण मरतात. जे वैश्विक आकड्यांच्या ४५ टक्के आहे. याशिवाय जगात ११ कोटी कामगार व्यावसायिक आजारांचे बळी बनतात. त्यापैकी १९ लाख जण भारताचे असतात. व्यावसायिक व्याधींमुळे बळी पडणाऱ्यांची संख्या जगात ७ लाख आहे, त्यापैकी १.१९ लाख भारतातील असतात. यासाठी वेगवेगळ्या स्रोतांकडून माहिती मिळवावी लागते. नॅशनल क्राईम ब्युरो रिपोर्ट, लेबर ब्युरो, डिजीफसली, डीजीएमएस, ईएसआयसी इत्यादी; तरीही खरं चित्र समोर येत नाही. डिजीफसली नोंदणीकृत कारखान्यांमधील अपघातांची माहिती देते. मात्र राज्य शासनाच्या मजूर खात्याद्वारे दर वर्षी त्यांच्याकडे जमा होणाऱ्या रिटर्न्समधून अपघातांचेच आकडे देतात. बऱ्याच राज्यांनी त्यांना वेळेवर रिटर्न पाठवले नाही, तर त्यांचे आकडे अपुरेच राहतात, असं वेळोवेळी होत असतं. २०१४ ते २०१६ च्या तीन वर्षांत पाच महत्त्वाच्या राज्यांत ३५६२ कामगारांचे मृत्यू कारखान्यांमध्ये काम करताना झाले होते आणि ५१,१२४ जखमी झाले होते. आता यात कायमचे अपंगत्व येणाऱ्यांची माहिती तुम्हाला मिळू शकत नाही. दर लाख कामगारांत २०१३ मध्ये हा दर ०.३७ होता. जो २०१४ मध्ये वाढून ०.४९ झाला. इ.एस.आय. कॉर्पोरेशनचे आकडे पाहिले तर २०१६-१७ मध्ये २.४१ कोटी आणि २०१७-१८ मध्ये ३.०२ कोटी कामगारांना इजा झाली होती. त्यापैकी २०१६-१७ मध्ये २.५७ लाख व २०१७-१८ मध्ये २.६९ लाख कामगारांना कायमची इजा झाली होती. २०१६-१७ मध्ये १७९६ कामगारांचे कामावरील अपघातात मृत्यू झाले होते आणि १७-१८ मध्ये १७३९ जणांचे.

आय.एल.ओ.च्या अंदाजानुसार, दररोज ६४०० कामगार जगभरात कामाच्या ठिकाणी अपघातात बळी पडतात आणि ८६००० जणांना इजा पोहोचते. वर्षाला ३.५० लाख कामगार जीवघेण्या अपघातांमुळे जीव गमावतात आणि इतर २० लाख कामगारांचे मृत्यू व्यावसायिक कारणांच्या आजारांमुळे होतात. ३१.३ कोटी कामगारांना कामाच्या ठिकाणी गंभीर दुखापत होते आणि ते पुन्हा कामावर जाऊ शकत नाहीत. वर्षाला १६ कोटी कामगार व्यावसायिक ठिकाणी होणाऱ्या आजारांना बळी पडतात. अपघातामुळे होणाऱ्या मृत्यूपेक्षा व्यावसायिक आजारांमुळे होणारे मृत्यू सहापट असतात. कामांमुळे होणारे आजार, कॅन्सर, सिलिकॉसिस, ॲस्बेस्टॉसमुळे होणारे आजार, रसायनांच्या संपर्कामुळे होणारे किडनी व लिव्हरचे



आजार वा व्याधी, कॅडमियम, शिसे, पारा, क्रोमियम यांसारख्या धातूंमुळे होणाऱ्या व्याधींचे कामगार भोग होतात; पण ते जाहीर होत नाही. जनतेच्या नजरेतही येत नाहीत.

अपघात वा व्यावसायिक आजारांमुळे जे कामगार इजाग्रस्त होतात व त्या कारणांमुळे जितके दिवस ते कामावर जाऊ शकत नाहीत, त्या कारणाने जागतिक जीडीपीचे ४ टक्के नुकसान होते. पण काही देशांमध्ये हे प्रमाण ६ टक्क्यांपर्यंत जाते. हे ४ टक्के म्हणजे किती? डॉलरचा भाव रु. ७७ धरला तर होताहेत रु. ९६.३५ लाख कोटी. आणि जोखमी पदार्थांच्या संपर्कामुळे होणारे मृत्यू वर्षाला १० लाख आहेत.

दुसऱ्या महायुद्धात मोर्चावर लढणाऱ्या सैनिकांना खाणे-पिणे, अंथरूण-पांघरूण, दवा-दारू, औषधे आणि दारूगोळा अशा अनेक गोष्टींची गरज पडू लागली. त्या पोहोचवण्यासाठी वाहने आणि रस्ते हवेत, हे लक्षात आल्यावर हे सगळे वेळोवेळी वेळेवर उत्पादित व्हायला हवे, हे सर्वांना कळून चुकले. उत्पादनाचे महत्त्व पटले. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या अपघातांमुळे शेकडो कामगार मोर्चावर गेल्याविनाच अंथरुणावर पडले व अनुत्पादक होत गेले. जे केवळ स्वतः व स्वतःच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर समाजावरही बोजा ठरले व ठरतात. काम करण्याच्या वयातच ते खाटेवर पडतात आणि त्यांच्यावर उपचार करावे लागतात, त्यांच्या गरजा पुरवाव्या लागतात. त्यात बराच वेळ व शक्ती आणि साधने वापरली जातात. त्याला पुन्हा उत्पादक कसे बनवावे आणि त्याबाबतीत कसे पैसे गुंतवावेत, याबरोबरच अपंगत्वासह त्यांना नव्या कामासाठी तयार करावे, नवे प्रशिक्षण द्यावे आणि अनुकूल काम शोधून द्यावे याचे महत्त्व कळत गेले.

काम करताना कामाच्या जागी सुरक्षितता असायला हवी आणि त्यासाठी कायदेही हवेत. कायद्याचं पालन होतंय का नाही, हे पाहणारे सजग तंत्रही हवे. अशा चौकटींना, तंत्राला प्रशिक्षण द्यावे लागते. ते देऊन तयार करावे लागते. दुसरीकडे यंत्र आणि तंत्रज्ञान कामगारांना अनुकूल होईल आणि जे कधीच निष्फळ जाणार नाही, अशा प्रकारचे तंत्र असले पाहिजे. कामगारांनाही सुरक्षिततेने काम करण्याचे प्रशिक्षण नेहमी दिले पाहिजे. बहुतेक अपघात हे टाळता येण्यासारखे असतात. पण हे वैज्ञानिक शास्त्रीय संशोधनातून हे लक्षात आलंय की, अपघात हे नशीब वा दैवी इच्छेनुसार होत नाहीत. वैज्ञानिक विश्लेषण करण्यात आले, तर कोणत्या त्रुटींमुळे अपघात घडला ते समजू शकते आणि भविष्यात त्या प्रकारचे अपघात पुन्हा होऊ नये म्हणून आवश्यक पावले उचलली जाऊ शकतात. मग अपघाताची पुनरावृत्ती होणार नाही. तसेच व्यावसायिक आजार रोखण्यासाठी कामाच्या क्षेत्रात देखरेख ठेवली पाहिजे. शास्त्रीयरीत्या कार्यस्थळाच्या ठिकाणचे विविध बाबींचे मापन करणे, कायदेशीर बाबींच्या मर्यादा लक्षात घेऊन त्यांना नियंत्रित करणे आणि कार्यक्षेत्र प्रदूषणमुक्त राखण्याची जबाबदारी मालकांची असते.

प्रदूषणामुळे कामगारांच्या आरोग्यावर काय दुष्परिणाम होतात, त्याचंही आकलन होणे आवश्यक आहे. त्यासाठी बायोलॉजिकल मॉनिटरिंग करावे लागते. कार्यस्थळी वापरल्या जात असलेल्या पदार्थांची जोखीम आणि त्या संदर्भात कामगारांचे रक्त, लघवीचे किंवा अन्य नमुने तपासून घ्यावे लागतात व त्या आधारे निर्णय घ्यावे लागतात. व्यावसायिक ठिकाणी होणाऱ्या आजारांसाठी निष्णात डॉक्टरांची मदत घ्यावी लागेल. आपल्या कायद्यांमध्ये व्यावसायिक ठिकाणी होणाऱ्या आजारांची यादी देण्यात आली आहे. त्या आजारांचे निदान करून त्याची माहिती शासनाच्या विहित विभागाला देणे बंधनकारक आहे. त्या आधारावरच ज्या-त्या कारखान्यात तपास करून आवश्यक असलेली पावले उचलली गेली, तर अन्य कामगार त्या आजारांना बळी पडण्यापासून वाचवता येतील; परंतु आपल्याकडे वैद्यक वा डॉक्टर अशी पावले अजिबात उचलत नाहीत. साधी तसदीही घेत नाहीत. इतरांचं सोडा, ईएसआयचे डॉक्टरही वेगळे नाहीत.

दि.२८ एप्रिलच्या जाहीर कार्यक्रमांमध्ये कामगार संघटना या समस्येकडे समाज, शासन व उद्योगजगताचे लक्ष वेधतात आणि स्वतःच्या मागण्या मांडतात. बैठे धरणे, निदर्शने, मोर्चे काढतात. त्याद्वारे व बॅनर्सद्वारे स्वतःच्या मागण्या मांडून राज्य व देशातील परिस्थितीचे चित्र उभे करतात आणि पीडित कामगारांची पीडा वेशीवर टांगतील. या कार्यक्रमांमध्ये पीडित कामगार सहभागी व्हावेत, म्हणून त्यांना प्रोत्साहित केले जाते. काही देशांमधे पीडित कामगार स्वतःच संघटित होऊन संघटनेद्वारे कार्यक्रम आयोजित करतात. अपघातात बळी गेलेल्यांचे स्मारक उभारण्याची मागणी ते करतात आणि जिथे अशी स्मारके आहेत, त्या

परिसरात कार्यक्रम योजून मीडियाद्वारे समाजात संदेश प्रसारित करतात. मागील वर्षात अपघातात वा व्यावसायिक ठिकाणी होणाऱ्या आजारांमुळे मृत्युमुखी पडलेल्यांना आदरांजली व जीवित असणाऱ्यांसाठी संघर्ष चालू ठेवण्याची शपथ घेतात. मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या तसबिरी ठेवून त्यांचे कुटुंबीय व मित्र परिवार शोक व्यक्त करून श्रद्धांजली व फुले वाहू शकतील, आसवांचे दोन थेंब ढाळू शकतील हे बघतात. हे अपघात कुणाच्या चुकांमुळे झालेत ते आणि गुन्हेगारांना शिक्षा व्हावी, मृतांच्या कुटुंबीयांना योग्य तो मोबदला मिळावा, याबरोबरच असे अपघात वारंवार होऊ नयेत, अशी मागणी शासनाकडे करतात.

या घालवण्यासाठी किंवा हे कमी करण्यासाठी शासनाचे धोरण असणे अगत्याचे आहे. धोरणाचा आधार आकडेवारी असते. आपल्या व इतर देशात अपघात वा व्यावसायिक आजारांची विश्वसनीय आकडेवारीच उपलब्ध नाही. त्यामुळे चांगले धोरण वा कायदे होत नाहीत. भारत सरकारने कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, आरोग्य व पर्यावरणासाठी धोरण- नॅशनल पॉलिसी- २००९ मध्ये जाहीर केले तर खरे. पण त्यानंतर आलेल्या सरकारांनी ते गुंडाळून ठेवून दिले. आता मजूर कायदे सोपे-सरळ-सुटसुटीत व विनागुंतागुंतीचे करण्यासाठी अनेक कायद्यांचे चार वेगवेगळ्या कोडमध्ये एकत्रीकरण करण्यात आले, पण राष्ट्रीय धोरणाबाबतीत काहीच चर्चा झाली नाही. जिथे आकडेवारीच नाही तिथे समस्याच नाही!! जिथे समस्याच नाही तिथे त्याची उकल करण्यासाठी पैशांची तजवीज कोण करणार? कुठून मिळवून देणार? आणि पैशांशिवाय कोणतेही कार्य उभे राहू शकते का?

चला, आता आपण २८ एप्रिलच्या कार्यक्रमांकडे पुन्हा वळू. दर वर्षी त्या कार्यक्रमाच्या तयारीसाठी आयएलओ आणि/ किंवा इन्टरनॅशनल ट्रेड युनियन कॉन्फेडरेशनद्वारे एक ठरावीक विषय निवडला जातो. त्या विषयाच्या अनुषंगाने त्या वर्षाचे कार्यक्रम व प्रचार होतो. भारत आज महासत्ता होण्याच्या स्पर्धेत उतरलाय आणि तो चीनला धोबीपछाड देऊन अमेरिकेच्या बरोबरीने उभे राहण्याच्या वल्गना करतोय. लाखो-कोटी अपंग, अशक्त, रोगी कामगारांची फौज तुमचे स्वप्न पूर्ण करेल, असा तुम्हाला विश्वास आहे? किंवा, हे काम कामगारांचेच नाही तर देशातील मोजके उद्योगजगतातील साहसिक तुम्हाला महासत्तापदी बसवतील असं वाटतं का? आम्हाला तर अशी भीती वाटते की, भल्या मोठ्या गप्पा मारताना तुम्ही इमारतीच्या पायाचे दगडच दुर्लक्षित करताहात आणि त्यामुळेच पुढे जाऊ शकणार नाही. कामगार जितके मजबूत तितकाच देश आतून मजबूत- ही गोष्ट सगळ्यांनी समजून घेऊन स्वीकारावी लागेल. लॉकडाऊनवेळी स्थलांतर करणाऱ्या कामगारांच्या टोळ्या भर उन्हातान्हात घरी जाण्यासाठी स्वतःचे सामान व लहान मुले घेऊन निघाल्या होत्या; त्या वेळची त्यांची ती विकल अवस्था व ताकद दोन्ही दर्शवितात. अशा विकल अवस्थेतून बाहेर काढून व ताकदीला बळ देऊन त्यांना सशक्त करण्याचे काम ही कोणत्याही संवेदनशील शासनाची प्राधान्यता असली पाहिजे.

आज संपूर्ण जगाला कोरोनाने एका वर्षापासून ग्रासले आहे. लाखो माणसे मरण पावली आहेत. नोकरी, धंदा, रोजगारावर असा परिणाम झालाय की, कोट्यवधी लोक गरिबीत ढकलले गेलेत. भारतात लाखो डॉक्टर, नर्सेस आणि इतर वैद्यकीय कर्मचारी कोविड १९ चे बळी झालेत आणि इतर जगातही तीव्र परिस्थिती आहे. याशिवाय पोलिस कर्मचारी, सफाई कामगार आणि इतर शासकीय व बँक कर्मचारी बळी पडलेत. ज्यांना कायद्याचे कोणतेही रक्षण नाही असे खासगी उत्पादन आणि सेवाक्षेत्रातील कामगार, कर्मचारी बळी पडलेत तसेच दुकानदारही बळी पडलेत, अशा बातम्या येतात. आपल्याकडे याचे आकडे आहेत? कामाच्या ठिकाणी किती जणांना संसर्ग झाला व त्यामुळे कितींचे मृत्यू झालेत याचे आकडे का नाहीत? या सर्वांना कामामुळे संसर्ग झालाय, हे निःसंशय. कामाच्या ठिकाणी आरोग्याचे रक्षण करण्यात कोण अपयशी ठरलंय? यासाठी भारतात पुरेसे कायदे आहेत? नाहीत. आता नवीन लेबर कोड येईल, त्यातही आरोग्य कर्मचाऱ्यांना सुरक्षित ठेवण्याची कुठलीही जोगवाई नसणार. अशी अनेक क्षेत्रे आहेत ज्यात कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कोणतीही कायदेशीर व्यवस्थाच नाही.

म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे कामगार असोत वा पोस्ट खात्याचे कर्मचारी असोत- कुणासाठीही कायदेशीर छत्र नाही. इंटरनॅशनल कमिशन ऑफ ऑक्युपेशनल हेल्थच्या अंदाजानुसार, २०२० मध्ये जगात ६०००० कामगारांचे कोरोनामुळे मृत्यू झाले. ते कामामुळे झालेत. संस्था असं मानते की, जितक्या लोकांना कोरोना होतो त्यातील २०

टक्के जणांना कामाच्या ठिकाणी संसर्गामुळे होतो. केवळ आरोग्य कर्मचारीच नव्हे तर रंगकाम करणारे, सफाई कामगार, वाहनचालक, शिक्षक आणि इतर अनेक क्षेत्रांतील कामगारांना कामाच्या ठिकाणी संसर्गाची जोखीम आहे.

भारतात कर्मचारी मोबदला कायदा व कामगार राज्य विमा कायदा आहे. दोन्ही कायद्यांत परिशिष्ट-३ समान आहे. या परिशिष्टात अशा आजारांची माहिती व यादी आहे, ज्या आजारांसाठी कामगार मोबदल्याचा दावा करू शकतात. या यादीतील 'अ' विभागात सांसर्गिक आजारांचा समावेश आहे. मात्र एक दिवस जरी काम केले असेल आणि संसर्ग झाला, तरीही मोबदला मागता येतो. म्हणूनच आम्ही मानतो की ज्यांना कामामुळे कोरोना झालाय व मृत्युमुखी पडलेत, त्यांचे कुटुंबीय मोबदल्यासाठी दावा करू शकतात. किती लोकांनी तसे केले? किती लोकांना मोबदला मिळाला? याबाबत कोणतीही माहिती आपल्याकडे नाही. यावरून स्पष्ट होतं की, आपण किती मागास आहोत आणि महासत्तेच्या बाता मारताना आपल्या तोंडाला वास मारतो आहे, याचे भान ठेवले गेले पाहिजे.

आयएलओच्या बैठकीत कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि आरोग्याचे मूलभूत अधिकार (फंडामेंटल राईट) मानण्याची मागणी नुकतीच झालीय. या वर्षी २८ एप्रिलचे कार्यक्रम व्यावसायिक आरोग्य व सुरक्षिततेसाठीची राष्ट्रीय व्यवस्था (सिस्टीम) अधिक मजबूत करण्याच्या रणनीतीवर केंद्रित राहणार. 'कॉलेजियम रामाझानी' नावाच्या प्रतिष्ठित संस्थेने मूलभूत अधिकाराच्या मागणीला जाहीर पाठिंबा देणारे निवेदन प्रसिद्ध केलेय, तर 'इंटरनॅशनल कमिशन ऑन ऑक्युपेशनल हेल्थ'द्वारा असेच निवेदन प्रगट करण्यात आले आहे. उद्योगांचे मालक आणि शासकीय संस्थांनी अजून तरी त्याला विरोध केला नाही. आयएलओ त्रिपक्षीय संस्था आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. आता या बाबतीत नजीकच्या काळात सर्वसंमतीने ठराव संमत केला गेला, तर त्यानंतरच ज्या त्या देशातील शासनाला स्वतःच्या देशातील घटनेत सुधारणा घडवून मूलभूत अधिकारांच्या यादीत कामाच्या ठिकाणी सुरक्षितता व आरोग्याच्या अधिकाराचा समावेश करावा लागेल. मग ती शासनाची घटनादत्त जबाबदारी होईल.

युनायटेड नेशन्सचे सभासद असलेल्या देशांना लक्ष्यांक जाहीर करण्यात आले आहेत- ज्याला 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स' (एसडीजी) म्हणतात. हा एसडीजी लक्ष्यांक-३ आहे- गुड हेल्थ एन्ड वेल बीइंग आणि नंबर-८ आहे डीसेन्ट वर्क. यात सगळं येऊन जातं. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता आणि आरोग्य हा एक महत्त्वाचा मानवाधिकार आहे, जो आपल्या कामगारांना आपले शासन अजूनही देऊ शकले नाही.

आपल्या देशातील कामगार संघटना या आंतरराष्ट्रीय मजूर चळवळीच्या एक भाग म्हणून सहभागी आहेत. तरीही आपल्याकडे फार तर १ मेचा कार्यक्रम आयोजित केला जातो, पण केन्द्रीय कामगार संघटना २८ एप्रिल साजरा करताना दिसत नाहीत, वा तसे ऐकिवातही नाही. देशातील काही राज्यांत व्यावसायिक ठिकाणी होणारे आजार व सुरक्षिततेच्या मुद्यावर काम करणारे कमी समूह आहेत, हे खरं; जसे सिलिकॉसिस वा ॲस्बेस्टॉसच्या कारणांमुळे होणाऱ्या व्याधींबाबत कामगारांना न्याय मिळण्यासाठी चळवळ चालवतात. परंतु त्यापैकीही फार थोडे समूह हा दिवस साजरा करण्यासाठी पुढे येतात, ही शोकांतिका आहे. एवढीच गंभीर समस्या आपण फार दुर्लक्षित ठेवली आहे. बिल्डिंग ॲन्ड वूडवर्कर्स इंटरनॅशनलच्या सदस्य असलेल्या संस्था याला अपवाद आहेत. हा २८ एप्रिल दिवस कामगारांसाठी काम करणाऱ्या आणि त्यांच्यासाठी सहानुभूती बाळगणाऱ्या संघटनांनी साजरा करावा आणि त्यांच्या मागण्या जाहीरपणे जनतेसमोर, शासन व उद्योगजगतासमोर बुलंद आवाजात ठेवाव्यात, असे आपण जाहीर आवाहन करू या. या देशाचे भवितव्य उज्ज्वल होण्याचे जे पाहू इच्छितात, त्यांनी यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

मग तुम्ही साजरा करणार का आंतरराष्ट्रीय कामगार स्मृतिदिन वा 'वर्ल्ड डे फॉर सेफ्टी ॲन्ड हेल्थ ॲट वर्क?' तसा तर दोघांमध्ये मुळातच फरक आहे. तरीही दोन्हीमध्ये तुम्हाला ज्यात रस आहे, आवड आहे- ते पसंत करा. गप्प बसू नका. आता बसण्याचे दिवस गेलेत!!!

**जगदीश पटेल,** बडोदा
jagdish.jb@gmail.com
Mob. 9426486855
भाषांतर : डॉ. जयंत गुजराती, नासिक
drjayantgujarati6@gmail.com
Mob. 9822858975

संतोष दास्ताने

# संविधानातील सातव्या अनुसूचीचा पुनर्विचार व्हावा

आजच्या जमान्यात जिव्हाळ्याच्या असणाऱ्या अनेक विषयांची ही अनुसूची दखलच घेत नाही, ते सुधारावे लागेल. ग्राहकसंरक्षण, पर्यावरणसंरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सुशासन, हवामान-बदल हे आता कळीचे मुद्दे आहेत. त्यांना योग्य ते स्थान देऊन त्याबाबत नियम-कायदे करण्याची यंत्रणा निश्चित करावी लागेल, म्हणजे त्यातील संदिग्धता नाहीशी होऊन स्पष्टता येईल. सातव्या अनुसूचीचा पुनर्विचार ही वैधानिक, प्रशासनिक आणि कार्यकारी शाखांमध्ये गुणात्मक सुधारणा करण्याची अमोल संधी आहे. या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेणे इष्ट होईल. केंद्र व राज्यांमध्ये सध्या अनेक कारणांनी कमी-जास्त प्रमाणात का होईना पण घर्षण, अविश्वास, दुरावा व कटुता या भावना निर्माण झालेल्या दिसतात. त्या दूर करण्याचा मार्ग याद्वारे मिळाला आहे. या आघाडीवर शासन नेमकी कोणती आणि केव्हा कार्यवाही करते याची आता प्रतीक्षा आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २८०(१) अनुसार नेमलेल्या पंधराव्या वित्त आयोगाने सादर केलेला अहवाल केंद्र सरकारने स्वीकारला आहे, त्यावर फेब्रुवारी २०२१ पासून कार्यवाही सुरू आहे. आयोगाचे अध्यक्ष होते माजी खासदार आणि माजी प्रशासनिक अधिकारी नंद किशोर सिंह. आयोगाची निरीक्षणे, सूचना आणि शिफारशी यामागील त्यांची भूमिका काही मुलाखतींद्वारे त्यांनी स्पष्ट केली आहे. मुख्यतः केंद्राकडून राज्यांना पुढील पाच वर्षांत कसा व किती निधी हस्तांतरित केला जाईल याबद्दलच्या सूचना-शिफारशी वित्त आयोग करतो. त्या निमित्ताने त्यांनी केलेल्या एका सूचनेकडे मात्र आजपर्यंत फारसे लक्ष गेलेले दिसत नाही. ती म्हणजे- भारतीय संविधानातील सातव्या अनुसूचीचा पुनर्विचार केला जावा. संविधानाच्या अकराव्या भागामध्ये केंद्र व राज्यांचे वैधानिक आणि प्रशासनिक संबंध कसे असावेत, याचा निर्देश केलेला आहे. त्यातील अनुच्छेद २४५ ते २५५ अनुसार संसदेने आणि राज्यांच्या विधान मंडळांनी कोणते विषय हाताळावेत, कोणत्या विषयांवर कायदे करावेत याचा उल्लेख आहे. संविधानाच्या शेवटी ज्या अनेक अनुसूची आहेत, त्यातील अनु. २४६ अनुसार असलेल्या सातव्या अनुसूचीचा मुळापासून विचार करण्याची वेळ आली आहे, असे ते सुचवितात. ही अनुसूची काय आहे? या अनुसूचीत तीन वेगवेगळ्या याद्या दिल्या आहेत. केंद्र सरकार ज्या विषयांवर कायदे करू शकते ती संघसूची किंवा केंद्रसूची, राज्य सरकारे ज्या विषयांवर कायदे करू शकतात ती राज्यसूची आणि केंद्र व राज्य सरकारे अशा दोघांनाही ज्या विषयांवर कायदे करण्यास मुभा आहे ती समवर्ती सूची. केंद्र आणि राज्यांची विषयकक्षा स्वतंत्र आणि निश्चित असावी, तेथे पुनरुक्ती किंवा संदिग्धता असू नये, असा प्रयत्न येथे केलेला आहे. केंद्र आणि राज्ये यांनी आपापसात सहकार्य, सहमती, एकसूत्रता व एकतानता कशी राखावी, हे

दाखवणारा आरसा म्हणजे सातवी अनुसूची- असे तिचे स्वरूप आहे.

आता वित्त आयोगाचा आणि सातव्या अनुसूचीचा संबंध काय, तो प्रथम पाहिला पाहिजे. देशात काही विकास योजना केंद्र सरकारने पुढाकार घेऊन पूर्वी सुरू केल्या. त्या योजनांसाठीचा निधी पूर्णतः किंवा बहुतांशी केंद्राकडून मिळतो. सुरुवातीला त्या योजनांची संख्या अगदी मर्यादित होती. अशा ४५ योजना देशात १९६९ मध्ये राबवल्या जात होत्या. त्यांची संख्या वाढून आता अशा २०० हून अधिक केंद्रपुरस्कृत योजना देशात विविध क्षेत्रांत राबविल्या जात आहेत. त्यांच्यावर आता वार्षिक सुमारे रुपये ६ ते ७ लाख कोटी खर्च होत आहेत. विकास योजना केंद्राने बनवायच्या व राज्यांनी फक्त कार्यवाही करायची. त्यासाठी नियम-अटी केंद्र सरकार ठरवून देणार. त्यात लवचिकता अगदी नगण्य होती. त्यामुळे राज्यांना त्यात काही रस वाटेनासा झाला. शिवाय या योजना केंद्राने आपल्यावर लादल्या आहेत, असेही अनेक बाबतींत वाटत गेले. अनेक योजना राज्यांच्या विकासाच्या अग्रक्रमानुसार नव्हत्याच. प्रत्येक राज्याचा विकासाचा अग्रक्रम निराळा असतो, हे उघड आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यवाहीत अपुरेपणा व उणिवा राहिल्या, यांत्रिकपणा आला. या योजना म्हणजे राज्यांच्या स्वायत्ततेवर आक्रमण आहे, अशी भावना काही राज्य सरकारे जाहीरपणे मांडू लागली. केंद्रात एका पक्षाची सत्ता आणि राज्यात विरोधी पक्षाची सत्ता- अशा परिस्थितीत तर या समस्येला राजकारणाची निराळीच धार चढू लागली. अनेक विषय राज्यांच्या अखत्यारीतील, पण त्यावरील योजना मात्र केंद्राने बनवून त्या राबवण्याची विनंतीवजा आज्ञा राज्यांना केलेली आढळते. त्यामुळे हा दुरावा वाढू लागला. रोजगार, शिक्षण, ग्रामीण विकास हे त्या अनुसूचीनुसार खरे पाहता राज्यांचे विषय. पण त्या विषयांवरील अनुक्रमे मनरेगा, शिक्षणाचा हक्क व प्रधानमंत्री ग्रामसडक योजना असे कायदे केंद्राने करून कार्यवाही राज्यांवर सोपवली. विषयांचे वर्गीकरण संविधानाच्या सातव्या अनुसूचीने केलेले असल्याने शेवटी सगळे खापर त्या अनुसूचीवर फुटू लागले. हा संघर्ष तसा जुनाच आहे, पण ही मोठ्या समस्येची/पेचप्रसंगाची नांदी आहे, हे मुरब्बी प्रशासनिक अधिकारी सिंह ओळखतात. त्यासाठी विषयांचे वर्गीकरण मांडणाऱ्या सातव्या अनुसूचीचा शांतपणे विचार करावा, असे ते सुचवतात. ही मागणी अनेक संविधानतज्ज्ञांनी आणि स्तंभलेखकांनी उचलून धरली आहे.

देशाच्या संघराज्यात्मक संरचनेमध्ये सत्ता व अधिकार या दोन्ही दृष्टीने केंद्र सरकार तुलनेने अधिक बलवान आहे. पण त्याच वेळेस प्रत्येक राज्याची अस्मिता, संस्कृती, स्वत्व, स्वातंत्र्य आणि स्वायत्तता जपणे; त्यांच्या विकासास मदत करणे, विकासाची पुरेशी संधी देणे- ही केंद्राची नैतिकच नव्हे, तर कायदेशीर जबाबदारी आहे. ही कसरत अवघड आहे का सोपी, हा निराळा मुद्दा आहे, पण आवश्यक आहे, हे निश्चित! व्यवहारात मात्र तसे घडलेले आढळत नाही. संविधानातील तरतुदी आणि संविधानाला अनुसरून झालेली प्रत्यक्षातील वाटचाल हे दोन्ही निकष पाहता, राज्यांची स्वायत्तता सतत घटत जाणारी, आणि केंद्राची राज्यांवरील पकड वाढत जाणारी अशी स्थिती दिसते. त्यामुळे हा दुरावा अधिक रुंदावत आहे, असे स्पष्टपणे जाणवत आहे. त्यासाठी या अनुसूचीच्या मुळाशी गेले पाहिजे. सध्याच्या संविधानाचे मुख्य मूळ स्रोत म्हणजे १९१९ आणि १९३५ चे भारत सरकार कायदे. या दोन्हीमध्ये केंद्रस्थानी असलेले त्या वेळचे ब्रिटिश सरकार आणि त्या वेळची प्रांतिक सरकारे यांच्या अधिकारांची विभागणी स्पष्ट केलेली होती. सध्याच्या संविधानाने ही विभागणी जाणीवपूर्वक स्वीकारली आणि जपली. संविधान समितीतील चर्चेमध्ये डॉ. आंबेडकर आणि इतर तज्ज्ञांनी ही विभागणी एकीकडे केंद्राने सरकार स्थिरपणे चालवणे आणि दुसरीकडे राज्यांच्या विकासास पुरेशी संधी देणे यासाठी समर्थनीय असल्याचे मत मांडले. त्यामुळे सत्ता आणि अधिकाराचा केंद्राकडे झुकलेला लंबक स्वीकारला गेला. सन १९५६ च्या सातव्या संविधान सुधारणेने या व्यवस्थेवर शिक्कामोर्तब झाले. केंद्राचे श्रेष्ठत्व व प्रभाव अनु. २४८ ते २५४ यात प्रतीत झालेला दिसतो. अनुसूचीतील याद्यांनुसार केंद्र आणि राज्य सरकारे ते-ते विषय हाताळतात, त्यानुसार राज्यकारभार करतात, त्यासंबंधी जरूर ते कायदे करतात- राबवतात, त्यानुसार कर बसवून वसुली करतात. उदा. केंद्रसूचीमध्ये आज एकूण १०० विषय आहेत. सुरुवातीस यात ९७ विषय होते. त्यात संरक्षण, अणुऊर्जा, नागरिकत्व, केंद्रीय गुप्तवार्ता, परराष्ट्र व्यवहार, रेल्वे, रिझर्व्ह बँक, विमा, जनगणना असे देशपातळीवरील महत्त्वाचे विषय आहेत. या सूचीतील १५ बाबींवर केंद्र सरकार कर आकारू शकते. राज्य सूचीमध्ये सध्या ६१ विषय आहेत. पूर्वी येथे ६६ विषय होते. कायदा, सुव्यवस्था, पोलीस, सार्वजनिक आरोग्य, कारागृहे, शेती, मासेमारी, भूमी, पथकर, जमीन

महसूल असे विषय या सूचीत प्रामुख्याने आहेत. या विषयांवर राज्य सरकारे आपापल्या राज्यात कायदे करू शकतात, राबवू शकतात. या सूचीतील २० बाबींवर राज्य सरकारे कर आकारू शकतात.

सामाइक महत्त्व असणारे ५२ विषय सध्या समवर्ती सूचीत आहेत. पूर्वी यात ४७ विषय होते. यात ठळकपणे पाहता- शिक्षण, वने, कामगार संघटना, सामाजिक सुरक्षा असे विषय आहेत. (समवर्ती सूची ही संकल्पना आपण ऑस्ट्रेलियाच्या संविधानाकडून घेतलेली आहे.) यातील विषयांवर कायदे करणे, ते राबवणे, कर बसवणे यावर केंद्र आणि राज्ये असा दोघांचा अधिकार आहे. या यादीतील तीन बाबींवर केंद्र आणि राज्ये असे दोघेही कर बसवू शकतात. एकाच विषयावर जर केंद्राने आणि राज्याने केलेल्या कायद्यांमध्ये विसंगती आढळली; तर केंद्राचा कायदा वरचढ ठरेल, तो स्वीकारला जाईल व राज्याचा रद्द मानला जाईल (अनु. २५१). याद्या आणि विषय निरनिराळे असले तरी केंद्र सरकार राज्यांच्या विषयांवर कायदे जरूर करू शकते. संविधानाने अशी परिस्थिती केव्हा येऊ शकते, हे स्पष्ट केले आहे. उदा. अनु. २४९ अनुसार राष्ट्रीय हित लक्षात घेऊन राज्यसूचीतील विषयावर कायदा करण्याचा ठराव जर राज्यसभेने संमत केला, तर असा कायदा संसदेने संमत करणे कायद्याला धरून होईल. त्यात काही तांत्रिक अडचण येणार नाही. जर राष्ट्रीय आणीबाणीचा अंमल सुरू असेल, तर राज्यसूचीतील कोणत्याही बाबीवर कायदा करण्याचा अधिकार अनु. २५० अनुसार संसदेस असेल. जर दोन किंवा अधिक राज्यांच्या विधी मंडळांनी तसा कायदा करण्याची मागणी केली असेल, तर संसद त्याची दाखल घेऊन तो कायदा संमत करू शकते (अनु.२५२). तर, अनु.२५३ अनुसार एखाद्या आंतरराष्ट्रीय कराराची कार्यवाही करण्यासाठी जरूर पडल्यास राज्याच्या विषयासंबंधी संसद कायदा करू शकते. थोडक्यात काय, ही सर्व व्यवस्थाच केंद्राचा वरचष्मा सिद्ध करणारी आहे.

गेल्या सुमारे सात दशकांचा अनुभव असा की, संविधानाचा उपयोग करून केंद्राने आपले स्थान अधिकच बळकट केले आहे आणि परिणामतः राज्यांचा तक्रारीचा सूर अधिक तीव्र होत गेला आहे. हे दोन मार्गांनी घडून आलेले दिसते. एक म्हणजे, केंद्रसूचीमधील ९७ क्रमांकाच्या विषयाचा आणि अनु. २४८ चा आधार घेऊन अवशिष्ट तसेच तेथे नमूद नसलेल्या कोणत्याही विषयावर कायदे करण्याचा जणू अनिर्बंध अधिकारच केंद्राला मिळाला आहे. केंद्राने तो भरपूर वापरला आहे. अवशिष्ट अधिकाराचा वापर करून केंद्राने तब्बल ९ कायदे संमत केल्याचे सरकारिया आयोगाने १९८३ मधील आपल्या अहवालात दाखवून दिले आहे. राज्यांची स्वायत्तता यामुळे धोक्यात आली, अशी तक्रार राज्यांनी केली; पण येथे कोणत्या नियम-कायद्याचे उल्लंघन झाले नव्हते. औचित्यभंग मात्र झालेला दिसतो. केंद्राने संमत केलेल्या अनेक कायद्यांचा मूळ गाभा राज्यांच्या विषयातील आहे, असे राज्य सरकारे दाखवून देतात. लोकपाल-लोकायुक्त विधेयक २०१२, भूमी अधिग्रहण व पुनर्वसन कायदा २०१३, राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा २०१३, राष्ट्रीय अन्वेषण प्राधिकरण कायदा २००८ हे सर्व कायदे सुव्यवस्था, स्थानिक प्रशासन, भूमी, पोलीस अशा राज्यांच्या विषयांसंबंधी आहेत. मात्र ते कायदे केंद्राने केले आहेत. त्या कायद्यांच्या चर्चेच्या वेळी हा संघर्ष उघडपणे व्यक्त झाला होता. केंद्राच्या या भूमिकेला आव्हान देण्यासाठी संविधानाच्या अनु. १३१ चा आधार घेऊन छत्तीसगड राज्याने केंद्राविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली आहे. वरील कायद्यांच्या बाबतीत समान मुद्दा असा की- राज्यांच्या स्वायत्त अधिकारांवर केंद्र सरकार आक्रमण करीत आहे, असे सकृतदर्शनी दिसते. स्वायत्तता घटवली न जाता उलट ती टिकवली पाहिजे, वाढवली पाहिजे- अशी मागणी राज्य सरकारे सतत करीत आली आहेत. तमिळनाडूची राजमन्नार समिती (१९६९), पंजाबचा आनंदपूरसाहेब ठराव (१९७३), प. बंगाल आणि ओडिशा यांची मागणी (१९७७) ही याची उदाहरणे आहेत. राज्यांच्या स्वायत्ततेवर आक्रमण करणारी समवर्ती सूची रद्दच करावी, अशी मागणी मध्यंतरी तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनी केली होती. संघराज्यीय संरचनेला सातव्या अनुसूचीने मूर्त रूप मिळते. देशात गाजून गेलेल्या केशवानंद भारती (१९७३) व एस.आर. बोम्मई (१९९४) या प्रकरणांमध्ये संघराज्य प्रणाली हा संविधानाच्या मूळ संरचनेचा अविभाज्य भाग असल्याचे नमूद आहे. त्यामुळे ही अनुसूची रद्द करण्याचा प्रश्न निकाली निघतो.

संविधानाचा टीकात्मक विचार करणारे अनेक आयोग वा समित्या होऊन गेल्या. त्यांतील बहुतेकांनी केंद्र आणि राज्यांच्या संबंधांवर टिप्पणी केली आहे. त्यात सरकारिया आयोग (१९८३), वेंकटचल्लय्या आयोग (२००२), पूनछी आयोग (२०१०) हे प्रमुख आहेत. या तीनही आयोगांचे

अध्यक्ष सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश. तीनही अहवाल भारदस्त आणि अभ्यासपूर्ण आहेत. केंद्र आणि राज्ये यांनी समजुतीने व सहकार्याने काम करावे, असे त्यांनी म्हटले आहे. मात्र त्यांनी फार मोठ्या सुधारणा किंवा संरचनात्मक बदल काही सुचवले नाहीत.

प्रस्तुत अनुसूचीचा वापर करताना तीन याद्यांमधील विषयांमध्ये फेरबदल करूनही केंद्राने आपले काम साधले आहे. आपला प्रभाव कायम राखण्याचा तो दुसरा राजमार्ग आहे. एखादा विषय राज्यसूचीमधून जर समवर्ती सूचीत वर्ग केला, तर तो केंद्राच्याही अखत्यारीत आपोआपच येतो. तो विषय हाताळणे, त्याबाबत कायदे करणे हे केंद्र सरकार आता विनाअडथळा करू शकते. उदा. सन १९७६ च्या बेचाळिसाव्या संविधान सुधारणेने राज्यसूचीतील ५ विषय समवर्ती सूचीत हस्तांतारित करण्यात आले. ते विषय : शिक्षण, वने, वजने-मापे, वन्य पशू-पक्षी संरक्षण तसेच सर्वोच्च व उच्च न्यायालय वगळून इतर न्यायालयांचे संगठन आणि प्रशासन. समवर्ती सूचीत आता ४७ च्या जागी ५२ विषय झाले आहेत. संविधान सुधारणा क्र. ६ (१९५६), क्र.८८ (२००३) याद्वारे नवे विषय केंद्रसूचीत समाविष्ट झाले. आता पर्यटन हा विषय समवर्ती सूचीत घेण्याची मागणी होत आहे. सन २०११ च्या अशोक चावला समितीने जलसंपत्ती हा राज्यसूचीतील १७ क्रमांकाचा विषय समवर्ती सूचीत घ्यावा अशी शिफारस केली आहे. कोरोना महामारीच्या निमित्ताने आरोग्य हा विषय राज्यसूचीऐवजी समवर्ती सूचीत असावा असे सुचविले जात आहे. बदलता काळ, प्रशासनाच्या सोई, धोरणातील एकजिनसीपणा असे मुद्दे त्यामागे आहेत. त्यांच्यात तथ्यही आहे. तथापि, या शस्त्राचा वापर केंद्राने केवळ अधिकार गाजवणे, राज्यांवर कुरघोडी करणे यासाठी करू नये, राज्यांचा विश्वास गमावू नये, असे येथे म्हणणे भाग आहे.

या अधिकारकक्षेबद्दल वाद असलेली अनेक प्रकरणे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांसमोर नेहमी येतात. सुदैवाने न्यायालयांनी या प्रकरणांमध्ये वस्तुनिष्ठ, शास्त्रशुद्ध, सकारात्मक व व्यवहारी भूमिका घेतलेली आढळते. केवळ विषय अमुक एका यादीत आहे म्हणून दुसऱ्या दृष्टिकोनातून त्याचा विचारच करायचा नाही, अशी संकुचित आणि स्थितिशील भूमिका न्यायालय घेत नाही. कायद्यातील केवळ शब्दाकडे न पाहता त्यामागील उद्दिष्ट, वापर, उपयोजन, परिणाम असा व्यापक आणि समन्वित विचार आवश्यक आहे, असे न्यायालय रास्तपणे मानते. त्यामुळे राज्यसूचीमध्ये ३२ व्या क्रमांकावर सहकारी संस्था हा विषय असला तरी केंद्रसूचीतील ४५ क्रमांकाच्या बँकव्यवसाय या विषयाचा आधार घेऊन आता सहकारी बँका केंद्रीय नियंत्रणाच्या- रिझर्व्ह बँकेच्या कक्षेत आणण्यात आल्या आहेत (जून २०२०.) तसे पाऊल केंद्राने उचलले आहे. याने सहकारी बँकव्यवसाय सुधारण्यास मदतच होणार आहे.

सुरुवातीस सुचवल्याप्रमाणे जेव्हा सातव्या अनुसूचीचा पुनर्विचार होईल, तेव्हा तो तीन टप्प्यांमध्ये करणे गरजेचे आहे. एक म्हणजे- एखादा विषय कोणत्या यादीत आहेत ते यांत्रिकपणे न पाहता त्याची पार्श्वभूमी, वापर, उद्दिष्ट, परिणाम, औचित्य हे सर्व लवचिकपणे पाहिले जावे. पोलीस आणि सुव्यवस्था हे विषय राज्यांच्या अखत्यारीत आहेत, हे खरे. पण गुन्ह्यांना प्रभावी आळा घालण्यासाठी केंद्र तसेच राज्ये यांच्यात समन्वय, एकसूत्रता व सहकार्य असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी हा विषय समवर्ती सूचीत असावा, असे आग्रहाने मांडले जात आहे. सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, नक्षलवादी कारवाया, तस्करी, अमली पदार्थांचा व्यापार, दहशतवाद, हवाला व्यवहार असे गुन्हे एका राज्यापुरते मर्यादित नसतात. अनेक गुन्ह्यांचे आंतरराष्ट्रीयीकरण झालेले आहे. गुन्हेगारीच्या रीती-पद्धतीत बदल झाला असल्याने त्याचा तपास करणारी यंत्रणाही त्यानुसार बदलायला हवी, असे नाही का? यासाठी हे आवश्यक मानले जात आहे. दुसरे असे की, संविधानाचा आज सात दशकांहून अधिक काळ वापर होत असला, तरी वरवरचे बदल वगळता तीनही याद्यांचा मुळातून विचार झालेलाच नाही. त्यामुळे त्यातील कालबाह्य झालेले व प्रस्तुतता संपलेले विषय वगळण्याचे काम करावे लागेल. जसे- समवर्ती सूचीतील विषय क्र. २०, २७ व ३७; केंद्र सूचीतील विषय क्र. ३४ व ५९. केंद्रसूचीतील विषय क्र.५० आणि समवर्ती सूचीतील क्र.३३ क ही पुनरुक्ती टाळावी लागेल. केंद्रसूचीतील क्र. ३१ आणि क्र. ३९ हे विषय एकाच नोंदीखाली घेता येतील. वस्तू व सेवा कर २०१७ मध्ये देशात सुरू झाल्यानंतर केंद्र आणि राज्यांचे अर्थकारणच बदलून गेले आहे. त्याचा विचारही या संदर्भात उचित ठरतो. तिसरे म्हणजे-

आजच्या जमान्यात जिव्हाळ्याच्या असणाऱ्या अनेक

**(पृष्ठ ३६ वर**

कथा

माधव कौशिक

# चेहरा आणि आरसा

लाला रामदीनने आपली बॅग बंद केली. आपल्या समोरचे पेपर्स गोळा केले. डायरी बंद केली. नाकावरचा चष्मा काढून आपल्या कोटाच्या खिशात ठेवला आणि आपल्या कारमध्ये बसून निघून गेले. ते कुठे गेले, हे कुणीही सांगू शकत नव्हतं. लाला रामदीन पोहोचले. कार्यालयात आता फक्त पाच माणसं उरली होती. मंत्री महोदय, लाला रामदीन आणि त्यांच्याशिवाय आणखी तीन कार्यकर्ते. लाला रामदीननी मनोमन ओळखलं होतं, ही असामी काही सामान्य नाही. सगळेच नि:शब्द होते. मंत्री महोदयांच्या चेहऱ्यावरील औदासीन्याचे भाव अगदी पारदर्शी स्वरूपात दिसत होते. ‘‘तुम्ही सगळे चुकीच्या बातम्या देत आलात. आता या शेवटच्या दिवसांत काय करू शकतो आपण? लाला रामदीननी दिलेली माहिती चुकीची असू शकत नाही. याचा अर्थ, आमचा पराभव निश्चित आहे. आणि ही बाब शंभर टक्के खरी ठरणार.’’

मध्यरात्रीच्या समयीसुद्धा मुख्य निवडणूक कार्यालय पूर्णपणे गजबजलेलं होतं. त्या महालवजा इमारतीच्या तिन्ही मजल्यांवर शेकडो कार्यकर्ते वेगवेगळ्या कामांत गुंतले होते. दिवस-रात्र भोजनावळी चालू होत्या. जेवण, चहापाणी, बिडी-सिगारेट सगळ्याची व्यवस्था या इमारतीत केली गेली होती. झेंडे, बॅनर्सपासून कार्सची भाडी, सगळ्या मोठ्या नेत्यांच्या येण्या-जाण्याच्या व्यवस्थेपर्यंत सगळी कामं इथूनच चालत होती.

सगळ्यात वरच्या मजल्यावरील एका हॉलमध्ये चौधरी रामरतन, भोला पंडित, राजाराम सैनी हे इथल्या सगळ्या गजबजाटातही गंभीर विचारविनिमयात गढून काही कागदपत्रांची छाननी करीत बसलेले होते.

‘‘भोला, ब्राह्मणांच्या सातही गावांची पंचायत कशी का होईना, आपल्याला समर्थन द्यायला तयार झाली ना; तर पाहा कशी मजा येईल ते.’’ रामरतन पुलकित होत म्हणाला.

‘‘तर मग काही दान-धर्म व्हायला हवा नाऽ?’’

‘‘दान-धर्म?’’ रामरतनचे डोळे विस्फारले गेले. ‘‘मागच्या आठवड्यात याच कामासाठी पूर्ण पन्नास लाख रुपये पाठवले गेले नाऽ?’’ कुणास ठाऊक, नीटपणे जागेवर गेले की नाही ते! आतापर्यंतच्या बातम्या तर आपल्या विरोधातच येत आहेत.’’

‘‘एवढं सगळं झालं आणि मला त्याची साधी माहितीही नाही?’’

‘‘हो ना, कारण ती सगळी व्यवस्था खुद्द मंत्रीसाहेबांनी केली होती. माझ्याकडे ही जबाबदारी आली असती, तर मी तुमच्याशिवाय आणखी कुणावर विश्वास ठेवू शकत होतो? हे कोण सांगणार त्यांना की, आता अशा परिस्थितीत मधली माणसं पैसे खाऊन-पिऊन छान ढेकर देतात आणि आपल्याला सांगतात की, मतदारांना पैसे नीट वाटलेत म्हणून. बरं, या पैशांचा कुठं काही हिशोब किंवा लिखापढी तरी असते का?’’ रामरतन सांगत होता.

राजाराम आपल्या जागेवरून उठून दुसरीकडे गेला, तर भोला त्याच्या कानात हळूच सांगू लागला, ''मधल्या मध्ये आपला वाटा तर मारला गेला नाऽ!''

''भोलाऽ तू कशाला काळजी करतोस? झेंड्याचं कापड, गाड्यांच्या पेट्रोलचा खर्च आणि गावागावांतल्या प्रचारकार्यालयाचा खर्च- हे सगळं तर आपल्यालाच पाठवायचं आहे ना? सगळी व्यवस्था होईल. तू थोडा चतुराईनं वाग, म्हणजे झालं.''

एवढ्यात लाला रामदीन आले तसे ते दोघे अदबीने उठू उभे राहिले.

''लालाजी, नमस्कार!''

''नमस्कार! काय खबरबात आहे रामरतन? सगळं व्यवस्थित सुरू आहे ना?''

''आतापर्यंत तर आपणच आघाडीवर आहोत. लाखाच्या आसपास तर पोहोचलो असूच.'' रामरतन नेहमीच रामदीनच्या समोर सगळं बढाई मारत सांगायचा.

लाला रामदीन या निवडणुकीचे मुख्य आर्थिक व्यवस्थापक होते. सगळा पैसा जमा करणे, तो नीट वितरित करणे हे सगळं त्यांच्याकडेच होतं. म्हणून लाल रामदीनचा मानमरातब मंत्रिमहोदयांपेक्षा कुठेही कमी नव्हता. आजपर्यंत रामदीनशिवाय कुणालाही ठाऊक नव्हतं, हा एवढा पैसा कुठून येतो ते. फक्त खर्च होणारा पैसा सगळ्यांना दिसत होता.

''भोला, तुझ्या या ऑफिसच्या खर्चासाठी दोन लाख पुरे होतील ना?'' रामदीननी बॅग उघडून आपली डायरी काढली आणि नाकावरील चष्मा वर सरकवीत त्यावरून पाहत म्हणाले.

''फक्त दोन लाख? सात लाखांपेक्षा कमी खर्च नाही इथला. एवढं मोठं ऑफिस थाटलं... एवढे लोक येणारे जाणारे...''

''किती लोक रे बाबा? एक हजार लोकवस्तीचं तर गाव आहे. सात दिवसांचा चहापाण्याचा खर्च दोन लाख म्हणजे कमी झाला नाही.''

''शेटजी, निवडणुकीच्या माहोलात कोण भडवा चहापाण्यावर खूश राहतो हो? सगळेच्या सगळे!''

''बरं, बर-'' रामदीननं बोलणं तिथंच थांबवलं.

''शेठजी, विरोधी पक्षाच्या ऑफिसात सदावर्त सुरू आहेत. जो जे मागेल ते त्याला मिळतं. आणि तुम्ही मात्र...''

''नाही रे भोला, तुला समजलं नाही. आमच्यापर्यंत काही तक्रारी आल्यात नाऽ! त्यांच्यापर्यंत ना झेंड्याचं कापड पोहोचलं आणि ना त्यांना बॅनर्स मिळाले. लोकांनी मधल्या मधेच गडप केलेला दिसतो हा माल!''

रामरतन आणि भोलानं एकमेकांकडे पाहिलं. मग रामरतन आपली बाजू सावरत म्हणाला, ''लालाजी, भोलाच्या वस्तीत खुद्द मी जाऊन आलो. तिथं तर प्रत्येक घरावर आपलेच झेंडे आहेत लावलेले. लहान मुलं, मोठे- सगळ्यांना बॅनर्स, बिल्ले मिळाले. कुठेही कमतरता केली नाही.''

लाला रामदीनच्या लक्षात त्यांची मिलीभगत आली, तेव्हा ते गप्प राहिले. हीच तर त्यांची खासियत आहे. सगळं पाहून-सवरून त्याकडे काणाडोळा करायचा. असं भासवायचं की- आपल्याला काहीच ठाऊक नाही.

एकदा खुद्द मंत्रिमहोदय त्यांना म्हणाले होते- ''रामदीन, एवढा मोठा घोटाळा झाला आणि तुम्ही गप्प राहिलात. आम्हाला काहीच सांगितलं नाही?''

''असा कोणता मोठा घोटाळा? एवढ्या मोठ्या निवडणुकीत दोन-चार लाख म्हणजे किस पेड की पत्ती! हे काय खातील बिच्चारे? हांऽ पाच-सात लाखांवर जोडे-चपला कमावल्या नाहीत, तर आपलाच सत्यानाश होईल ना? दहा-वीस हजार मीटर कपडा इकडे-तिकडे गेला, म्हणजे काय आभाळ कोसळलं नाही ना? लोकांना आता खायला-प्यायला घातलं नाही, तर उद्या चालून आणि...'' रामदीन जणू डोळ्यांची भाषा वापरत हसले. त्यांचा चेहरा शरमेने लाल झाला होता.

मंत्री महोदयसुद्धा काहीसे भारावून म्हणाले, ''रामदीन, तुम्ही नसतात तर आम्ही कामातूनच गेलो असतो. बरं, 'त्यांनी' काही दिलं?''

''दिलं तर! पण परमिटबद्दलचं कबूल करवून घेऊनच.''

''चलाऽ ठीक झालं. एवढ्या मोठ्या परमिटसाठी आणखी दुसरं कुणी तयार होणारही नाहीच.''

''तो अधिकारी आला नव्हता ना? रामदीननं विचारलं.

वेळेवर सगळे येतीलच. आधी बोलावून आपलीच मारून घ्यायची आहे का? अगोदरच लोक फार हुशार झालेले आहेत. निवडणुकीच्या दिवशी बघा सगळे आपापल्या कामावर असतील. तुम्ही निश्चिंत राहा. फक्त पैसा कमी पडायला नको. माझ्या जिथे कुठे सह्या लागतील, त्या घेऊन ठेवा.''

लाला रामदीननं आपल्या बॅगमधून वीसेक कोरे कागद बाहेर काढले आणि त्यांच्यासमोर टेबलवर पसरले. मंत्री महोदय शांतपणे सह्या करू लागले. प्रत्येक कागद पुढे करीत लाला रामदीन कुण्या एका व्यक्तीचं फक्त नाव सांगायचे आणि मंत्री महोदय त्या कागदावर लिहिल्या जाणाऱ्या मजकुराचा अंदाज लावीत होते. सगळ्या कागदांवर सह्या झाल्यावर मंत्री महोदयांनी हसत विचारलं, ''आताही झोळी रिकामी राहणार का रामदीन?''

''कुबेराची तिजोरी कधी रिकामी राहिली आहे का साहेब?'' आणि दोघेही मोठ्याने हसले.

लाला रामदीन आपल्या हातातल्या डायरीची पाने उलट-सुलट करून पाहू लागले. मग रामरतनकडे न पाहताच ते म्हणाले, ''रामरतन, एक गोष्ट सांगतो. बालकरामनं तर एकाच तारखेला कारचं भाडं दोनदा वसूल केलेलं दिसतं. एकदा माझ्याकडून आणि दुसऱ्यांदा आपल्याच पी.ए.कडून. पण त्याला मात्र सांगू नकोस. तो तसाही आता बाराच्या भावात गेला! आम्हाला काय...''

लाला रामदीननं बालकरामला माध्यम करून रामरतनलाच उघडं पाडलं होतं. रामरतनच्या अंगातलं धावणारं रक्त जणू काही क्षणांसाठी थांबल्यासारखं झालं होतं. त्याने घाबरून भोलाकडे पाहिलं, पण भोलानंही त्याच्यावरची आपली नजर दुसरीकडे वळविली. नाकावरून खाली घसरलेल्या चष्म्याच्या वरून लाला रामदीन त्या दोघांकडेही बेरकीपणे पाहत होते- काय प्रतिक्रिया देतात म्हणून.

''ठीक आहे. आता एक काम करायचं. गाडी घ्या आणि ताबडतोब पाच गावांमधून एक चक्कर टाकून या. काय?''

तसे रामरतन, भोला, राजाराम आणि आणखी काही कार्यकर्ते एका जुनाट जीपमध्ये जाऊन बसले. जीपच्या समोरच्या भागावर निवडणूक चिन्हाचा एक भला मोठा झेंडा फडकत होता. जीप शहरातून बाहेर पडली आणि कच्च्या रस्त्यावरून धूळ उडवीत गावांकडे धाऊ लागली.

''लाला मोठा बनेल आहे. त्याच्यापासून सावध राहा'' रामरतनने तोंडाला बॉटल लावून त्यातले दोन घोट घशात घातले आणि बॉटल राजारामकडे दिली. अशाच काही बॉटल्स भाऊबंदकीचं नातं निभवीत गाडीतल्या गाडीत फिरत रिकाम्या झाल्या. हल्ला-गुल्ला करीत सगळेच उदात्त राजकारणावर भाषणे देऊ लागले. गाव जवळ येताच काहींनी सुचवलं- 'बाटल्या सीटखाली लपवून ठेवा. गाव जवळ येत आहे.'

''बाहेर फेकून द्या नंऽ''

''नाहीऽ फेकू नका. उद्या मी त्या भंगारवाल्याला विकून टाकीन. सीटखाली सरकवून द्या.''

''गाववाल्यांना ठाऊक नाही काय आपण किती सज्जन आहोत ते? तेच तर आपण पाठवलेल्या दारूवर ताव मारत त्यावर इथं धिंगाणा घालत असतील!'' रामरतन संतापला.

''गप रेऽ सरपंचाचा वाडा जवळ आला आहे.'' भोलानं त्याला फटकारलं.

जीप सरपंचाच्या वाड्यासमोर थांबली. वाड्यात काही माणसं बोलत बसलेली होती. सरपंच आणि तीन ओळखीचे कार्यकर्ते मात्र उदास दिसत होते. सगळेच जीपमधून उतरले. त्यापाठोपाठ झेंडे, बॅनर्स, काठ्या, बिल्ले जीपबाहेर काढू लागले.

''कशाला हा सगळा पसारा बाहेर काढतोस रे रामरतन? गावातला कुठलाही माणूस आपल्याला एकही मतपत्रिका आणून देणार नाही या वेळी. खास म्हणजे, दलित आणि चांभार तर जणू पाण्यात मीठ घालून बसले आहेत! आपली परिस्थिती मोठी कठीण आहे. आपल्या विरोधी पार्टीतले लोक एवढी ताकद लावून काम करीत आहेत की, विचारू नकोस. प्रत्येक घरी जाऊन एकेका मतदाराला ते भेटत आहेत. त्यांच्या अडचणी जाणून घेतात, त्यांच्यात मिळून-मिसळून वागतात. आणि तुम्ही? अर्ध्या रात्री कधी तरी येता आणि तेही नशेत धुंद होऊन. इथं माझ्याकडे बसून खाता-पिता आणि पुन्हा गायब होता. आजच आपली ही अवस्था वरच्या लोकांना सांग, नाही तर आपण मातीत गेलोच म्हणून समजा!''

तशी सगळ्यांची नशा खाड्कन् उतरली. मंत्री महोदयांचा पराभव म्हणजे, त्या सगळ्यांसाठी कुकर्माची सजाच ठरणार होती. सगळ्यांच्या काळजात धडकी भरली. सगळे काही न बोलता तसेच पुन्हा जीपमध्ये बसले आणि दुसऱ्या गावाकडे रवाना झाले. त्यानंतर आणखी पुढच्या गावाला. सगळ्याच गावांतून हे असंच ऐकायला मिळालं, तर आपली हार नक्कीच आहे, हे आता सांगायला कुण्या ब्रह्मदेवाची गरज नव्हती. रात्रभर अशीच गावोगावी जीप फिरवून शेवटी ते सकाळी-सकाळी पुन्हा शहरातल्या मुख्य कार्यालयात दाखल झाले.

सगळ्यांनी मनावर दगड ठेवून थंड मनाने ही सगळी परिस्थिती लाला रामदीनच्या कानांवर घातली. लाला

रामदीन त्या सगळ्यांच्या चेहऱ्यावरील भाव वाचत होते. शेवटी त्यांच्या तोंडून एक सत्य बाहेर पडलं. ''हे सगळं आपल्या कर्माचं फळ आहे. मला हे सगळं स्पष्ट दिसत होतं. या गोष्टी आता आपल्यातच ठेवा. आता फक्त दोन दिवस उरले आहेत. काही तरी करावंच लागेल ना? मागच्या वेळी रात्रीतून सगळं उलटंपालटं केलं होतं ना? वाईट याचं वाटतं की, या वेळी पैशांचीही जादू चालली नाही. लोक पैसेही घेतात आणि मतही देत नाहीत ना स्सालेऽऽ!''

लाला रामदीनने आपली बॅग बंद केली. आपल्या समोरचे पेपर्स गोळा केले. डायरी बंद केली. नाकावरचा चष्मा काढून आपल्या कोटाच्या खिशात ठेवला आणि आपल्या कारमध्ये बसून निघून गेले. ते कुठे गेले, हे कुणीही सांगू शकत नव्हतं.

लाला रामदीन पोहोचले. कार्यालयात आता फक्त पाच माणसं उरली होती. मंत्री महोदय, लाला रामदीन आणि त्यांच्याशिवाय आणखी तीन कार्यकर्ते. लाला रामदीननी मनोमन ओळखलं होतं, ही असामी काही सामान्य नाही. सगळेच नि:शब्द होते.

मंत्री महोदयांच्या चेहऱ्यावरील औदासीन्याचे भाव अगदी पारदर्शी स्वरूपात दिसत होते.

''तुम्ही सगळे चुकीच्या बातम्या देत आलात. आता या शेवटच्या दिवसांत काय करू शकतो आपण? लाला रामदीननी दिलेली माहिती चुकीची असू शकत नाही. याचा अर्थ, आमचा पराभव निश्चित आहे. आणि ही बाब शंभर टक्के खरी ठरणार.''

मग काही क्षण थांबत ते पुढे बोलू लागले, ''पण विजय-पराजय तर निवडणूक झाली तरच ठरेल ना? ही निवडणूकच स्थगित व्हायला हवी. निवडणूक स्थगित होईल, अशी परिस्थिती निर्माण करा. हे काम ना मी करू शकत आणि ना लाला रामदीन; हे तुम्हीच करू शकता. बूथ बळकावण्यापासून खोटं मतदान करण्यापर्यंत अनेक पर्याय आहेत. सरकारी यंत्रणेचा गैरवापर होत आहे, चुकीची कामं होत आहेत- या बातम्या आतापासून पसरवणं अन् प्रसिद्धी करणं सुरू करा. केंद्रातल्या पर्यवेक्षकांना बोलावून काय चुकीचं काम करायचं आहे, ते त्यांच्या समोरच करा. लक्षात ठेवा- कुठलीही चूक त्यांच्या नजरेतून सुटायला नको. हे सगळं पाहून निवडणुकीला स्थगिती द्यायला त्यांना काही वेळ लागणार नाही. हे सगळे उपाय बिनकामी ठरले, तर शेवटी आपल्याजवळ हत्यारं ठेवा. बापूजींच्या अहिंसेला थोडंसं बाजूला ठेवलं, तर काही आभाळ कोसळणार नाही आपल्यावर!''

''पण एकदा ही निवडणूक रद्द झाली, तरी पुन्हा काही दिवसांनी होणारच ना?'' एका कार्यकर्त्याची शंका पुढे आली.

''पण हीच परिस्थिती पुन्हा उसळली, तर तेच होईल ना?'' दुसऱ्या कार्यकर्त्याने परस्पर उत्तर दिलं.

''आपण पुन्हा हेच करायचं.''

''होऽ पण असं कधीपर्यंत?''

''जोपर्यंत आपल्या विजयाची खात्री वाटत नाही, तोपर्यंत.''

मंत्री महोदयांनी आपला शेवटाचा निर्णय सांगितला आणि बैठकीचा समारोप केला.

अनुवाद : **रवींद्र शोभणे,**
Mob. 9822230743

**पृष्ठ ३२ वरून)**

विषयांची ही अनुसूची दखलच घेत नाही, ते सुधारावे लागेल. ग्राहकसंरक्षण, पर्यावरणसंरक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, सुशासन, हवामान-बदल हे आता कळीचे मुद्दे आहेत. त्यांना योग्य ते स्थान देऊन त्याबाबत नियम-कायदे करण्याची यंत्रणा निश्चित करावी लागेल, म्हणजे त्यातील संदिग्धता नाहीशी होऊन स्पष्टता येईल. सातव्या अनुसूचीचा पुनर्विचार ही वैधानिक, प्रशासनिक आणि कार्यकारी शाखांमध्ये गुणात्मक सुधारणा करण्याची अमोल संधी आहे. या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेणे इष्ट होईल. केंद्र व राज्यांमध्ये सध्या अनेक कारणांनी कमी-जास्त प्रमाणात का होईना पण घर्षण, अविश्वास, दुरावा व कटुता या भावना निर्माण झालेल्या दिसतात. त्या दूर करण्याचा मार्ग याद्वारे मिळाला आहे. या आघाडीवर शासन नेमकी कोणती आणि केव्हा कार्यवाही करते याची आता प्रतीक्षा आहे.

**डॉ. संतोष दास्ताने,** पुणे
santosh.dastane@gmail.com
Mob. 9822009954

विधायक

संजय स्वाती भावे

# कोरानातही शेवटचा दिन गोड झाला...

'माझ्या पश्चात माझे सर्व दागिने विकून त्यातून जे पैसे येतील ते हेमलकसाच्या लोकबिरादरी प्रकल्पास देणगी म्हणून द्यावेत'- असं गेली पन्नास वर्षे अहमदाबादमध्ये राहिलेल्या, पण पुण्याच्या सदाशिवपेठेत माहेर व शनिवारात सासर असणाऱ्या आईने तिच्या मृत्युपत्रात २१ जानेवारी २०१३ रोजी लिहून ठेवले होते.

माझ्या आईचे २७ एप्रिल २०२० रोजी देहावसान झाले. तिचे नाव स्वाती श्रीपाद भावे. ती ८० वर्षांची होती. ती गेली कित्येक महिने अंथरुणाला खिळलेली होती. पण मृत्यूचे निमित्त मात्र करोना झाला.

आईची देणगीची इच्छा आम्ही तिघा भावंडांनी पूर्ण केली. आईच्या दागिन्यांची किंमत ९ लाख ३३ हजार रुपये भरली. ती रक्कम आम्ही भावंडांनी लोकबिरादरी प्रकल्पाला देणगी म्हणून दिली, पण दागिने विकले नाहीत. ते दागिने वडिलांनी अहमदाबादच्या 'इस्रो'त तीस वर्षे सायंटिस्ट म्हणून इनामेइतबारे केलेल्या नोकरीतून आणि आईने काटकसरीने संसार करून वाचवलेल्या पै-पैशातून घेतलेले होते. त्यात आमची भावनिक गुंतवणूक आहे. म्हणून ते विकणं आम्हा भावडांना अजिबात मान्य नव्हतं. तेव्हा आम्ही भावा-भावजयांनी ते आपापसांत वाटून घेतले व देणगीची रक्कम पण समभागाने भरली.

स्वत:च्या दागिन्यांची रक्कम देणगी देण्याच्या माझ्या आईच्या या कृतीत मला काही बाबी निदर्शनास आणाव्या असे वाटते.

सहसा स्त्रिया दागिन्यांच्या बाबतीत शेवटपर्यंत अलिप्त नसतात. त्या स्वत:चे दागिने मुली, सुना किंवा घरातील स्त्रीवर्गातील आवडत्या व्यक्तीला द्यायचे पसंत करतात. अनेक वेळा असा काही निर्णय घ्यायच्या आधीच स्त्रियांचे जीवन संपते. पण माझ्या आईने देणगीचा निर्णय वडिलांच्या मृत्यूच्या सहा वर्षांनंतर व तिच्या मृत्यूच्या सव्वा सहा वर्षे आधी, अगदी जाणीवपूर्वक घेतला होता; एवढेच नाही तर तो कागदोपात्री लिहूनही ठेवला होता.

एरव्ही संसार नेटका करूनसुद्धा तिने आयुष्यात विशेष काही व्यवहार केले नव्हते. घरचे, बाहेरचे सर्व व्यवहार व बाजारहाट माझे वडीलच बघायचे. बँकेत तर ती एकटी कधीच गेली नव्हती. तिचे व्यवहार म्हणजे रद्दीवाल्याला रद्दी, बोहऱ्याला कपडे व घरगड्यांना पगार देणे. तिचे अक्षर चांगले होते, पण तिचे लिहिणे म्हणजे घरगड्यांनी घेतलेल्या अतिरिक्त सुट्ट्यांची कॅलेंडरवर नोंद आणि काही लहान-मोठ्या डब्यांवर तिने लिहून चिकटवलेल्या चिठ्ठ्या- 'बाजरीचे पीठ', 'वेखंड', 'पुण्याचा गोडा मसाला', 'तुळशीचं बी'. हेमलकसाच्या सेवाकार्यात सहभाग म्हणून स्वत:च्या दागिन्यांवर तुळशीपत्र ठेवायचा व्यवहार मात्र आईने चोख वटवला.

स्वत:च्या दागिन्यांची देणगी म्हणून वासलात लावणं ही आईच्या स्वभावतील वस्तुपराङ्मुख वृत्तीची पराकाष्ठा होती. मी तिच्यात कधी कोठल्याही प्रकारचा लोभ पाहिला नाही. संसारात पण तिनं कधी 'हे हवं, ते हवं' असं केलं नाही. खरं तर, मी तिला कधी काही मोठं मागताना किंवा महागाची खरेदी करताना पाहिलंच नाही. वडिलांमध्येही कुठल्या प्रकारची हाव तर सोडा, महत्त्वाकांक्षा नव्हती. त्यामुळे आमचं घर साधं व राहणीमान डामडौल नसलेलं

राहिलं. आम्ही भावंडं चंगळवादापासून दूर राहिलो.

आईनं पूजा, जप, स्तोत्रं म्हणणं, बुधवारचा उपास करणं व सण-वार साजरे करणं एवढं तिच्याने झाले तितकी वर्षं मनापासून केलं, पण आमच्यावर कधी त्याची सक्ती केली नाही. दानधर्माचं ती कधी बोलायचीच नाही. देवाधर्माच्या नावाने तिने किंवा माझ्या वडिलांनी कधी दानदक्षिणा दिली नाही. पण दारी आलेल्याला पै-पैसा द्यायची. जेवायच्या वेळी दारी आलेल्याला चटणी किंवा लोणचं आणि पोळी द्यायची. वडील नातेवाईकांना वेळोवेळी पैश्याची मदत करायचे. घराजवळच्या एका चॅरिटेबल हॉस्पिटलला त्यांनी एकदा बऱ्यापैकी देणगी दिली होती. ती गोष्ट पण आम्हाला काही वर्षांनंतर समजली. वडील मी पाहिलेल्या अत्यंत बुद्धिमान व सदैव विवेकबुद्धी जागृत असणाऱ्या व्यक्तींपैकी एक होते. पण दातृत्व त्यांचा पिंड नव्हता, कारण त्यांची घडणच भारतीय समाजाच्या काटकसरीच्या कालखंडात झालेली होती.

आमट्यांच्या कार्याचा आणि माझ्या आईचा संबंध आला- त्याचं कारण असं की मी डॉ.प्रकाश आमट्यांच्या ‘प्रकाशवाटा’ पुस्तकाचा गुजराती अनुवाद केला व तो सप्टेंबर २०१४ मध्ये प्रसिद्ध झाला. त्या वेळी माझे वडील हयात नव्हते. पण आईला गुजरातीतील माझ्या इतर लेखनाचेही कौतुक होते. तिने मूळ पुस्तक व अनुवाद दोन्ही नीट वाचले होते.

पुस्तकाचा प्रकाशन सोहळा अहमदबादच्या गुजरात विद्यापीठाच्या एका सभागृहात डॉ.प्रकाश व डॉ.मंदा आमटे यांच्या उपस्थितीत पार पडला. तेव्हा प्रकाशकांनी आमटे दांपत्याच्या राहण्याची उत्तम हॉटेलात व्यवस्था करायची तयारी दाखविली होती, पण त्या दोघांनी मनाच्या प्रेमळपणाने आमच्या घरी राहावयाचे पसंत केले. तेव्हा आम्हा सर्वांना ‘साधुसंत येती घरा तोचि दिवाळी, दसरा’ असे वाटले होते. त्या वेळी प्रकाशराव व मंदाताईंशी छान सहवास घडला. आमटे दांपत्य आमच्या घरून परत जायला निघाले, तेव्हा त्या वेळी माझ्या ७४ वर्षांच्या आईने, ६६ वर्षांच्या प्रकाशरावांना खाली वाकून नमस्कार केला, ते ओशाळले, त्यांनीही नमस्कार केला. मध्यंतरी बाबा आमट्यांच्या शताब्दीवर्षाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने डिसेंबर २०१४ मध्ये मी माझ्या बायको व मुली हेमलकसाला जाऊन आलो; पण आई येऊ शकली नाही, प्रवास तिला झेपणं शक्य नव्हतं.

ऑक्टोबर २०१८ मध्ये आमटे दांपत्य गांधीजींनी स्थापन केलेल्या ‘गुजराथ विद्यापीठा’च्या पदवीदान समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून पुन्हा एकदा अहमदाबादला आले होते. समारंभाच्या आधीच्या दिवशी संध्याकाळी विद्यापीठाच्या प्रथेप्रमाणे निमंत्रितांसाठी प्रमुख पाहुण्यांबरोबर अनौपचारिक बैठक, त्यांचे भाषण व जेवणाचा कार्यक्रम होता. त्यात मलाही सहकुटुंब निमंत्रण होते. आई त्या वेळी बरीच परस्वाधीन झाली होती. तरीही तिने कार्यक्रमाला यायची इच्छा व्यक्त केली व आम्ही मोटार, वॉकर, खुर्ची व मदतनीसाच्या साह्याने तिला घेऊन गेलो. ती जास्त चालू शकत नसल्याने अगदी शेवटच्या रांगेत बसली होती. कार्यक्रम संपल्यावर आमटे दांपत्य तिला भेटायलाही आले. या वेळी तिने खुर्चीतच बसून पण अगदी श्रद्धेने दोन्ही हात जोडून नमस्कार केला.

माझे वडील गेल्यानंतर आई दर वर्षी हेमलकसाच्या ‘लोक बिरादरी’ प्रकल्पाला अकरा हजार रुपये देणगी म्हणून पाठवायची. प्रकाश आमट्यांच्या वाढदिवसाचा मुहूर्त ती साधायची. त्याच तारखेला चेक पाठवायला मला जमायचंच असंही नाही. माझ्या स्वभावानुसार मी चालढकलही करायचो. मधे दोन वर्षे चेक पाठवायचं पूर्ण राहूनही गेलं. पण शेवटी ती आई ती आईच. तिनं ते मनावर घेतलं नाही. तिच्या पश्चात देणगीत खंड पडायची भानगड नको म्हणून तिने मृत्युपत्रातच कायमची तरतूद करून ठेवली. शिवाय मृत्युपत्राचा एकमेव व्यवस्थापक म्हणून माझीच नेमणूक लिहून ठेवली!

कुठे पुण्याच्या सदाशिव, शनिवार पेठा, कुठे अहमदाबादची सोसायटी, कुठे हेमलकसा आणि कुठे स्वाती भावे नावाची महाराष्ट्रापासून मनाने नाही, तरी शरीराने दूर होत गेलेली एक गृहिणी! या सर्वांना जोडणारा दुवा कोणता? तर सत्कार्याची जाणीव व त्याचं कृतिशील कौतुक.

आईला हॉस्पिटलमध्ये कोरोना डिटेक्ट झाला, त्यामुळे आयुष्याच्या शेवटच्या क्षणी तिच्याजवळ आम्ही कोणीच राहू शकलो नाही. तरीही तिचा शेवटचा दिन गोड झाला असावा, अशी आम्ही मनाची समजूत काढतो ती या देणगीमुळे!

**संजय स्वाती भावे,** अहमदाबाद, गुजरात
Mob. 09879731551

## बौद्धिकता व प्रयोगशीलता यामुळे कुमारांचे गाणे गाजले

दि. ३ एप्रिलच्या अंकावरील मुखपृष्ठावर तरुण वयातील कुमार गंधर्व यांचा गातानाचा फोटो पाहून एकाच वेळी आश्चर्य आणि आनंद वाटला. आश्चर्य यासाठी की, आजवर कधी शास्त्रीय संगीताविषयी किंवा गायकांसंबंधीचे लेख साधनात वाचल्याचे स्मरत नव्हते. आनंद यासाठी की, साधना या विषयाकडे वळले- अशी मिश्र भावना माझ्यासारख्या शास्त्रीय संगीताची आवड असणाऱ्या प्रत्येक वाचकाच्या मनात निर्माण झाली असेल.

अनुक्रमणिकेत पाहून कुमार गंधर्वांवरील लेख अतुल देऊळगावकर यांनी लिहिला आहे याचेही नवल वाटले. देऊळगावकर हे केवळ पर्यावरण या विषयाचे गंभीर अभ्यासपूर्ण लेखक आहेत, अशी मनाची धारणा झाली होती, पण हा लेख पाहून ते विभिन्न विषयांचे जाणकार आहेत हे समजले. त्यांचे लेख आम्ही कधी चुकवत नाही. अलीकडेच त्यांचे 'विश्वाचे आर्त' हे पुस्तक वाचले. भारत आणि इतर सर्व देशांमधील पर्यावरणाची किती अपरिमित हानी झाली आहे आणि या विषयाकडे सर्वसाधारण समाज 'जानके भी अनजान' कसा राहिला, हे प्रत्येक लेखात ठसवत राहतात. या पार्श्वभूमीवर त्यांच्या कुमारांवरील लेखनातून मला मोकळीक झाली.

कुमार गंधर्वांची मैफल ऐकणे हे एक आनंदपर्व असते आणि दोन-तीन तासांत हे आनंदपर्व संपल्यावरही पुढे मनात बराच आनंद टिकून राहतो आणि पुन:पुन्हा मनात गुंजतो. आजवर मला प्रत्यक्ष समोर बसून हे आनंदपर्व चार-पाच वेळा तरी अनुभवता आले आहे. केंद्र सरकारच्या नोकरीमुळे वास्तव्य चंडीगडमध्ये होते. त्या वेळी तिथे ३०-४० मराठी कुटुंबे होती, ती महाराष्ट्र मंडळामुळे जोडलेली होती. मंडळाच्या निधीसंकलनासाठी दर दोन-तीन वर्षांनी एका मोठ्या कलाकाराचा कार्यक्रम करून त्याप्रसंगी सोव्हिनियर काढले जायचे. त्यासाठी मंडळातील दोन-तीन बँक मॅनेजर, मोठ्या पोस्टवरील अधिकारी जाहिराती मिळवून फंड गोळा करायचे. माझ्या वास्तव्यात कुमार गंधर्वांचे चार आणि पं.भीमसेन जोशी, प्रभाकर कारेकर, रामदास कामत यांचा एक एक कार्यक्रम; सखाराम बाईंडर (हिंदी), अखेरचा सवाल असे नाट्यप्रयोग घडवून आणले, तेव्हा मी मंडळाचा चिटणीस होतो.

मंडळातील सर्वांत जुने सदस्य श्री.मधुकर पांडे हे कुमारांचे देवासपासूनचे जवळचे मित्र असल्याने कुमारांनी मंडळासाठी चार कार्यक्रम दिले, बिदागीही माफक घेतली. कार्यक्रमासाठी आल्यावर त्यांचा चार-पाच दिवस मुक्काम असायचा. त्यामुळे अनेक सदस्य पांडे यांच्या घरी जाऊन कुमारांच्या खासगी गप्पांमध्ये सामील व्हायचे. अशाच एका मुक्कामात बंगल्याच्या हिरवळीवर सतरंजीवर बसून मंडळाच्या सदस्यांशी कुमारांच्या गप्पांचा कार्यक्रम आयोजित केला होता. कुमारांनी त्या बैठकीमध्ये आपल्या गायनशैलीवरील आमच्या प्रश्नांना मोकळेपणाने उत्तरे दिली. गायनातील प्रगतशील वैचारिक पार्श्वभूमी त्यातून समजली. जुनी साचेबद्ध रागांची मांडणी बदलून नव्याने मांडणी करण्याचे प्रयत्न केले. जुन्या संगीताच्या अनेक अभिमान्यांना त्यामुळे कुमारांची प्रस्तुती मानवली नाही, ते कुमारांवर टीका करीत राहिले.




कुमारांकडे मोठी सौंदर्यदृष्टी होती. त्यामुळे सुंदर वास्तुकला, डोंगर, खडक, वृक्ष इत्यादींमध्ये समरसून कला शोधायचे आणि ते सौंदर्य आपल्या गाण्यातून मांडण्याची कोशीश करायचे.

तरुण वयातील दीर्घ आजारात त्यांचे एक फुप्फुस निकामी झाल्याने त्यांच्या गायनाला मर्यादा पडायची. दीर्घ पल्ल्याच्या तानांऐवजी ते छोट्याछोट्या ताना, पलटे वगैरेंमधून नव्या थाटाने गाणे रंगतदार करायचे. गायकीमधील प्रत्येक नवी उपज ठाशीव मोठ्या आवाजात व्हायची, पुढे त्यातून हलक्या व नाजूक हरकती जन्म घ्यायच्या. शास्त्रीय संगीताच्या अनेक श्रोत्यांनी या नव्या शैलीचे मनापासून स्वागत केले- एवढेच नव्हे, तर ते कुमारभक्त बनले.

कुमारजींनी नावीन्य निर्माण करण्यासाठी माळव्यातील लोकसंगीत शास्त्रीय गायनात गुंफले. त्यांची निर्गुणी भजने, ऋतुराज मेहफिल, इतर ऋतुसंगीत खूप गाजले.

एकंदरच कुमारांचे सर्वच गायन बौद्धिकता व प्रयोगशीलतेमुळे गाजले व पुढेही टिकून राहिले. शेवटी अतुल देऊळगावकरांनी आपल्या लेखनाचा वेगळा पैलू उघड केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**रमेश आगाशे,** सातारा

## महाराष्ट्राचे सत्ताधारी 'अहो रूपं अहो ध्वनीं'मध्ये मश्गुल आहेत आणि...

दि.२७ मार्चचा अंक उशिरा मिळला. या अंकात माननीय अर्थतज्ज्ञ अभय टिळक यांनी अतिशय नेमक्या शब्दांत सध्याची कोरोनाग्रस्त परिस्थिती व तद्भव पुढे उभे ठाकलेल्या प्रश्नाविषयीच्या वास्तवाचा यथायोग्य परामर्श घेतला आहे. अभय टिळक अर्थतज्ज्ञ आहेतच; शिवाय अवघड सत्य नेमक्या शब्दांत स्पष्टपणे, लेखनात व भाषणात सांगण्याची त्यांच्याकडे शैली, हातोटी आहे. कोरोनाने व्यक्ती, समाज व सरकारला आरोग्याचे व आर्थिक झटके-चटके दिले आहेत. पण कोविड १९ च्या साथीने एकूण एकेरी विकासाचा डोलारा हा संख्याशास्त्रीय वाढीचा आहे, तो भुसभुशीत पायावर उभा आहे- हे उघडे पाडले आहे. सध्याच्या विकासाबरोबर, विषमता व पर्यावरणाचा ऱ्हास वाढत आहे. याकडे आपले धोरणकर्ते व त्यांच्यामुळे आपण दुर्लक्ष करीत आहोत. याची मोठी किंमत मोजावी लागेल, असे इशारे गेल्या वर्षात कोरोनाच्या आपत्तीने दिले आहेत. शेतीची रोजगारक्षमता खुंटली आहे. रोजगारसंधीसाठी केवळ बेरोजगार युवक-युवतीच नाही, तर शेती करणे परवडत नाही व शेतीवर कुटुंबाचे भरणपोषण शक्य नाही, म्हणून शेतकरीही शहराकडे धावत आहेत. त्यातून शहरे कळाहीन, विनानियोजन फुगत आहेत. झोपटपट्टी, बकालपणा व बेरोजगारी शहरातही वाढत आहे. प्रश्न दिवसेंदिवस गंभीर व चिंताजनक होत आहेत, तरीही आपण रोजगारवाढीच्या व योग्य नियोजनाच्या मूळ प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत आहोत.

महाराष्ट्राचा विचार केला तर असे वाटते की, सत्ताधारी 'अहो रूपं अहो ध्वनीं'मध्ये व स्वत:चेच प्रश्न सोडविण्यात मश्गुल आहेत, तर विरोधी पक्ष सत्ताहीन अवस्थेत प्रश्न कुरवाळत विरोध करण्यात रमले आहेत. मला वाटते, एकूण विचार करता, कमकुवत असलेली/ठेवलेली आरोग्यव्यवस्था व आपल्याच तालावर लोकांना बऱ्यापैकी नाचवणारे प्रशासन- दोहोंनीही या कठीण काळात बरेच काम केले आहे. अगदी देशपातळीवर काम करणाऱ्या आरोग्यव्यवस्था व प्रशासनाविषयीही तसे म्हणायला हरकत नाही.

बेरोजगारी व स्थलांतर या दोन्ही प्रश्नांनी सामान्यांना अतिसार झाले. त्यासाठी आपल्या धोरणकर्त्यांना व आजवर रोजगारवृद्धीकडे पुरेसे लक्ष न देता, उथळ विकास व शहरीकरण राबविणाऱ्या सत्ताधाऱ्यांना दोष दिला पाहिजे. वाईट याचेच वाटते की, हा गळाठा दूर होण्याची लक्षणे सध्या तरी दिसत नाहीत. त्यासाठी सर्वसामान्यांच्या संघटित जनमताचा रेटा तयार केला पाहिजे. ते करण्यासाठी अर्थतज्ज्ञांसह समंजस राजकारण्यांनी आपापली मतमतांतरे बाजूला ठेवून, व्यापक जनहितसाधक चळवळी उभ्या करण्यासाठी प्रयत्नशील व्हायला पाहिजे. सध्या तरी हे कठीण दिसते. अन्याय, अत्याचार व दुर्लक्ष यांच्या भडिमाराला तोंड देत जगणे भाग आहे. त्याच अंकात, मिलिंद बोकील यांचा कोरानाविषयक लेख भरपूर मोठा आहे. परिस्थितीची व अनुभवांची आवृत्ती वाचायला चांगली आहे. उपाययोजना आणि विशेषत: स्थानिक, राज्य व केंद्र शासनाला केलेल्या सूचना व मार्गदर्शन आशावादी आहे. सरकारांना जनमताचा दबाव समजतो. सामान्य माणसांना 'मास्क वापरा, पाच-सहा फुटांचे अंतर ठेवून संसर्ग टाळा आणि सारखे सॅनिटराईज करत राहा,' सांगणे भाग आहे.

श्री.मधु जामकर यांचा 'वठलेल्या झाडाखाली' हा त्या अंकातील लेख चांगले ललित गद्य आहे. साधनाच्या ध्येयांत समाजप्रबोधनाचे ध्येय आहे, त्या स्वगतातून साधनाच्या वयोवृद्ध व थकलेल्या वाचकांना काळ कसा कंठावा, याविषयी मार्गदर्शन झाले आहे, असे म्हणता येईल.

**अरुण वि.कुकडे,** नाशिक

## मार्टिन ल्युथर जसा युरोपीय ज्ञानेश्वर, तसेच...

दि.१७ एप्रिलच्या साधनामधील दिनेश पाटील यांचा सयाजीराव गायकवाड यांच्यावरील लेख वाचला, खूप आवडला. एका महत्त्वाच्या, परंतु दुर्लक्षित अशा पुरोगामी चळवळीच्या पैलूवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. महात्मा फुले व सयाजीराव गायकवाड या दोघांनी ज्या तळमळीने साक्षरताप्रसाराचा प्रयत्न केला, त्यावरून एका पाश्चात्त्य ज्ञानेश्वराची आठवण झाली. मार्टिन ल्युथर हा ख्रिश्चन पाद्री ज्ञानेश्वरांनंतर दोन शतकांनी कार्यरत झाला. ज्ञानेश्वरांनी संस्कृतमधील भगवद्गीता मराठीमध्ये आणली, मार्टिनने लॅटिनमधील बायबलचे भाषांतर जर्मन भाषेत केले. तो नुसते भाषांतर करून थांबला नाही; ते भाषांतर सर्वसाधारण लोकांना वाचता यावे, यासाठी त्याने साक्षरता प्रसाराचा खूप प्रयत्न केला. त्याने खूप शाळा उघडल्या, तेथील राजे व सरंजामदार आणि श्रीमंत लोक यांच्या मदतीने त्याने हा उपक्रम केला. त्यामुळे जर्मनीमध्ये- म्हणजे त्या वेळच्या प्रशियामध्ये साक्षरतेचा प्रसार खूप झाला. नंतर 'साक्षरतेचा प्रसार' प्रोटेस्टंट चर्चचे व मिशनऱ्यांचे ब्रीदच बनले. जेथे जेथे प्रोटेस्टंट पंथाचा प्रसार झाला तेथे प्रोटेस्टंट मिशनरी गेले, तेथे साक्षरतेचा प्रसार झाला. भारतात व आफ्रिकेतही साक्षरता प्रसाराचे मोठे श्रेय ख्रिश्चन मिशनऱ्यांकडे विशेषतः प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांकडे जाते. सर्व युरोपमध्ये, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकामध्ये व ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड यांच्यामध्ये १९०० पर्यंत जवळपास शंभर टक्के साक्षरता होती. याचे मोठे श्रेय मार्टिन ल्युथरला व नंतर लगेचच निघालेल्या छपाईच्या तंत्रज्ञानाला द्यावे लागेल. त्या वेळी भारतामध्ये फार तर दहा टक्के साक्षरता असेल. साहजिकच असे वाटून जाते की, ज्ञानेश्वरांनी व इतर सर्व संतांनी जर साक्षरता प्रसारावर भर दिला असता तर किती बरे झाले असते... केवढा प्रचंड फरक पडला असता! साक्षरता प्रसाराचे हे काम होण्यासाठी सयाजीराव व महात्मा फुले यांचा जन्म होईपर्यंत वाट बघायला लागली. मार्टिन ल्यूथर जसा युरोपियन ज्ञानेश्वर तसेच महात्मा फुले आणि सयाजीराव गायकवाड हे भारतीय मार्टिन ल्युथर होते, असे म्हणायला हरकत नाही.

**सुभाष आठले**, कोल्हापूर.

## तिथे संघाचा उल्लेख होतो तेव्हा बरं वाटतं...

'आणीबाणीच्या काळातील माझा तुरुंगवास' हा श्रीमान सुरेश द्वादशीवारांचा लेख वाचताना माझा सात-सात दिवसांचा दोनदाचा बेळगाव-हिंडलगा जेलमधील डीआयआर खालील १९७५ चा बंदजीवनाचा काळ आठवला आणि रा.स्व.संघाच्या स्वयंसेवकांसह इतर जणांबरोबर तो कारागृहात घालविलेला अद्भुत काळ आठवला. इंदिराजी, काँग्रेस आणि इतर संविधानाचे तोंडदेखले समर्थक आज जेव्हा आमची ओळख करून देताना तो उल्लेख होतो, तेव्हा बरं वाटतं. नंतर माझे सासरे झालेले सर्वोदयी कार्यकर्ते प्रभाकर मराठे आणि त्यांची कन्या उर्मिलाजी १९ महिने मिसाखाली होत्याच. शिवाय राम आपटे आणखी इतर बरेच होते. उभा देश बंदी झाला, अशीच अवस्था. तेव्हापासूनच आम्ही साधना वाचू लागलो. मी मात्र त्या वेळी जेपींच्या युवा संघर्षचा कार्यकता, पण मूळचा आणि आजही संघ-स्वयंसेवकच होय... सुंदर लेख.

**किशोर मधुकर काकडे**, बेळगाव

## अशा टीकेला समाजात मान्यता मिळत नाही

सुरुवातीलाच मला खुलासा करायचा आहे की, मी संघाचा स्वयंसेवक नाही आणि मी कधीही संघात गेलो नाही.

दि.१७ एप्रिल २०२१ च्या अंकातील दत्तप्रसाद दाभोळकर यांचे 'हुकूमशाही : संघ परिवाराची आणि कम्युनिष्टांची' या शीर्षकाचे पत्र वाचले. ते अजून गोळवलकर, देवरस, मधोक यांच्यातच घुटमळताना दिसतात. ते पाहून मला ज्येष्ठ विचारवंत सुहास पळशीकर यांनी जयदेव डोळे यांच्या 'आरएसएस' या पुस्तकाची लोकसत्ताच्या दि. १३/८/१७ च्या अंकात लिहिलेल्या समीक्षेची आठवण झाली. या समीक्षेत पळशीकर यांनी लिहिले होते, 'विचार, संघटन आणि पक्षीय राजकारण या तिन्ही बाबतीत संघ बदललेला आहे, त्या बदलांमध्ये त्याची आत्ताची ताकद आहे... (लेखकाचा) जुन्याच चौकटीमध्ये संघाच्या सामाजिक शक्तीचे आकलन करण्याचा आग्रहदेखील डोकावतो.' त्यांनी पुढे लिहिले आहे की, 'साचेबंद चिकित्सेच्या पलीकडे जाऊन सभोवताली होणाऱ्या स्थित्यंतराची समीक्षा होण्याची आवश्यकता आहे.'

बीबीसी मराठीमध्ये २१ सप्टेंबर २०१८ रोजी सुहास पळशीकर यांनी लिहिले होते, 'इतक्या दीर्घ काळ अस्तित्वात असलेल्या या अजस्र संघटनेत काही स्थित्यंतरे होणे स्वाभाविक आहे आणि अशी काही स्थित्यंतरे झालेलीही आहेत. संघाचे विरोधक ती एक स्थिर व अपरिवर्तनीय वस्तू मानतात आणि तिच्या जुन्या वैशिष्ट्यांच्या आधारे तिच्यावर टिका करतात,

त्यामुळेच ती काही वेळा गैरलागू आणि संदर्भविहीन ठरते. ते अर्थात संघाला सोईचं ठरतं, कारण अशा टीकेला समाजात फारशी मान्यता मिळत नाही.'

**विजय आपटे**, पुणे

## एका दाबून टाकलेल्या किंकाळीला वाचा फोडली

श्री.सुरेश खैरनार यांनी ३ एप्रिलच्या अंकात 'भागलपूरचा आत्मा'– मुन्नासिंहच्या श्रद्धांजलीच्या निमित्ताने जे कथन केलेले आहे, ते वाचून मन शोकाकुल होते. माणुसकी काय असू शकते व ती कशी राबवली जाऊ शकते, हे भागलपूरचा मुन्नासिंह याने प्रत्यक्षात आचरणात आणले. सेक्युलर पार्ट्या व स्वयंसेवी संघटना यांना पद्धतशीरपणे संपविण्याचा प्रयत्न या देशांत अखंडपणे चालू आहे. त्यात काही संघटना यशस्वीही होत आहेत, ही काळजी वाढवणारी व माणुसकीला शोभा न देणारी घटना आहे. बहुसंख्य लोकांच्या डोळ्यांवर एक पट्टी बांधलेली आहे. खैरनार यांनी कथन केलेल्या अशा घटनांमधून माणुसकीला जागणारी मुन्नासिंह यांच्यासारखी माणसे अगदी विरळपणे सापडतात.

वस्त्या व आजूबाजूची खेडी यामध्ये राहणारी माणसे शेकडोंनी मारली. हजारो महिलांना मारण्यात आले. तलावात टाकणे, पुरणे अशा पद्धतीने एका जमातीचा नाश करण्यात येतो... किती भयावह दृश्य असेल याची कल्पना करवत नाही. आजही त्यांच्या वारसदारांना ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना आठवणे अवघड होत असेल. परिस्थितीचे यथार्थ वर्णन करून एका दाबून टाकलेल्या किंकाळीला वाचा फोडण्याचे काम लेखकाने केले आहे. एक साधा, अशिक्षित पण माणुसकी जतन करणारा आपल्या परीने प्रयत्नांची पराकाष्ठा करतो, नि:स्वार्थीपणे काम करतो. धर्म ही अफूची गोळी आहे आणि तिच्यापुढे कधी कधी माणुसकीदेखील पराभूत होते, हेच लेखकाला यातून सांगावयाचे आहे का?

**चंद्रकांत गवांदे**, पुणे

## मौलाना आझाद आधीचे आणि नंतरचे...

दि. १० एप्रिलच्या अंकातील 'आणीबाणीच्या काळातील माझा तुरूंगवास' हा सुरेश द्वादशीवार यांचा लेख वाचला. हैद्राबाद ऑपरेशननंतर नेहरू, पटेल, आझाद या भागात भेट द्यायला आल्यानंतर बिदरला पोहोचतात. तेव्हा रझाकारांनी हिंदू धर्माच्या स्त्रियांवर केलेले अत्याचार पाहून मौलाना आझाद म्हणतात, 'कशाचा धर्म आणि कशाचा देश? असे अत्याचार शिकवतो तो धर्म कशाचा आणि त्यातील माणसे तरी माणसे कशी म्हणायची?'

मौलाना अबुल कलाम आझाद हे नेहरूंच्या मंत्रिमंडळातील पहिले शिक्षणमंत्री. ते त्या स्थानावर सुमारे दहा वर्षे राहिले. ते मक्केहून आले होते, मुस्लिम धर्माचे विद्वान आणि प्रभावी वक्ते होते. २७ ऑक्टोबर १९१४ रोजी कोलकत्याला मुस्लिमांच्या विशाल सभेत बोलताना ते म्हणाले होते, 'काफ़िरांशी वागताना अतिशय कणखर राहा; पण, आपापसात वागताना दया आणि सहानभूती बाळगा.' हे संपूर्ण भाषण गुगलवर उपलब्ध आहे.

**संजय लडगे**, बेळगाव

## प्राथमिक शिक्षक हे ग्रासरूट डेव्हलपर आहेत!

दि.१० एप्रिलच्या साधनातील डॉ. नंदकुमार मोरे यांनी दीपक मेंगाणे– शिक्षण विस्तार अधिकारी, भुदरगड; यांनी संपादित केलेल्या 'आमच्या कल्पनेतील प्राथमिक शिक्षण' या पुस्तकावरील विचारमांडणी व भाष्य खूप आवडले.

असं म्हटलं जातं की, प्राथमिक शिक्षक हे विद्यार्थिदशेतील मुलांचे ग्रासरूट डेव्हलपर आहेत. पेराल तसेच उगवेल. कोणत्याही इमारतीचा पाया भक्कम, मजबूत असेल, तरच ती इमारत भविष्यात अनेक वर्षे मजबूत राहील.

नेहमीच असे बोलले जाते की– डॉक्टर समाजाचे आरोग्य सांभाळतो, वकील समाजाचे मन सांभाळतो आणि शिक्षक हा समाजाची भावी पिढी व नागरिक घडवतो. यात दुमत नसावे. आमच्या कल्पनेतील प्राथमिक शिक्षण या विषयावर शोधनिबंध स्पर्धेचा जो प्रयत्न केला, त्यासाठी आलेल्या ७० शोधनिबंधातून सर्वांत उत्कृष्ट १६ निबंध निवडून सदर पुस्तक तयार केले, हे थोडके नाही. हा आशावादाचा भाग होय.

**विलासराव भांदिर्गे**, मु.पो.तारळे, जि.सातारा


SkinSense
Skin & Laser Clinic
Using science to enhance youth and delay ageing.
Dr. Abhijit Desai
Cosmetic Dermatologist and Laser Specialist
Dr. Gauri Desai
MD, Laser Specialist
Skin Toning
Face Lift & Skin Tightening
Reduction of Snoring
Texturing
Permanent Hair Reduction
Pore Minimisation
Medical
State of the Art
LASERS
Acne Scar Reduction
Spot Fat Reduction and Body Sculpting
Tattoo Removal
Vaginal Tightening
Pigmentation Treatment
Tel no.:
02224331099 / +919920977940
Address:
2nd floor, Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai – 400028
Email: dr.skinsense@gmail.com | Website: www.yourskinsense.com

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6/31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Regstration No. PCW/080/2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting: 10-5-2021/ Date of Publication : 10-5-2021

साधना प्रकाशनाची 100 पुस्तके
e book स्वरूपात
किंडलवर उपलब्ध आहेत!

त्यासाठी amazon.in वर
क्लिक करून
kindle store मध्ये शोधा

...आणखी 50 पुस्तके
१५ ऑगस्टपर्यंत उपलब्ध होतील!

अधिक माहितीसाठी संपर्क
साधना प्रकाशन
431, शनिवार पेठ, पुणे 411030
sadhana.prakashan@gmail.com Ph : 02024459635